
चीनमध्ये प्राचीनकाळी लागलेले

महत्त्वपूर्ण शोध
आणि
त्यांच्या जन्मकथा



सुरेश मथुरे

चीनमध्ये प्राचीनकाळी लागलेले महत्त्वपूर्ण शोध

आणि

त्यांच्या जन्मकथा

सुरेश मथुरे

फुलराणी प्रकाशन
ठाणे

फुलराणी प्रकाशन क्र. १९
द्वारा - प्रदीप गुजर
१, सुयोग, रामवाडी,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

डिसेंबर १९९९

छपाई
मोहन [illegible]
२१ [illegible]
गोखले रोड (साउथ), मुंबई - २५.

अक्षर जुळणी
शिल्पा आर्टस्
उज्ज्वला तावडे
१३/बी/९, एन.एम.एम. सोसायटी,
जुना मुंबई-पुणे रोड, कळवा, ठाणे - ५
फोन नं. ५३७ ०२ ५०

मुखपृष्ठ
सुनील पुजारी, विक्रोळी
फोन - ५७८ ९२ ४२

आपुलकीचे सहकार्य
विश्वास प्रभाकर दशपुत्रे, ठाणे
विद्याधर प्रभाकर दशपुत्रे, ठाणे

सुरेश मथुरे
जन्म - १० एप्रिल १९३१
मृत्यू - २३ डिसेंबर १९९८

चरित्रात्मक लेख ,

मुलांना कंटाळवाणे होतात.

म्हणून प्रत्येक शोध कसा लागला असावा

हे कल्पनेने मनात चित्र उभे करून

या शोधाची एक 'कथा' तयार केली आहे.

कथेचे नायक, घटना वगैरे सर्व कल्पनात्मक आहे.

मात्र प्रत्येक शोध हा खरा आहे

याची खात्री करूनच कल्पनेच्या साम्राज्यात

प्रवेश केला आहे.

मान्यवर अशा ज्ञानकोशात

तो तो शोध चीनच्या नावाखाली आलेला आहे

हे पाहूनच पुढे पाऊल टाकले आहे.

ॲक्युपंक्चर

ॲक्युपंक्चर ही एक रोगनिवारणाची पद्धत आहे. ही पद्धत चीन देशात बहुधा तिबेटमधून आली असावी. पण या पद्धतीचा प्रचार आणि वापर प्राचीन काळापासून आजपर्यंत चीनमध्येच झाला. ॲक्युपंक्चर म्हणजे रोग्याच्या शरीरात ठराविक ठिकाणी सुया टोचणे. या सुया कुठे, किती काळ, किती खोलवर टोचायच्या याचे प्राचीन चीनी पंडितांनी एक शास्त्र बनवले. या शास्त्राला ते 'झेऊ जिऊ' म्हणतात.

ॲक्युपंक्चर ही पद्धत इतर सर्व रोगनिवारणाच्या पद्धतींहून अत्यंत वेगळी आहे. कारण या पद्धतीत ज्या 'सुया' वापरल्या जातात त्यात कुठलेच रसायन नसते. तसेच त्या नेमक्या दुखऱ्या भागावर टोचल्या जातात असेही नाही. डोके दुखताना आपल्या अंगठ्याजवळ अथवा पोट दुखताना मानेजवळही टोचल्या जातात. ॲक्युपंक्चर 'मानसिक' क्रिया आहे असे म्हणावे तर ती मनुष्य प्राण्याप्रमाणेच हत्ती, कोल्हा, लांडगा यांच्यावरही वापरली जात असे. चीनमधल्या एका उत्खननात हत्तीच्या सांगाड्याचा एक नकाशा मिळाला आहे. त्यावर ॲक्युपंक्चरचे बिंदू दाखवले आहेत. म्हणून ॲक्युपंक्चर ही एक गूढ पद्धती आहे.

प्राचीन पंडितांचे या पद्धतीबद्दलचे विचार असे आहेतः सर्व विश्वाची घडण चैतन्य तत्त्वावर होते. या तत्त्वाला ते 'ची' म्हणतात. 'ची' चे दोन विभाग पडतात. 'यिन' हे ऋण तत्त्व आणि 'यांग' हे घन तत्त्व. आपल्या शरीरात यिन-यांग तत्त्वे वाहून नेण्याचे बारा मार्ग म्हणजे मेरीडियन्स आहेत आणि या मेरीडियन्सवरती अनेक दारे म्हणजे ॲक्युपंक्चर पॉईंट असतात. रोग होणे म्हणजे चैतन्य तत्त्वाचा-'ची' चा समतोल ढासळणे. म्हणजेच 'यिन'पेक्षा 'यांग' किंवा 'यांग' पेक्षा 'यिन' प्रवाह अधिक वाहणे. हा ढासळलेला समतोल नेमक्या ठिकाणी सुया टोचून बरोबर करता येतो.

असे हे शास्त्र. या शास्त्राला किंवा पद्धतीला अजून तरी शास्त्रीय बैठक मिळालेली नाही. पण बैठक असो वा नसो, रोग हटतो. रोगी बचावतो इतके मात्र खरे.

आपल्याकडेही इडा-पिंगला, शिव-शक्ती, चंद्रसूर्य या यिन-यांग स्वरूपाच्या नाड्या आहेत. इडा-पिंगला नाडीचा 'समतोल' साधणारी समाधींची 'सुषुम्ना' ही नाडीही आपल्याकडे आहेच. आजचे नवे विज्ञानशास्त्र सूक्ष्मदर्शकामधून या ॲक्युपंक्चर पद्धतीचा अजून शोध घेत आहे, प्रगतीही झपाट्याने करीत आहे.

कोरियाच्या प्रो. किम बॉन हॅन यांनी अनेक प्रयोग करून ॲक्युपंक्चरच्या बारा मार्गांचा-मेरीडियन्सचा शोध घेतला आहे. जीवनाचे घटक असणाऱ्या ॲमीनो ॲसिड, ॲड्रेनलीन, आर एन् ए-डी एन् ए हे बारा मार्गातून वाहतात असे बॉनसाहेबांना आढळून आले आहे. लेसर किरणांच्या साहाय्याने आणि क्रॅयलीन फोटोग्राफीने या बारा मार्गांचे विश्लेषण अजूनही शास्त्रज्ञ करीत आहेत. असे हे गूढ शास्त्र आहे आणि त्याची प्राचीन चिनी परंपरा इ. स. पूर्व ३००० पासून चालत आलेली आहे.

❑

सुई शोषते दु:ख अनावर

छोट्या शान-सूला घेऊन तिबेटी लोकांचा तो जथा त्याच्या घरून वाजतगाजत पहाडाकडे जायला निघाला आणि एका प्रशस्त बुद्ध विहाराकडे आला. हा संपूर्ण प्रवास पूर्ण होईपर्यंत बिचारा शान-सू रडत होता. मनातल्या मनात मुसमुसत होता. पण त्या पहाडी, तिबेटी लोकांचे त्याच्याकडे अजिबात लक्ष नव्हते. ते आपले आनंदाने ताशा-ढोल वाजवत होते. पिपाण्या फुंकत होते. नाचत होते, गात होते आणि शान-सू बिचारा विचार करीत होता आपल्या आई-आजीचा कधीही त्याला एकट्याला बाहेर न सोडणाऱ्या. आई-आजींनी या लोकांबरोबर आपल्याला धाडले तरी कसे? सकाळी आपण वाड्यात ऊन खात बसलो होतो तोच हे लोक आले. आई-आजींच्या कानात त्यांनी काही सांगितले. आपल्या सर्व देहाचे नीट निरीक्षण केले आणि आपल्याला गाय आणि बोकड यांच्यासारख्या दिसणाऱ्या प्राण्यावर बसवून निघाले... शान-सू विचार करीत होता, हे असे कसे झाले? निघताना आजीने त्याच्या गालाचा पापा घेत म्हटले,'बेटा शान-सू, तू आता लामा होणार.' आई तर नुसतीच त्याला पोटाशी धरून रडत राहिली.होती... कितीतरी वेळ हात हलवून आपल्याला 'नीट जा' सांगत होती.

शान-सू असाच विचार करीत राहिला असता. पण तेवढ्यात समोरचे वळण संपले आणि विहारातल्या घंटांचा घणघणाट त्याच्या कानावर आला. त्याबरोबर त्या केसाळ गाय-बोकडासारख्या याकवर तो नीट बसला. म्हणजे त्या तिबेटी मिरवणूकवाल्यांनीच त्याला तसे बसते केले.

घणघणून घंटानाद होत होता. शंख फुंकले जात होते. तुताऱ्या वाजत होत्या आणि विहारातले तमाम लोक त्याचे दर्शन घेण्याठी पुढेपुढे येत होते. त्याला दुरूनच नमस्कार करीत होते. शान-सूने समोर पाहिले. बुद्धदेवाची दगडी मूर्ती मंदपणे हंसत होती. या मूर्तीशेजारी दोन मोठे लामणदिवे लावले होते. उदबत्त्या पेटवलेल्या होत्या. ऊद जळत होता. त्याचा वास येत होता. अधूनमधून गाभाऱ्यात आवाज घुमत होता. एका बाजूला नऊ लामा रांगेने आसनावर बसलेले होते. एक आसन रिकामेच होते. पिवळी वस्त्रे घातलेले आणि डोक्याचे चकोट मुंडासे केलेले लामा शान-सूकडे टक लावून पहात होते. पण शान-सूचे लक्ष...

... कोपऱ्यात उभ्या असणाऱ्या एका भयानक माणसाकडे लागले होते. त्या माणसाला पाहूनच तो भयंकर घाबरून गेला. काय विचित्र माणूस होता! तोंड उघडे ठेवून, जीभ बाहेर काढून छाती बडवत होता. त्याचे डोळे गरगर फिरत होते, तोंडावर गुलाल-बुक्का फासलेला. एका हातात भली मोठी तलवार, दुसऱ्या हातात त्रिशूळ, पायाखाली वाघाचे कातडे. त्या कातड्यावर माणसाची एक कवटी... आणि त्याचा पोषाख कसा? पायघोळ लांब डगला, लाल लाल रंगाची वरती शाल, डोक्यावर भला मोठा मुगुट...

हा सुंगमा होता. म्हणजे याच्या अंगात देवाचे वारे खेळत असे. भुते-खेते याच्या धाकात रहात आणि नव्या लामाची लक्षणे तोच सांगत असे. शान-सूचे वर्णन, वय, अंगाचा रंग आणि शान-सूच्या आईचे वर्णन,

गाव, घर सगळे सगळे त्याने सांगितले होते. म्हणून शान-सूला पहाडी लोकांनी इथे आणले होते.

पण तेवढ्यात आणखी एक मिरवणूक तिथे आली. या तांड्यानेही शान-सू सारखाच एक मुलगा याकवर बसवून आणला होता. ते लोकही नाचत होते. सुंगमाने या मुलाला पाहिले आणि एका लामाने हात वर केला... त्यासरशी सुंगमा जोरजोराने नाचू लागला. छाती बडवून घेऊ लागला. शेजारी ठेवलेल्या तांबड्यापांढऱ्या कमळांच्या ढिगात त्रिशूळ खुपसू लागला. एकच हलकल्लोळ, गोंधळ माजला. मग मात्र वृद्ध लामांनी हात वर केला आणि सर्वांना शांत केले. विहारातून जाण्यास सांगितले. उद्या लामाची निवड होईल असे सांगितले.

आता रात्र झाली होती. विहार पूर्ण रिकामा झाला. नऊ लामाही आपापल्या जागी गेले. विहारातल्या भव्य मंडपात फक्त शान-सू आणि त्याच्याच बरोबरचा तो नवा आलेला मुलगा उरले. त्यांच्या पुढे थाळीत फळे ठेवलेली होती. घाबरत घाबरत दोघांनी ती खाल्ली आणि एका लामाने सांगितले तिथे दूर दूर ते जाऊन झोपले. शान-सूला या लामाने डोके इथे कर असे प्रेमळपणे सांगितले. 'तू उद्या मुख्य लामा होणार ना!' असे म्हणून शान-सूला झोपावयास सांगून तो त्या दुसऱ्या मुलाशी बोलत बसला...

शान-सूला झोप येतच नव्हती. प्रवासाचा शीण होताच, शिवाय मुख्य लामा व्हायचे म्हणजे नेमके काय होणार हेच त्याला कळत नव्हते. पण तो तसाच पाय आखडून घेऊन पडला. मोडक्या विहाराच्या फुटक्या छतातून चंद्र वर येत होता आणि तारेही चमचमताना दिसत होते. तारे पाहण्याचा शान-सूला विलक्षण छंद होता. झटक्यात तो उठला आणि आता पाय बाहेर टाकणार तोच...

... तोच त्याच्या जागेवर एक भला मोठा धोंडा येऊन पडला. धप्पकन आवाज झाला. संपूर्ण विहार एकदम काळोखात थरथरला. आपण आता या जागी झोपलो असतो तर आपला कपाळमोक्षच झाला असता... शान-सूच्या डोक्यात विचार आला आणि जीव वाचवण्यासाठी तो त्या विहारातून धूम पळत सुटला.

... एक पहारेकरी त्याच्या मागे धावणार तोच लामाने-हात वर करून सुंगमाला खूण करणाऱ्या लामाने-त्याला अडवले.'जाऊ दे' सांगून पहारेकऱ्याला थोपवले.

शान-सू मात्र जीव घेऊन अजूनही धावत होता आणि धावता धावता बरेच अंतर काटून झाल्यावर एका झाडापाशी धापा टाकत तो थांबला आणि तिथेच कुडकुडत झोपून गेला.

...सकाळच्या स्वच्छ आणि उबदार उन्हाने शान-सूला जाग आली आणि डोळे चोळत तो उठणार तोच त्याला खाली बसवून एक महंत त्याच्या जवळ बसला. शान-सू या महंताकडे पहातच राहिला. पण महंत प्रेमळपणे त्याचे पाय चेपत होा. त्याच्या पायावर सूज आलेली होती. महंताच्या राकट हातानी सूज आलेल्या भागाला बरे वाटू लागले. महंताने त्याला पाठीशी घालून एका गुहेत आणले. 'तू माझ्या जवळ रहा' असे म्हणून त्यांनी त्याला खाली बसविले. मग त्यांनी गरम करून चहा आणला. थोड्या वेळाने त्यांनी बटव्यामधून काही सुया बाहेर काढल्या व त्या चार ठिकाणी-दंडावर हातावर, कंमरेजवळ थोडा वेळ टोचून ठेवल्या...

... सुया काढल्या तेव्हा शान-सू ला एकदम बरे वाटू लागले. त्याच्या अंगात हुरूप आला आणि मग तो एकदम उठून चक्क उभा राहिला. हसत हसत उभा राहिला.

आता शान-सू चे नवेच जीवन सुरू झाले होते. महंताच्या गुहेत राहायचे. इकडे तिकडे पहाडात हिंडायचे. महंत स्वतःच्या कामात दंग असत. तो रानावनात फिरण्यात रंगून जाई. तो आता लामांचा विहार, भुतासारखा दिसणारा सुंगमा या सर्व गोष्टी विसरला होता. एका गोष्टीची आठवण त्याला सतत येत होती. चार ठिकाणी चार सुया टोचून महंतांनी आपली सूज कशी काय कमी केली? की महंतसुद्धा अंगात देवाचे वारे खेळवणारे आहेत? भुतांखेतांशी तर त्यांचा संबंध नाही ना?

शान-सू कधी कधी महंतांबद्दल साशंक होत असे. त्याच्या मनात शंका निर्माण होत. रोज सकाळी महंत एकटेच एका गुहेत जात, बऱ्याच वेळाने त्या गुहेतून बाहेर येत. हे तिथे एकटेच का जातात, काय करतात? सुंगमाला भुते वश आहेत. तसेच महंत भुताटकीचे प्रकार करणारे तर नाहीत ना?

पण शेजारपाजारचे खेडूत महंतांकडे येत. त्यांचे दुखणे महंत सुया खुपसून बरे करीत. कुणाच्या पोटात दुखत असे, तर कुणाच्या पाठीत कळा येत असत. कुणाची दाढ ठणकत असे, तर कुणाच्या डोक्यात घणासारखे घाव बसत असत. रोगी तळमळत येत आणि सुया टोचल्यावर हंसत-हंसत निघून जात. महंत अशा वेळी शान-सूला सुया टोचायला बोलावत, त्याला रोगी माणसाचे दुखणे काय आहे ते समजावून देत. शान-सू ला हे सर्व आठवत असे पण तरीही त्याला प्रश्न पडे की महंत आपल्याला त्या गुहेत का घेऊन जात नाहीत? ते एकटेच का जातात? कुणाची भक्ती करतात? त्या गुहेत काय आहे? भुते-खेते? वेताळ?

महंतांच्या सुया टोचून रोगी बरा करण्याच्या शास्त्रामुळे शान-सू चकित झाला होता. त्यापेक्षाही या गुहेच्या रहस्याने तो अधिक आश्चर्यचकित झाला होता.

एके दिवशी संध्याकाळच्या वेळी शान-सू एका कडेला जाऊन बाहेरची शोभा पाहात होता. मावळत्या सूर्याच्या लाल लाल किरणांमुळे सगळे आसमंत लालसर तांबूस झालेले दिसत होते. पहाडाच्या बर्फाच्छादित शिखरांवर लाल शिडकावा, रंगाच्या छटा पडून ती शिखरे फार सुंदर दिसत होती आणि त्या पहाडाच्या खाली खोल खोल पसरत गेलेली अवाढव्य आणि भयानक दरी हिरवी-निळसर होत होत अधिक गडद काळोखी दिसत होती. दरीतून वाहाणारी नदीची चकाकती रेषा एखाद्या काळसर सापासारखी दिसत होती... तिबेटच्या एका खोऱ्याचे ते दृश्य होते.

भान हरपून शान-सू ते दृश्य पाहात होता. तेवढ्यात वर आकाशात एका काळ्या एकलकोंड्या ढगाजवळ एक गरुड आपले पंख संथपणे पसरत आला आणि घिरट्या घालू लागला. या पर्वतशिखरावर त्या गरुडाचे घरटे असावे... शान-सू त्या गरुडाकडे डोळे रोखून पाहातोय तोच मागून महंत येऊन उभे राहिले. 'काय पाहातोस बेटा?' त्यांनी त्याला प्रेमळपणे प्रश्न केला. 'त्या गुहेत काय आहे याचा विचार करतोय मी,' शान-सूने त्यांच्या नजरेला नजर न भिडवता म्हटले.

महंत खदखदून हसले. त्यांच्या हसण्याने पडसाद समोरच्या दरीत घुमत राहिले. मग महंत म्हणाले,'बेटा, मी एकटा त्या गुहेत जातो त्याचे कारण तुला सांगतो. तो गरुड पक्षी पाहा. हा शिकारी पक्षी आहे. ससा, होले वगैरे खाणारा क्रूर पक्षी. पण तोसुद्धा जेव्हा आपल्या घरट्याकडे पिल्लांसाठी येतो तेव्हां किती मृदु-वत्सल होतो. हे जग, ही सृष्टी या अशा क्रूर-मृदू गोष्टींनी भरलेली आहे. आणि या दोन्ही गोष्टी एकाच ठिकाणी राहत असतात. अशा विरोधी गोष्टींना 'यिन' आणि 'यांग' असे म्हणतात. शिव-शक्ती, सूर्य-चंद्र अशीही नावे या यिन-यांग जोडीला देता येतील मानवी शरीरात हे यिन-यांग एकाच वेळी रहात असतात. त्यांचा समतोल बिघडला की मानवाची प्रकृती बिघडते. तोल व्यवस्थित झाला की प्रकृती ठणठणीत राहते कळले?'

'हो कळले!' शान सू महंतांना घाबरून म्हणाला. खरे म्हणजे गुहेत जाण्याचा आणि यिन-यांगचा एकमेकांशी संबंध काय हे काही त्याला कळले नव्हते. तो 'हो' म्हणून गप्प बसला तेव्हा महंत पुन्हा म्हणाले,'काय कळले?'

'तेच. यिन-यांग यांच्या समतोलावर माणूस जगत असतो हे!' शान-सू म्हणाला.

'छे! तुला कळलेच नाही,' त्याच्या खांद्यावर हात ठेवून महंत परत म्हणाले,'त्या गुहेत पाय टाकायचा नाही!'

महंतांचे हे वाक्य ऐकून शान-सू चांगलाच बिचकला. त्याने चेहरा टाकला. त्याला जवळ घेत महंत म्हणाले,'बेटा, प्रत्येक गोष्टीसाठी योग्य वेळ यावी लागते. फळ पिकण्यासाठी वेळ द्यावा लागतो. झाड उगवण्यासाठी वेळ द्यावा लागतो. चंद्र उगवण्यासाठी वेळ द्यावा लागतो आणि सूर्य मावळण्यासाठीही वेळ द्यावा लागतो. म्हणून म्हणतो त्या गुहेत जाण्याची आज घाई नको. एक वेळ अशी येईल की माझ्या अनुमतीची तुला अजिबात आवश्यकता वाटणार नाही आणि तुला अनुमोदन देण्याची मलाही जरूरी भासणार नाही. कळले तुला?'

'हो कळले!' शान-सू म्हणाला.

'काय कळले?' महंतांनी विचारले.

'तेच, योग्य वेळ आल्याशिवाय घाई करायची नाही. गुहेत जायचे नाही.'

'छे! तुला कळलेच नाही.' मग त्याच्या खांद्यावर हात ठेवून हसत हसत प्रेमाने ते म्हणाले,'यिन आणि यांग या चैतन्य तत्त्वांचा समतोल ढासळलेला असला तर सुया टोचून तो पुन्हा निर्माण करायचा हे माणसाचे कर्तव्य आहे कळले तुला?'

'हो!' फक्त हो आणि तेही मानेने देऊन तो गप्प बसला. मग मात्र त्याचे त्यालाच हसू आले. आणि महंतही खदखदून हसू लागले. त्यांच्या दोघांच्या हसण्याने दरीत प्रतिध्वनी उमटत राहिले आणि मग थोड्या वेळाने ते ध्वनी विरत विरत वाऱ्यावर झिरपत दरीभर पसरले...

महंतांनी हसण्यावर नेत आपला गुहेचा मुद्दा डावलला हे शान-सूने ओळखले. पण तो काही

एक म्हणाला नाही. कारण आता त्याला महंतांविषयी आदर वाटू लागला होता. गुहेचे गूढ आणि उत्सुकता होतीच. पण ते जे काही सांगत आहेत ते तो नीट ऐकून घेऊ लागला. माणसाच्या शरीरातून यिन-यांग या वाहणाऱ्या चैतन्य तत्त्वाचे मार्ग कसे आहेत, कानाचा मार्ग पायाजवळ कसा येतो आणि अंगठ्याजवळ दाढेपाशी येऊन कसा थांबतो?...

तो स्वतः आता या सुया टोचून आराम देण्याच्या शास्त्रात पारंगत झाला होता. महंत म्हणजे एक निष्णात वैद्य आहेत हे त्याचे मत झाले होते. एके काळी आपण त्यांना भुता-खेतांशी मैत्री करणारे सुंगमा समजत होतो याचे त्याला आता वाईट वाटू लागले.

एकदा महंत कामाला कुठे तरी दूर गेले होते आणि दोन दिवस परत येणार नव्हते. तेव्हा मात्र त्याच्या जिवाची घालमेल उडाली. महंत बाहेर पडले आणि पार दूर गेले तसा तो धावत धावतच त्या रस्त्याच्या गुहेजवळ आला आणि त्याने बिचकत बिचकत गुहेचे दगडाच्या शिळेचे दार उघडले...

... आत पाय टाकल्यावर प्रथमच तो बिचकला. समोरच दोन प्राण्यांचे सांगाडे ठेवलेले होते. गुहेत कुंद वास, काळाकुट्ट काळोख होता. गुहेच्या भिंतीवर ओल झिरपत होती. आणि एक पाकोळी चुरूक चर्र SS चुरूक चर्र SS करीत गरुडासारखी पण पंख फडफडवीत घिरट्या घालत होती. आस्ते आस्ते पावले टाकत तो त्या सांगाड्यापाशी आला. एक कुत्र्याचा व एक हरिणाचा सांगाडा दिसत होता. आणि या सांगाड्यावर काळे-पांढरे असे दोरे आवळून-ताणून बसवलेले होते. तो जवळ जाऊन नीट निरीक्षण करू लागला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की हे काळे-पांढरे दोरे म्हणजे यिन-यांग या चैतन्य तत्त्वांचे मार्ग आहेत.

... शान-सू हळूहळू पावले टाकत गुहेच्या अधिक काळोख्या भागाकडे आता जाऊ लागला. सावधपणे पावले टाकतानाही एका फळावर पाय पडून तो चांगलाच घसरला. पण नंतर उठून उभे रहात त्याने धीराने पावले टाकली. भिंतीचा आधार घेण्यासाठी त्याने हात लांबवले तोच भिंतीचा एक ओलसर ढलपा धपकन कोसळला...

एक मोठा श्वास घेऊन शान-सू उभा राहिला. आपली शोधक नजर त्याने इकडे तिकडे फिरवली आणि एका कोपऱ्यात उभी असलेली वस्तू पाहून त्याची बोबडीच वळली. तोही एक सांगाडाच होता. पण तो माणसाचा होता. कवटी-मणका-सापळ्या हाडे... याही सापळ्यावरच्या हाडांवर दोन काळे-पांढरे धागे ताणून बांधलेले दिसत होते. एका झाडाची वाळलेली फळे हाडा-हाडांवर बसवून हे धागे ताणून ओढलेले होते आणि त्यात चमकणारे स्फटिकांचे मणी ओवलेले होते. कोपऱ्यातल्या समईच्या मंद ज्योतीचा प्रकाश या मण्यांवर पडलेला होता.

आता भिती गेल्यामुळे शान-सू सांगाड्याच्या अधिक जवळ गेला. काळे पांढरे धागे त्याने मोजले. ते बारा होते. म्हणजे महंत म्हणत होते यिन-यांगचे प्रवाह वाहतात ते असे असावेत. शान-सूने हळूहळू सर्व मणी मोजले. तेही ५०० च्या वर होते. आता शान-सूच्या लक्षात आले की पाय मुरगळला की आपण

टंडावर सुया टोचत होतो आणि हात दुखताना अंगठ्यावर... कारण शरीरातील चैतन्य तत्त्वांचे **यिन-यांगचे** प्रवाह असे वाहत असतात...

...तेवढ्यात समईची ज्योत थरथरली आणि भक्कन गुहेत काळोख पसरला. शान-सू हात पुढे करून चाचपडू लागला आणि तसे करताना हाताला मानवी आकृती लागून त्याच्या देहावर भीतीचा काटा उभा राहिला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. तो मटकन खालीच बसणार होता. पण त्याच वेळी त्याच्या खांद्यावर महंतांचे प्रेमळ हात पडले. 'बेटा, घाबरलास होय? अरे, म्हणून तर मी इथे तुला येऊ देत नव्हतो. पण आता तुझा तू आला आहेस आणि 'झिऊ जिऊ' नावाच्या सुईच्या शास्त्राशी तुझा पूर्ण परिचय झाला आहे तर आता तू बाहेर चल...' असे म्हणून महंतांनी पुन्हा समईची ज्योत लावली आणि ते शान-सूला घेऊन बाहेर पडले.

सांगाड्यावरून शान-सूला एकसारखी त्याच्या आजीची आठवण येत होती. आई-आजी आता काय करीत असतील? त्यांना वाटत असेल की मी लामा झालोय... अखेर एक दिवस त्याने घरी जाण्याबद्दल महंतांकडे गोष्ट काढली आणि त्यांनीही त्याला आनंदाने अनुमती दिली.

...मजल दरमजल करीत शान-सू घरी परत आला. आपल्या जन्मगावी आला आणि घराजवळ येताच घर पडलेले पाहून खिन्न झाला. गावातल्या नदीला पूर येऊन त्याचे घर पडून गेले होते. आई-वडील घरात कुणीच नव्हते. पडक्या घरात तो गेला तेव्हा एका कोपऱ्यात त्याची आजी अजूनही अंथरुणात पडलेली त्याला दिसली. ती मृत्यूपंथाला लागलेली होती.

झटपट बटवा बाहेर काढून त्याने चार सुया बाहेर काढल्या आणि त्या तो आजीच्या हातापायांना टोचू लागला. पण त्या आत जातच नव्हत्या, कशा जाणार? हाडांना सुया कशा टोचल्या जाणार? मग मात्र त्याला महंतांचे शब्द आठवले-माणसाला चैतन्य तत्त्व निर्माण करता येत नाही. फक्त त्याला चैतन्य तत्त्वाचा समतोल व्यवस्थित ठेवण्याचा प्रयत्न करता येतो.

❑

घड्याळ

घड्याळ हा काही चीनचा शोध नाही. कारण कालमापन यंत्र बनवण्याचा प्रयत्न जगात सर्व ठिकाणी होत होता. चीनप्रमाणेच इतर पुरातन संस्कृतीतही कालमापनाचे प्रयत्न होत होते. परंतु घड्याळाचे आजचे जे यांत्रिक रूप तयार झाले आहे त्यात चीनचा वाटा मोठा आहे.

निसर्गक्रमावरून मानव कालमापन करू लागला. पावसाळा, पानगळ, थंडी, उन्हाळा यावरून मानवाला ऋतूंचे ज्ञान झाले. रात्रीच्या आकाशदर्शनावरून ऋतूंची, महिन्यांची, वर्षाची विभागणी मानवाने अधिक अचूकपणे केली. पुढे सावलीवरून मानव दिवसाची विभागणी करू लागला. त्यानंतर किंवा कदाचित त्याही आधी त्याने घटिकापात्र बनवले. मेणबत्तीच्या संथपणे जळण्यातून मेणबत्तीचे घड्याळ त्याने तयार केले. त्यानंतर वाळूच्या गळण्यावरून वालुकायंत्र तयार झाले.

मात्र यापुढे यांत्रिक घड्याळ तयार होण्यास बराच अवधी लागला. इसवी सनाच्या १३व्या शतकात प्रथम जर्मनीत 'न्यूरेंबर्ग एग' नावाचे यांत्रिक घड्याळ तयार झाले. त्यानंतर १७व्या शतकात गॅलिलिओने लंबकाच्या झोक्याचे नियम मांडले आणि घड्याळाच्या प्रगतीला खरीखुरी चालना मिळाली. शास्त्रज्ञ ह्यूजेन्स आणि हूक यांनी घड्याळात स्प्रिंगचा उपयोग केला. औद्योगिक क्रांतीमुळे घड्याळाची छोटी छोटी यंत्रे बनवण्यासाठी मोठी मोठी यंत्रे निर्माण झाली. गेल्या ५० वर्षांत घड्याळामध्ये आणखी एक क्रांतिकारक घटना घडली. क्वार्टझ्च्या कंपनावर आधारलेले इलेक्ट्रॉनिक घड्याळ, १९५० पासून पुढे येऊन घड्याळाचे काटे निघून गेले आणि अचूकपणा कमालीचा वाढला. आता तर काय सेसीयम अणूंच्या प्रकंपनांवर आधारलेले अणु-घड्याळ बनवले गेले आहे. सुमारे ३००० वर्षांत ते फक्त एक सेकंद मागे-पुढे जाईल.

घड्याळ निर्मितीचा हा त्रोटक इतिहास पाहिला की १३व्या शतकापूर्वी घड्याळ बनवण्याचा प्रयत्न कसा होत होता याकडे मन वळते. याच काळात चिनी लोकांनी घड्याळ बनवले. इसवी सनाच्या पहिल्या शतकात 'सू सँग' राजाच्या पदरी असणाऱ्या एका शिक्षकाने लंबकावर चालणारे आणि धर-सोड चक्र असणारे घड्याळ बनवले. हे घड्याळ फार मोठे होते. त्या घड्याळाच्या रचनेचे आराखडे उपलब्ध आहेत. हे थोडे आश्चर्यकारक वाटले तरी ते सत्य आहे. कारण लंबकाचे नियम गॅलिलिओने शोधले असले तरी जगात लंबक तत्त्वाचा वापर सर्वत्र होत होता. दातेरी चक्रांचे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी आपण आणि चिनी-इजिप्शियन लोक मोट-रेतीचा घाणा चालवायला अशी लाकडी चक्रे वापरत होतो.

आता काळ बदलला आहे. अनेक मीटर्स आता विजेवर चालू लागली आहेत आणि धर-सोड चक्राच्या बदली इलेक्ट्रॉनिक्स आयुधे बाहेर येत आहेत. तरीही धर-सोड चक्राचे महत्त्व फारसे कमी झालेले नाही. म्हणूनच चीनचा धर-सोड चक्राचा शोध फार महत्त्वाचा वाटतो.

❑

घड्याळ करते टक.... टक.... टक....

खिंगन पर्वतांची रांग मांचूरिया आणि मंगोलिया यांच्या मध्य भागावर कुठे तरी मिळते. तिथे एका खेड्यात ऊ-नूचे वडील रहात होते. ते सधन शेतकरी होते. पाच-सहा मोठे मळे, अनेक 'ली' पसरलेली शेतीची जमीन, भले मोठे घर, सभोवती बाग, डुकरांचा आणि कोंबड्यांचा कोंडवाड्याएवढा मोठा खुराडा... त्यांना तसे काही कमी नव्हते. एक मोठी काळजी मात्र त्यांना लागून राहिली होती. त्यांचा एकुलता एक मुलगा-आता तेरा चौदा वर्षांचा झाला तरी शेतीवाडीकडे लक्ष देत नव्हता. छांदिष्टासारखा तो सतत यंत्रकामात दंग झालेला असे. आणि यंत्रकाम कसले? ना त्याला काही अर्थ ना किंमत. सुतळ-दोरा झोका तयार कर, लाकडाचे दातेरी चक्र तयार कर, ठाक ठोक कर... ऊ-नू चे हे असले चाळे पाहून नू-बाबा सतत त्याच्या भवितव्याचा विचार करीत रहात.

आतासुद्धा ते घराच्या व्हरांड्यात खुर्चीवर बसून गरम गरम चहा घेत होते. त्यांच्यासमोर त्यांची शेती पसरलेली होती. शेते कापणीला आली होती. वारा आला की पिकू लागलेल्या शेतावर पिवळट-पोपटी लाटा धावू लागत... दाणे खायला छोटी छोटी पाखरे थव्याने शेतात शिरत... भुर्कन उडून जात... निळ्या आकाशावर ती चिमुकली पाखरे काही तरी अक्षरे गिरवू लागत.

'धनीशेट, धनीशेट...' कुणाचा तरी आवाज वाड्यात उमटला. नू- बाबा थोडे पुढे जातात तोच चार-पाच कामकरी घाबरेघुबरे होत आले आणि तोंडातून शब्द फुटत नव्हते तरी सांगू लागले,'धनीशेट, घात झाला, आपल्या शेतावर भुताटकी सुरू झाली. धपाधपा दगड पडू लागलेत!'

'... हे दगड आपल्या कुटुंबाच्या कबरस्थानाकडून येताहेत.'

'कडेच्या विहिरीवरचे रहाटगाडे मोडून पडले.' प्रत्येक कामकरी भुताटकीची एकेक गोष्ट सांगत होता. तोच नू-बाबांची तरुण आणि चवथी बायको पुढे येत म्हणाली,'ऊ-नूच्या आजीच्या नावाची उदबत्ती कबरस्थानात लावली नाही म्हणून हे झालं.'

'तू चूप!' नू एकदम खवळून म्हणाला. त्याने रागारागाने इकडे तिकडे पाहिले. जवळपास काठी नव्हती. पण एक कोंबडी मात्र क्क क्क क्क करीत व्हरांड्यात आली. नूने ती कोंबडी अलगद पकडली आणि झपकन आपल्या चौथ्या बायकोच्या अंगावर फेकली. चौथी बायको त्या कोंबडीने एकदम बिचकून गेली आणि बांधावर चढणाऱ्या शेतातल्या चिचुंद्रीसारखी धपकन खाली पडली. तिला उठताही येईना. आपण सुंदर ठरावे म्हणून लहानपणापासून तिने पायाची वाढ खुरटी करून टाकली होती व पाय चामड्याच्या पट्ट्याने आवळून, करकचून बांधले होते.

'चला! पाहू! पाहू कुठे आहे भूत. माझ्या आईचे भूत होणेच अशक्य...' नू रागारागाने बाहेर

पडला. मालक स्वतःच बाहेर पडला तेव्हा कामकरी लोकांनाही पाठोपाठ जावेच लागले.

जाता जाता एक कामकरी तरीही धीर करून म्हणाला,'धनीशेट, मी घरी जाऊन येऊ? माझ्या पणजोबाने घुबडाची पिसे कोल्ह्याच्या केसात बांधून ठेवलेली आहेत. ती घेऊन मी आलोच...' असे म्हणत तो कामकरी पळतच सुटला. नूने एकदा त्याच्याकडे पाहिले आणि तो तसाच झपाझपा चालू लागला. आपले आई-आजी-आजोबा यांचे भूत होईल ही कल्पनाच नूला सहन होत नव्हती.

पण कबरस्थानातल्या पाचव्या विहिरीपाशी नू आता जाऊ लागणार तर त्याचेही पाय लटपटू लागले. तो स्वतः पहात होता, विहिरीवरून धपकन दगड येतोय, खाली शेतात पडतोय. भुर्कन चिमण्या-[illegible] थवा उडतोय... पुन्हा दुसरा दगड गरगरत येतोय... आकाशाने आपल्या नशिबी लिहिलेय तरी काय?

पाचव्या विहिरीवर तो दोन महिन्यांपूर्वी आई वारली तेव्हा गेला होता. नंतर नूला तिथे जाण्यास सवडच मिळाली नव्हती, इतका तो शेताच्या कामात गुंतून पडला होता. आईच्या थडग्यावर उदबत्ती लावायला आपण विसरलो हे आपल्या चौथ्या बायकोचे म्हणणे बरोबर होते.

या विहिरीजवळून पाठीमागच्या टेकडीवरचा एक ओढा वहात येत होता. त्यामुळे विहिरीजवळ गर्द हिरवे झुम्मड रान माजले होते. फताडे हिरवे अळू, लव्हाळे, कळकीचे बेट... दिवसासुद्धा इथे रातकिड्यांचा आवाज घुमत राही. सळसळत साप जाई आणि एखाद्या ढोलीत घुबड घूत्कार करीत राही... आठवणीसरशी नूने मागे पाहिले. आपल्या त्या कामकऱ्याला घुबडाची पिसे कोल्ह्याच्या केसात ठेवलेला तो ताईत आणायला आपण सांगायला हवा होता... एक चुटपुट नूच्या मनात राहिली. तो घाबरतच पुढे पावले टाकू लागला. तोच एक दगड त्याच्या आणि त्याच्या माणसांच्या रोखाने आला...सर्वच घाबरून थबकले, झाडाच्या फटीतून दूर पाहू लागले. एक पांढरे फडके वर आलेले त्यांना दिसे... पुन्हा नाहीसे होई... पुन्हा दिसे...

एकमेकाला चिकटूनच ते आता पुढे जाऊ लागले. तोच जाळीत काहीतरी खसखसले. एक काळा कुत्रा त्यांना आत जाताना दिसला. त्याच्या नरड्यात हाड अडकले असावे. तो कसा तरी विचित्र भुंकत होता. घुबडाच्या घूत्कारात कोल्ह्याचे विव्हळणे मिसळावे तसे...

पुढे जावे? की परतावे? असा विचार नू आणि त्याच्या बरोबरीची मंडळी करतात तोच फडक्याचा तो झेंडा वर उंच उडत फडफडत जाताना त्यांनी पाहिला. गोफण फिरवावी तसा तो फडफडत जात होता आणि त्या फडक्यातून दगड बाहेर पडत होता. हे पाहता पाहता ते सर्वजण टेकडीचे वळण चढून वर आलेही आणि समोर पाहतात तो काय...

... समोर त्यांचा छोटा ऊ-नू गवतावर मस्त आरामशीर लोळत होता. त्याच्या तोंडात एक गवताची काडी होती. आणि ही काडी चघळत तो अधून मधून हात लांबवून समोरच्या झोळीत दगड भरत होता. विहिरीवरची पाणचक्की ऊ-नूने ठाकठीक दुरुस्त केली होती. ही पाणचक्की म्हणजे वरच्या बाजूला फळ्या बसवलेले एक लाकडी पिंप होते. पिंपावर झऱ्याचे-ओढ्याचे पाणी पडून फळ्या पुढेपुढे सरकवल्या जात. पिंप

फिरले की पिंपाचा अक्ष फिरू लागे. या अक्षावर झोळी दोरीने बांधलेले होती. ती झोळी वरवर हवेत गोफण फिरवल्यासारखी गिरक्या घेत राही. तिच्यात दगड भरला की तो दगड धपकन बाहेर शेतात फेकला जाई. अशी सगळी गंमत होती.

छोट्या ऊ-नूला पाहून त्याचे वडील नू आनंदाने पुढे सरसावले. त्यांनी त्याला मिठी मारली. मग कामकऱ्यांना म्हणाले,'लोकहो, माझा नू कामाला लागला. आज तिसऱ्या महिन्याचा तिसरा दिवस आहे. तेव्हा मी तुम्हांला सागुतीचे जेवण देतो. जा पाहू, पकडा त्या काळ्या कुत्र्याला... नाही तरी त्याच्या गळ्यात हाड अडकले आहे...'

तिसऱ्या महिन्याच्या तिसऱ्या दिवशी मोठे जेवण झाले. मेजवानीचे. शेतावरचे मजूर, कामकरी, शेजारी-पाजारी नाचगाणे करून जेवून गेले. पण ऊ-नू काही शेताच्या कामाला लागला नाही. तो आपला स्वतःच्या मचाणात छोट्या झोपडीत यंत्र बनवत राहिला. सुतळीचा लंबक, दातेरी चक्र, हातोडा, खिळा-विटा... त्याचे प्रयोग करणे वाढतच गेले. सकाळी शेतावर फेरफटका मारायचा, काम करतोय असे वडिलांना दाखवायचे आणि यंत्राकडे वळायचे.

शेतावर हिंडता हिंडता ऊ-नूला एक दिवस एक लाकडाची मोठी टाकी मिळाली. ती गळत होती म्हणून पडून होती. पण या टाकीचे घड्याळ करता येईल असे ऊ-नूला वाटू लागले. कल्पना सुचल्याबरोबर तो कामाला लागला. एकात एक जाणारे दोन बांबू त्याने कापून आणले. या बांबूचे त्याने चक्राचे अक्ष असते तसे अक्ष बनवले. अक्षाला काटा जोडला. एक तबकडी केली. टाकीत पाणी भरून ती केव्हा रिकामी होते हे पाहिले. नंतर त्याने पुन्हा टाकी भरून घेतली. या टाकीत लाकडाचा ठोकळा तरंगत ठेवला. ठोकळ्याला दोरी लावली. ती टाकीबाहेर काढून बांबूच्या अक्षावर गुंडाळली... टाकीतले पाणी जसे कमी होऊ लागले तसा तो लाकडी ठोकळा खाली खाली जाऊ लागला. पाण्याची पातळी खाली येत होती. ठोकळा खाली खाली येताना दोरा खेचला जात होता आणि हा दोरा बांबूच्या अक्षावर गुंडाळला होता म्हणून बांबू फिरू लागला... काटा फिरू लागला... सकाळ, दुपार, संध्याकाळ वेळेप्रमाणे... सरकणाऱ्या काळाप्रमाणे काटा सरकत होता.

शेजारीपाजारी येत होते. ऊ-नूचे घड्याळ पहात होते आणि बाहेर आल्यावर त्याची हेटाळणी करीत होते.'सकाळ आहे की दुपार आहे, हे कळायला घड्याळ कशाला हवे?' कुणी तरी पुटपुटला आणि त्याला दुसऱ्याने हसत हसत उत्तर दिले, 'बाबा रे, आपल्याला नको पण या सावकाराच्या पोराला हवे. तो तात्सो आहे ना!'

'तात्सो' हा पुरातन काळातला बिरबल होता, चिनी लोकांचा. त्यामुळे ही सर्व हेटाळणी ऊ-नूच्या प्रयोगावर आहे हे सर्वांना कळत होते. ऊ-नूच्या कानावर हे सर्व येत होते. पण ऊ-नूला त्याचे काही वाटत नव्हते. तबकडीवर अनेक भाग करून प्रत्येक क्षण दाखवता येईल असे काही तरी करावे असे ऊ-नूला वाटत होते. अक्षावर दातेरी लाकडी चक्र बसवायचे आणि दातेरी चक्राचा एक दाता एका वेळी पुढे येईल असे

करायचे... ऊ-नू स्वतःच्या मचाणात [illegible]. दात्याचा एकच भाग कसा पुढे येईल... तिकडे ऊ-नूचे वडील त्याच्या नावाने हाका मारत [illegible]. [illegible]-सोड चक्र बनवण्यात गर्क होता.

एक दिवस ऊ-नू बाजारा[illegible] [illegible]वर एक कोंबडेवाला दोन कोंबड्यांची झुंज खेळवत होता. त्याच्याभोवती बघणाऱ्यांची गर्दी [illegible]. ऊ-नू धावपळ करीत गर्दीत उभा राहिला आणि आतुरतेने पाहू लागला. कोंबडेवाल्याचे दोन्ही कों[illegible], [illegible]ले होते. एक पांढरा पांढरा शुभ्र तर दुसरा लाल-जांभळ्या पिसांचा. दोघांच्या डोक्या[illegible] सूर्याहून लाल तुरा. दोघांचे पाय साल निघालेल्या, वाळलेल्या डहाळीसारखे टणक आणि [illegible] चोचा धारदार... एकमेकाला मारायला दोघेही पवित्रे घेत होते. कोबड्यांचा खेळ करणारा कोंबड्यांना चेवाचेवाने एकमेकांच्या अंगावर जाण्यासाठी हातवारे करीत होता.

ऊ-नू पहात होता. झुंज रंगात आली. पांढऱ्याने पिसे फुलारून जांभळ्यावर झेप घेतली. पण जांभळ्यानं दोन पावले मागे येऊन ती झेप हुकवली आणि झपकन गिरकी घेऊन अशी जोरदार उडी घेतली आणि बाकदार चोचीने घाव केला... दोन्ही कोंबडे घायाळ होत होते... मागे पुढे होत होत झुंज खेळत होते. लोक टाळ्या पिटत होते.

तेवढ्यात ऊ-नूच्या डोक्यात एक कल्पना आली. दातेरी चक्रावर दोन पट्ट्या बसवल्या आणि एकदा एका पट्टीने एक दात पकडला, तर एकदा दुसरीने...

ऊ-नू आपल्या घड्याळाच्या धर-सोड चक्राचा विचार करतोय तोच गर्दीत आरडाओरड सुरू झाली. लढता लढता पांढरा कोंबडा गर्दीबाहेर पंख फडफडवत निघून गेला. सर्व लोक त्याला पकडायला धावले. ऊ-नू ही पळत सुटला. पण तो पळत पळत घरी आला.

चौथ्या आईने दिलेला गरम गरम चहा त्याने ढसाढसा ढोसला आणि आपल्या यंत्राच्या मचाणाात धाव घेतली. लाकडी दातेरी चक्र बाहेर काढले. ते समोर धरले. या चक्राला आठ दाते होते. परस्परांसमोर येणाऱ्या दोन दात्यांवर त्याने दोन पट्ट्या दाबून धरल्या. एक पट्टी हळूच काढली. चक्र एक दात्याने पुढे सरकले. दोन कोंबडे एकमेकांशी जसे लढत होते, चोचा मारत होते तशा दोन पट्ट्या दात्यांना चावा घेत होत्या, सोडत होत्या.

ऊ-नूला कमालीचा आनंद झाला. आता त्याला असे चक्र बनवता येणार होते की ज्या चक्राचा एक दाता पुढे सरकू शकेल. पण हे हाताने कोण सरकवत रहाणार?

विचार करता करता त्याला त्याच्या मचाणात एक बांबू दिसला. धनुष्याच्या आकाराचा हा वाकडा बांबू त्याने जेव्हा तोडला तेव्हापासूनच वाकडा होता. या वाकड्या बांबूला त्याने दोरीचा लंबक लावला होता. लंबकाचा झोका हलू लागला की ही धनुष्याची कमान डुलत असे. पि—पा वाद्यासाठी त्याने पूर्वी असे केले होते. पण आता ऊ-नूने याच धनुकलीवरती टोकाला दोन पट्ट्या बसवल्या. बराच खटाटोप करून लंबकाला

झोका देऊन चक्राचे दोन विरुद्ध असणारे दाते आपोआप पकडले जातील असे केले. आता त्याने हे चक्र रहाटगाडग्याच्या अक्षावर जोडले. अक्षाचा फेरा फिरू लागला आणि लंबकाचा झोका एका वेळी एक दाता पकडून चक्रला हळूहळू फिरवू लागला...

ऊ-नूचे वडील दिवसा-दिवसाला संतापत होते. पोरगा शेतावर जात नव्हता. कामाकडे लक्ष देत नव्हता. पेरणी-कापणी-झोडणी कशात देखील ऊ-नू लक्ष घालत नव्हता. बाजार करीत नव्हता. बी-बियाणे आणत नव्हता. सतत आपला शेतावर ठेवलेल्या लाकडी बुजगावण्यासारख्या लंबक-चक्राच्या यंत्रावर वेड्यासारखा काम करीत होता. ना एक दिडकीची कमाई, ना एक तुकड्याचा फायदा. अखेर एक दिवस मनात विचार करून ते कमरेवर हात ठेवत ऊ-नूच्या मचाणात आले. तो काम करीत होता...

... ऊ-नूला त्या लाकडी बुजगावण्याबरोबर पाहून नू बाबांच्या डोक्यात अशी कळ शिरली. त्यांनी ते लाकडी चक्र-लंबकाचे यंत्र खसकन खेचले आणि पार दूर फेकून दिले. एका कामकऱ्याला ते पार शहराच्या रस्त्यावर कचरापेटीत टाकायला सांगून ते ऊ-नूला बरोबर घेऊन शेतावर गेले आणि स्वतः सतत ऊ-नूला आपल्याबरोबर घेऊन शेताचे काम पाहू लागले.

शहराच्या कचरा पेटीत कामकऱ्याने लाकडी यंत्र टाकल्याबरोबर त्याच्या भोवती चार कावळे जमले. कावकाव करून निघून गेले. एक कुत्रा आला आणि पिंपावर शू करून गेला. गाढव आले. कोवळ्या बांबूची साले खाऊन निघून गेले. एक वेडा आला आणि बुजगावण्यासारखे ते यंत्र त्याने उभे केले, मग तो खो खो करून हसू लागला. नंतर थोडा विचार करून त्याने ते यंत्र खांद्यावर टाकले व झेंडा खांद्यावर घेऊन चालावे तसा तो ऐटीत चालू लागला. त्या वेड्यापाठोपाठ चार चुकार मुलेही आरडाओरड करीत जाऊ लागली. पुढे ही मिरवणूक शहराच्या हमरस्त्यावर आली. उनाडटप्पू लोकही त्या मिरवणुकीत सामील झाले.

ही मिरवणूक एका शाळेवरून जात असताना शाळेतून बाहेर पडणाऱ्या एका शिक्षकाने पाहिली. वेड्याच्या खांद्यावरचे लाकडी दातेरी चक्र, लंबक हे सर्व पाहून त्या शाळेतल्या शिक्षकाला घड्याळाची आठवण आली. तो शिक्षकही घड्याळ बनवत होता. तरातरा जाऊन त्याने त्या वेड्याला खड्रूंची थैली दिली. थैली पाहून वेडा खो खो हसला. झटकन त्याने हातातले लाकडी बुजगावणे शाळा मास्तरांना दिले आणि थैली उलटी करून खडूंवर पाय दिले. तो थयथय नाचला. थैली उलटी करून त्याने डोक्यावर घातली आणि मिरवणूक पुढे चालू झाली...

...शाळामास्तराने ऊ-नूचे ते लाकडी यंत्र नीट तपासले. अनेक प्रयोग करून त्याने खरेखुरे घड्याळ बनवले.

ऊ-नू आता बराच म्हातारा झाला होता. त्याला नातू झाले होते. शेतीवाडीत लक्ष घालून ऊ-नू फार श्रीमंत शेतकरी झाला होता. नातवांच्या आग्रहावरून ऊ-नू राजधानीत आला. नातवाने बोट धरून त्याला राजधानीतले वस्तुसंग्रहालय पहायला नेले. राजवाड्यात भरवलेले हे वस्तुसंग्रहालय फार पाहण्यासारखे होते.

या संग्रहालयात एक मोठे घड्याळ होते.

... ऊ-नू नातवांची बोटे धरून ते घड्याळ पाहू लागला आणि ते पाहता पाहता ऊ-नूला एकदम आठवले की आपल्या लहानपणी आपण असेच घड्याळ बनवत होतो. प्रथम आपण पाणचक्कीवर चालणारी गोफण बनवली. मग गळणाऱ्या पिंपाचे आपण काटे फिरणारे घड्याळ बनवले. नंतर लाकडी दातेरी चक्राचे धर-सोड चक्र, लंबक, धनुकली...

...ऊ-नू विचार करतोय तोच वाटाड्या म्हणाला, 'हे मोठे घड्याळ ज्या एका कल्पनेवरून निघाले ती कल्पना एका जुन्या-पुराण्या नमुन्यावरून निघाली. तो नमुना इथे या कपाटात ठेवला आहे.'

वाटाड्याने कपाट उघडले.आत एका कोपऱ्यात ऊ-नू चे ते जुनेपुराणे यंत्र उभे करून ठेवले होते. ते पाहिल्याबरोबर ऊ-नू ला इतके गहिवरून आले. तो नातवाचा हात सोडून एकदम पुढे झाला आणि दोन्ही हात उभारून त्या आपल्या जुन्यापुराण्या घड्याळाच्या यंत्राला हात लावायला पुढे झाला.

..पुढे झाला आणि धपकन खाली पडला. त्याला आनंदाचा झटका येऊन त्याचे हृदय बंद झाले होते. शरीराचे धर-सोड चक्र, नेहमी टक् टक् करणारे शरीराचे घड्याळ एकदम बंद पडले होते!

❑

५००० वर्षांपूर्वीपासून मेसापोटेमियातील लोकांना काचेचे भिंग माहीत होते. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात ग्रीक लोकांना भिंगाबद्दल कल्पना होती. प्रसिद्ध संशोधक आर्किमिडीझ हा तर शत्रूपक्षाची जहाजे भिंगाने जाळणार होता. असे असले तरी भिंगासारख्या बाह्य वस्तूची मदत घेऊन मानवी इंद्रियाची कमतरता भरून काढण्याची कल्पना प्रथम चीनमधेच वापरली गेली. चीन मध्ये १०व्या शतकात ओबडधोबड स्वरुपाचा चष्मा बनवला गेला आणि मानवी दृष्टीतील कमतरता काढून टाकण्याची कल्पना प्रथम चीनमध्येच वापरली गेली.

१३व्या शतकात युरोपमध्ये चष्मा आला. इटली आणि इंग्लंडमध्ये त्याचा वापर सुरू झाला. गॅलीलिओने दुर्बिण बनवून आकाशाचा वेध घेतला तेव्हापासून दृष्टीदोष आणि भिंग यांची सांगड घातली जाऊ लागली. १७२७ ला एडवर्ड स्कार्लेट याने कानावर बसवता येणारी चौकट बनवली. त्यामुळे चष्मा हा एकदम सुटसुटीत झाला आणि त्याला अलंकरणरूप प्राप्त झाले. १७८४ला बेंजामिन फ्रँकलीन याने द्विकेंद्री (बायफोकल) चष्मे बनवले. तेव्हापासून चष्मा हा खाजगी मालमत्ता या स्वरूपात पुढे येऊ लागला.

काचेच्या भिंगात सूर्यकिरणांना एकवटण्याचे गुण असतात हे जरी मानवाला कळले होते तरी डोळ्यातील भिंगाची कमतरता बाह्य भिंगाने सुधारण्याची कल्पना ही फार महत्वपूर्ण गोष्ट ठरली. केवळ या प्रयत्नातून मानवी डोळ्याची माहिती प्रयोगाने मानवाला झपाट्याने होऊ लागली. त्यासाठी त्याने अनेक आयुधे बनवली आणि शास्त्रशुद्धपणे या विज्ञानशाखेची वाढ केली. पुढे ऱ्हस्वदृष्टिदोष-मायोपिया, दीर्घदृष्टीदोष-हायपरमेट्रोपिया, वृद्धावस्थेतील दृष्टिदोष-प्रेसबोपिया वगैरे न्यूनांवरती उपचार होऊ लागले. चष्म्याला शास्त्रशुद्ध स्वरूप येऊ लागले. चष्म्याची फ्रेम गुळगुळीत प्लॅस्टिकची होण्यापर्यंत मजल जात असतानाच चष्म्याच्या काचाही अनेकविध रूपे घेऊ लागल्या. प्रकाशपरावर्तिका म्हणजे सन ग्लासेस-गॉगल्स निघाल्या. पोलराईड काचा, फोटोसेन्सिटिव्ह काचा अशा पायऱ्या घेत ही प्रगती होत राहिली. आता तर चष्मा आहे की नाही हेही कळू नये आणि चेहरा नैसर्गिक अवस्थेत रहावा म्हणून भिंगाच्या बुबुळीका (कॉन्टॅक्ट लेन्सेस) उपलब्ध आहेत.

भिंगासारख्या बाह्य वस्तूला माणसाने स्वतःच्या सुखसोयीसाठी कसे राबवले ते चष्म्यावरून आपल्या लक्षात येते. परंतु माणसाची या प्रांतातली प्रगती एवढ्यावर थांबत नाही. डोळ्यावर डोळे बसवल्यानंतर त्याने प्रचंड वेगाने ज्ञानविस्तारात प्रगती केली. कॅमेरा, बायनॉक्यूलर्स, मायक्रोस्कोप, स्पेक्ट्रोस्कोप वगैरे नियंत्रण यंत्रे (मेझरिंग इन्स्ट्रुमेन्टस) त्याने तयार केलीच आहेत. शिवाय लेसर किरणांच्या सहाय्याने ऑप्थेलमोस्कोप वगैरे यंत्रे घडवून तो आता नेत्र शल्यचिकित्सेच्या प्रांतात गरुडभरारी मारत आहे.

आजचे हे यश दहाव्या शतकातील ओबडधोबडपणे घासून बनवलेल्या पहिल्या चिनी चष्म्याचे यश आहे, हे पाहिले की चीनच्या या शोधाचे कौतुक वाटू लागते. प्रकाशीय विज्ञान (ऑप्टीकस) या शास्त्रशाखेला खरीखुरी गती चष्म्यामुळे मिळाली असे म्हटले तरी ते पटण्यासारखे आहे. ❑

मी डोळयांना डोळस केले !

छोटा वांग-चू घराशेजारील एका तळ्याजवळ मजेत उभा होता. तळ्याजवळ अळवाची अनेक झाडे उगवलेली होती. हिरव्यागार अळवाच्या पानावर पाण्याचे लोलक मध्यभागावर चमकत होते. नुकतीच पावसाची सर येऊन गेली होती. पावसामागोमाग आता पिवळे धम्मक ऊन आले होते. पाने वाऱ्यावरती हळूहळू डोलत होती. त्यांच्या पोटात साठलेले पाण्याचे डोळे खाली न लवंडता चमकत होते. वांग चूला मजा वाटत होती. तो टाळ्या पिटीत 'वा! फार छान!' असे म्हणत त्या डोळ्याकडे पहात होता. मधूनच आपल्या तुमानीच्या खिशातून काचेचा तुकडा काढून त्या तुकड्याकडे आणि अळवाच्या पानातील डोळ्यांकडे पहात होता...

रस्त्यावरून लोक जात होते. गावाबाहेरून एक भली मोठी भिंत बांधण्याचे काम राजेसाहेबांनी काढले होते. जो तो त्या भिंतीच्या कामावर नोकरीसाठी जात होता. हातात दुपारची शिदोरी घेऊन ते लोक जात होते... वांग-चूकडे पहात ते लोक म्हणत होते-'मजा आहे या पोराची. याला कधी नोकरीवर जायला नको. आपल्यासारखे उन्हा तान्हात मरमरून काम करायला नको. जेडचे चार खडे विकले, थोडी फसवाफसवी केली की झाले!गडगंज पैसा मिळतोय याच्या काकाला...'

रस्त्यावरून जाणारे लोक वांग-चूबद्दल असे म्हणत होते, पण खरी परिस्थिती निराळी होती. वांग-चूच्या वडिलांनी अत्यंत निष्ठेने जेडच्या खड्यांचा धंदा स्थापन केला होता. सचोटीने आणि चिकाटीने हा धंदा मोठा केला होता. पण ते वारले आणि त्यांच्या पाठीमागे वांग-चूच्या काकाने हा धंदा हातात घेतला. सचोटीऐवजी काका फसवणूक करू लागला. हाताखालच्या लोकांना मारपीट करून कामाला बसवू लागला. अत्यंत क्रूरपणे हा काका फक्त स्वतःचे पोट पाहू लागला.

... वांग-चू आता घरात यायला निघणार तोच काका रागारागाने त्याच्यासमोर आला आणि त्याला खसकन ओढून त्याने घरात नेले. आतल्या खोलीत कामावर बसविले. आतल्या अंधाऱ्या खोलीत समोर स्टूल ओढून वांग-चू काम करू लागला. त्याची आई एका स्टुलावर जेडचे खडे ठेवून निवडण्याचे काम करीत होती. घरातली सर्व मंडळीही आपापली कामे करीत होती. कोणी दगडी खड्यांमधून जेडचे खडे नेमके बाजूला ठेवण्याचे काम करीत होते. तर कोणी खडे घासून पुसून स्वच्छ करीत होते. एकजण खड्यांना गुळगुळीत बनवत होता. तर दुसरा खडे घासून गोल-चौकोनी-त्रिकोनी बनवत होता.

जेडचे खडे कापण्याचे काम वांग-चूला करायला आवडत होते. पण ते काम काका त्याला कधी देतच नव्हता. काका त्याला फक्त निवडण्याचे, हलके काम देत असे. जेडचा खडा करायला कौशल्य लागत होते म्हणून म्हणा किंवा काकाचा वांग-चू वरती विश्वास नव्हता म्हणून म्हणा, पण ते काम त्याला करायला मिळत नव्हते आणि वांग-चूचे हात तर खडे कापायला उतावीळ झाले होते

कुरकुरत कुरकुरत वांग-चू काम करू लागला. मधूनच तो आपल्या खिशातून **काच काढून** समोरच्या स्टुलावरचे जेडचे खडे त्या काचेतून पाही. काका मागे येतोय का हे पाहून घाबरून काच लपवून ठेवी. इतर लोक मरमरेस्तोवर काम करीत राहात. जेडचा खडा हाती लागला की आनंदाने आरडाओरडा करीत. खडा साधा निघाला, हिरवट रंगाऐवजी पिवळट-पोपटी निघाला की मालक काका त्या खडा देणाऱ्या माणसाच्या अंगावर ओरडे. बहुतेक वेळा निवडलेला खडा जेडचाच असे. पण काका मात्र बहाणा करी,'खडा साधा आहे!| गारगोटीचा आहे!'

रात्री जेडचे मणी ज्याने जास्त शोधून काढले त्याला मेजवानीचे जेवण मिळे. बहुतेक वेळा हे निवडून काढणारा काकाचा मुलगाच असे. त्याला मधात घोळवलेले बदक, मोड आलेल्या दाण्यांची उसळ आणि बांबूच्या कोवळ्या कोंभाचे लोणचे जेवायला मिळे. वांग-चू आणि त्याची आई या दोघांना सदोदित जेवायला भाताची कांजी मिळे. तेवढी तरी मिळतेय ना! यावर संतुष्ट होऊन वांग-चूची आई दिवस ढकलीत असे.

जेडचा खड्यात आपला काका फार फसवाफसवी करतो याचा छोट्या वांग-चूला राग येत असे. तो त्याच्या डोळ्यांनी पाहात होता. गरीब बिचारे लोक मोठ्या आशेने त्याच्या घरी येत. कुणाचे डोके दुखत असे, कुणाचे पोट, कुणाच्या हातापायातून शक्तीच उरलेली नसे, तर कुणाच्या पोटातून कळा येत राहात... असे सर्व रोगी वैद्यांचे उपाय संपले की जेडचा खडा अंगठीत नाही तर ताईतमध्ये बांधून गुण येतो का हे पाहायला येत असत. काका कुठलाही खडा त्यांच्या गळ्यात बांधत असे...

वांग-चूला वाईट वाटे. आपल्या काकाने हे असे फसवाफसवीचे वागणे सोडावे असे त्याला वाटे. पण ते शक्य नव्हते. काकाला फसवणुकीने गडगंज पैसा मिळत होता... वांग-चू आई सांगत असे त्याप्रमाणे सरळ चालत होता... खोटे बोलणे टाळत होता... सकाळी आईबरोबर बुद्धदेवाच्या मंदिरात जायचे, दिवसभर काकाच्या हाताखाली राबायचे आणि संध्याकाळी वेळ मिळाला की एकटेच दूर कुठे तरी जाऊन आपली काच घासत रहायचे...

काच घासून घासून दोन टोकाला निमुळती होत जातेय तेवढी तिच्यातून दिसणारी चित्रे अधिक स्पष्ट आणि मोठी दिसतायत असा एक शोध वांग-चूला लागला होता. परंतु या शोधाविषयी त्याला कुठे काही बोलता येत नव्हते. तो फक्त स्वतः कधी मुंग्यांचे वारुळ तर कधी कलिंगड त्या काचेतून पाहात राही... काचेमधून पदार्थ मोठे का दिसतात? हा प्रश्न त्याला पडत होता. तो शाळेत, जात असता तर, मास्तरांना हा प्रश्न विचारता आला असता. पण मग काकाच्या कारखान्यात काम कोणी केले असते?

...एक दिवस सकाळची वेळ होती. तो तिसऱ्या चंद्राचा सणाचा दिवस होता. आता लवकरच पतंगाचा सण येणार होता. शेते कणसांनी भरलेली होती. हिरव्या गवतावर डुकरे मस्त माजलेली होती. सगळीकडे आनंदी वातावरण होते. आईला घेऊन वांग-चू बुद्ध देवांच्या पॅगोडाला गेला होता. देवळात आईने उदबत्त्या लावल्या. वांग-चू चांगला मोठा, श्रीमंत होऊ दे असा नवस तिने केला. नंतर वांग-चूला घेऊन ती घरी

येऊ लागली. वांग-चू एकटाच जरा पुढे जात होता. आता तो तसा मोठा झाला होता. हात धरून चालण्याइतका कुकुलं बाळ राहिला नव्हता.

रस्त्यांवरून दोन मदारींचा उंट सामानाचे भले मोठे बोचके घेऊन दुडुक दुडुक चालीने जात होता. दोन मदारींच्या खळगीवरती सामान बांधलेले होते. चालता चालता त्या डोलाऱ्यातले काही तरी खाली पडले. खळकन फुटल्याचा आवाज आला. चिखलासारखे काळे तुकडे इतस्ततः विखुरले.

वांग-चूची आई ते पाहून कमालीची घाबरून गेली. दोन मदारींच्या उंटाच्या पाठीवरून पडलेले काही पाहू नये. तो फार मोठा अपशकून धरला जात असे. पडलेली वस्तू जितकी क्षुद्र, कवडीमोल तितकी त्या अपशकुनाची तीव्रता अधिक. घाबरून आईने रस्त्यावरच बसकण घेतली.वांग-चू सुद्धा घाबरून गेला. तेवढ्यात त्याला एक कल्पना सुचली. चिखलासारखी सांडलेली वस्तू ही चहाची वीट आहे आणि हा चहा राजधानीकडे जात आहे हे वांग-चूच्या लक्षात आले. त्याने खिशातली काच काढली. काचेमधून त्याने तो चिखलासारखा दिसणारा तुकडा नीट काळजीपूर्वक न्याहाळला. खरोखरच तो चिखल नव्हता तर चहाची भुकटी दाबून तयार केलेली वीटच होती ती.

' म्हणजे हा अपशकुन नाही. चहाची वीट सोन्याहून महाग असते!' तो आईला म्हणाला. पण आई फार खचून गेली होती. एका मदारीच्या उंटावरून सामान खाली कोसळले तर ते ठीक होते, पण दोन मदारींच्या उंटावरुन सामान कोसळणे हा अपशकूनच होता... आपले आणि या वांग-चूचे होणार तरी कसे? या एका विचाराने आई भयभीतच झाली होती. रस्त्यावर पिवळी वस्त्रे घातलेला आणि डोक्याचे मुंडण केलेला एक भिक्कू उभा होता. अपशकुनाबद्दल त्याला विचारावे असे ठरवून ती वांग-चू ला म्हणाली, 'अरे तू घरी जा. मी येते या भिक्कू महाराजाना अपशकुनाबद्दल विचारून.'

वांग-चू धावतच घरी पळाला. घराशी तो आला आणि एकदम थबकला. त्याच्या घराजवळ दहा घोड्यांची एक गाडी थांबलेली होती. दहा घोडे म्हणजे येणारा माणूस सरदार बिरदारच असावा. आता आपला काका या श्रीमंत माणसाच्या गळ्यात 'जेड' म्हणून काचेचा मणी मारणार, त्याला फसवून पुष्कळ पैसे काढणार... वांग-चू चे ओठ रागाने थरथरत होते. तो हळूच घरात शिरला. एका खांबाआड उभा राहून, आत काय चाललेय ते पाहू लागला.

आतल्या खोलीत वांग-चूचा लबाड काका त्या श्रीमंत सरदाराला जेडचे अनेक खडे दाखवत होता. सरदाराजवळ त्याची लहान मुलगी बसली होती. तिच्या डोळ्यावर रुमाल बांधला होता, त्यावरून वांग-चूने जाणले की या मुलीसाठी जेडचा खडा आणायला हा सरदार आलेला आहे. आता काचेचा खडा डोळ्याचे दुःख कमी करण्यासाठी पुढे केला जाईल...

...वांग-चूच्या मनात येत होते तेच झाले. त्याचा काका एक खडा हातात घेऊन त्या सरदाराला म्हणाला, 'हा जेडचा खडा डोळ्यावरती औषध म्हणून वापरा. आज तिसरा चंद्र आहे.असे दहा तिसरे चंद्र झाले

की या मुलीचे डोळे आपोआप सुधारतील.'

'या खड्याची किंमत किती?'सरदाराने विचारले.

'फक्त एक हजार टेल नाणी!'काकाजी हसत हसत म्हणाले.

सरदार नाणी देण्यासाठी थैलीचे तोंड आता उघडणार तोच वांग-चू पुढे आला. तो जोरात म्हणाला, 'हे साफ खोटे आहे. हा खडा काचेचा आहे. जेडचा नाही. या काचेतून पाहा...'असे म्हणून त्याने आपल्याजवळची काच पुढे केली. पण तेवढ्यात रागारागाने काकाने ती काच उडवून दिली. चार दोन गिरक्या मारत ती चमकदार काच दाराबाहेर पडली आणि भिक्कूकडून अपशकुनाच्याबद्दल माहिती काढून येणाऱ्या वांग-चू च्या आईच्या पायाशी पडली.

वांग-चूची काच म्हणून तिने ती उचलली. घरात वांग-चूने काही तरी घोटाळा केला असावा हे तिच्या लक्षात आले. दाराबाहेर दहा घोड्यांची गाडी आणि ही बाहेर फेकलेली काच. ती घाबरून थरथरत बाहेरच उभी राहिली. भिक्कू म्हणाले होते की दोन मदारीच्या उंटाचा अपशकून जर चहाची वीट पडली असली तर उत्तम फळ देईल...हा भिक्कू भारतवर्षात भगवान बुद्धदेवांच्या गया क्षेत्राहून शिकून आला होता... दाराजवळ उभी राहून ती चोरून पाहू लागली.

...इतक्यात तो सरदार जेडचा खडा न घेता बाहेर पडला. घोड्याच्या गाडीत येऊन बसला आणि गाडी थोडी पुढे जाऊन थांबली. गाडी दारापुढून जाते न जाते तोच काकाने वांग-चूच्या कानफटात मारली आणि त्याला बडवत बडवत घराबाहेर काढले. पार घराबाहेर ढकलले...

धुमसत धुमसत वांग-चू आईच्या कुशीत शिरला. रडत राहिला. मग थोड्या वेळाने ते दोघे रस्त्यावरून जाऊ लागले. ते चार पावले गेले असतील नसतील तोच सरदाराची दहा घोड्यांची गाडी त्यांच्या जवळ आली. सरदाराने हात करून वांग-चूला आत घेतले. या मुलामुळे आपली फसगत झाली नाही हे सरदाराने ओळखले, त्याने रडणाऱ्या वांग-चूला थोपटले, शांत केले. मग तो हळूच वांग-चूला म्हणाला, 'पोरा, तू कशावरून म्हणतोच की तो जेडचा खडा नाही?'

वांग-चूने आपल्या खिशातली काच काढली. मग तो म्हणाला,'जेडचा खरा खडा या काचेतून केवढा झगमगताना दिसतो! तो खडा मुळीच झगमगत नव्हता.'

सरदाराने काच हातात घेतली. फडक्याने ती पुसली. मग डोळ्याजवळ नेऊन त्याने आपल्या बोटातला अंगठीचा खडा त्या काचेमधून पाहिला...केवढा झगमगत होता तो! 'ओ हो!' सरदार ओरडला... त्यासरशी त्याची मुलगी पुढे झाली. डोळ्यावरचा रुमाल काढून तिनेही काचेतून पाहिले. एरव्ही अस्पष्ट, तुटक, पुसट दिसणाऱ्या तिच्या डोळ्यांना या काचेतून चांगलेच ठळक दिसायला लागले होते. ती मोठ्या आनंदाने टाळ्या पिटत होती... नीट दिसायला लागले म्हणून गाणे गायला लागली होती... वांग-चूसुद्धा आनंदाने तिच्या बरोबर गाणे गात होता.

... टप टप टप टप. टप टप टप... संथपणे दहा घोडे पावले टाकत, झपा झपा सरदाराच्या भल्या मोठ्या वाड्याकडे जात होते. वांग-चूला आता तो सरदार स्वतःच्या घरीच घेऊन जाणार होता. त्याला शाळेत धाडणार होता आणि पुष्कळ काचा आणून देऊन त्याला काचांचा धंदा काढून देणार होता. ज्याला डोळ्याने दिसत नाही अशा माणसांना आता वांग-चू त्याच्या जादूच्या काचा करून देणार होता...

❑

छपाई यंत्र

छपाई यंत्र हा चीनने जगाला दिलेला सर्वात मोठा शोध आहे. या शोधामुळे जगात साक्षरतेचा प्रसार फार झपाट्याने होऊ लागला. चीनमध्ये हा शोध आठव्या नवव्या शतकात लागला असावा. पण युरोपमध्ये त्याचा प्रसार होण्यासाठी अठरावे शतक उजाडावे लागले. कागदाचा शोध लागल्यानंतर चीन देशात छपाई यंत्राचा शोध लावण्यासाठी धडपड चालू झाली होती. सर्वसाधारण बोलण्याचालण्यापुरती अक्षरे बहुतेकांना येत असत. पण भाषेचा खराखुरा विकास होत नव्हता. पाठांतर करता येत नव्हते. आपल्याकडे भाषेचा विकास संस्कृत पाठांतराने झाला. यामुळे चीनमध्ये छपाई यंत्राचा शोध लागणे ही एक अत्यंत गरजेची गोष्ट झाली. सुगशाहीत (९६०-१२७९) निरनिराळ्या प्रकारचे छपाई खिळे बनवण्यात आले. पुढे पिशेंग या चिनी माणसाने इ. स. १०४३ मध्ये भाजलेल्या मातीतून छपाईचे खिळे बनवले. अशा तऱ्हेने या शतकात 'कन्फ्युशियसचे धर्मशास्त्र' हा ग्रंथ छापला गेला आणि हाच जगातला पहिला छापील ग्रंथ असावा.

आज छपाईचे तंत्र फार प्रगत झाले आहे. छपाई तंत्राचे दोन प्रमुख भाग पडतात. एक 'खिळा छपाई' व दुसरा 'शिळा छपाई' पैकी खिळा छपाई या तंत्राचे ज्ञान प्रथम चीनने जगाला दिले. नंतर युरोपमध्ये जर्मन संशोधक गुटेनबर्ग याने ते तंत्र युरोपला शिकवले. या तंत्रात प्रत्येक अक्षराचा एकेक खिळा कोरून तयार केला जातो. शिळा छपाई या छपाईचे तंत्र १७९८ मध्ये जर्मन नाटककार ॲलोईस सेनी फिल्डर याने प्रस्थापित केले. या तंत्राचे तत्त्व असेः एका सपाट शिळेवर अक्षरे अथवा चित्र हे उलटे आणि तेलकट शाईने रेखाटायचे. मग ही शिळा पाण्यात बुडवायची. यानंतर तिच्यावर कागद दाबायचा. दाब समान पडण्यासाठी वरवंट्यावर (रोलर) मऊ वस्त्रांचे आवरण बांधायचे. पाणी आणि तेल एकत्र होत नसल्यामुळे हे यंत्र यशस्वी होते. हल्ली रेखाटन उलटे काढण्याऐवजी सरळ काढतात. पण त्याचा छाप रबरी पॅडवर घेऊन मग कागदावर टाकला जातो.

तंत्राबरोबर यंत्रातही फार प्रगती होत गेली. सुंदर छपाई आणि अनेकपट कामाचा उरक या दोन गोष्टींवर लक्ष ठेवून सुंदर छपाई करण्यात येऊ लागली. अनेक रंगांची छपाई होऊ लागली. हाताने चालणाऱ्या यंत्राऐवजी पॉवर प्रेस आला. तो मागे पडून त्याची जागा रोटरी मशीनने घेतली. हात मशीनवर एका तावाच्या छापून २००० प्रती काढायला जेवढा वेळ लागे तेवढ्या वेळात ३२ तावांच्या ५०,००० प्रती रोटरी प्रेसवर काढण्यापर्यंत प्रगती होऊ लागली. आता तर काय, इलेक्ट्रॉनिकचा वापर छपाई तंत्राकडे करण्यात येऊ लागला आहे. या तंत्राचा उरक केवळ आश्चर्य वाटण्याइतका आहे. मायक्रोफिल्म म्हणजे अत्यंत लहान अक्षरांतली फोटोग्राफी आणि टेपकॅसेट म्हणजे चुंबकीय तत्त्वावर लोखंडी रिबिनीवर साठवलेला मजकूर या दोन गोष्टी आणि इलेक्ट्रॉनिक हे तिसरे तंत्र ही तीन तत्त्वे उद्या 'छापणे' ही गोष्टच कालबाह्य म्हणजे मोडीत गेलेली ठरवतील.

असे असले तरी या छपाईची गंगोत्री म्हणजे मूळ उगमस्थान चीन देशात, शेवरीच्या झाडांचे लाकूड कोरणे या क्रियेत आहे हे आपण विसरता कामा नये. ❑

पानें भरली शब्दफुलांनी

नदीला नुकताच पूर येऊन गेला होता. नदीला पूर येणे ही गोष्ट चीनमधल्या त्या प्रदेशातील रहिवाशांना नेहमीची गोष्ट झाली होती. पुराचे पाणी घरांखालून वाहून जावे म्हणून घरे बांबूच्या खांबांवरती बांधून काढत. तरीही मोठा पूर आला की अशी घरे कोसळून पडत. झोपड्या वाहून जात. अनेक कुटुंबे रस्त्यावर येत. बेघर होत. आकाशातील देवाचा कोप झाला की त्याला कोण अडवणार? पूर ओसरला की नदीकाठचे लोक दुःखी अंतःकरणाने आपापल्या घराकडे येत. जे काही उरले सुरले सामान, लाकडी पेट्या, वेताच्या खुर्च्या, भांडी असेल ते गोळा करीत आणि पुन्हा संसार उभारू लागत.

नदीकाठावरून दोन लहान मुले चालत होती. एकमेकांच्या हातात हात घालून ती जात होती. ती मुले जुळी होती. घाईगर्दीने ती चालत होती. पुराने झोपड्या पडल्या आहेत, घरे पडली आहेत, घरातली चीजवस्तू वाहून गेली आहे आणि राहणारे लोक आक्रोश करीत आहेत याकडेही लक्ष न देता ती जात होती. तसे लक्ष देणे त्यांना जमणारही नव्हते. नेहमीच्या कामावर ती मुले गेली नाहीत तर त्यांना कुणी खायला देणार नव्हते, प्यायला देणार नव्हते. कामावर जायला त्यांना वेळ झाला तर ते ज्या सुताराकडे जात होते तो चाबकाने त्यांना फोडून काढणार होता हे नक्कीच होते...

चालता चालता त्या दोघांपैकी एकाचे म्हणजे चियांगचे लक्ष दुसऱ्याच्या सदऱ्याकडे गेले. या सदऱ्यावर डाग पडला होता. तो डाग म्हणजे अक्षराचा छाप होता. तो पाहून चियांगने आपल्या जुळ्या भावाचा सदरा ओढला आणि तो म्हणाला 'अरे चिंग, हा डाग कसला पडला आहे?'

चिंगने अंगातला सदरा काढला. मग तोही त्या डागाकडे पाहू लागला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की पुराचे पाणी आले तेव्हा आपण उंचावर असलेल्या स्मशानभूमीकडे धावत गेलो. रात्री त्या स्मशानभूमीतच एका थडग्याला टेकून झोपलो. त्यावेळी हा डाग पडला असावा. थडग्यावर अक्षरे काढलेली असतात. रंग ओला असल्यामुळे हा डाग पडला असावा... सदरा अंगात घालता घालता चिंग म्हणाला,'चल दादा, वेळ होतोय. डाग काय धुतला की जाईल. पण वेळ झाला तर सुतार फटकावून काढील.'

मग ते दोघेही भाऊ भराभर गल्लीबोळ ओलांडत सुताराकडे पोचले. वाटेत पक्षीवाला पक्ष्यांचा खेळ करीत होता. एका टोकाला गोष्टी सांगणारा माणूस गर्दी जमवून गोष्ट सांगत होता. त्या दोघांनाही थांबण्याचा मोह होत होता. पण ठसे करणाऱ्या सुताराकडे कामावर जायला वेळ झाला असता. ते चालत राहिले. अखेर सुताराचे घर आले.

चियांग आणि चिंग घाबरत बिचकत आत शिरले त्यांना पाहून सुताराने हातातला चाबूक हवेत वाजवला आणि आवाज काढला. गुपचूप दोघेही कामाला लागले. इतर लहान मुले, मोठी माणसे काम करीत होती. कोणी अक्षरांचे ठसे बनवत होते, कोणी अनेक ठशांना एकत्र बांधून ठेवत होते. जो तो आपापल्या कामावर

लक्ष केंद्रित करीत होता. आजूबाजूला शेवरीच्या झाडाचे काटे, मऊ मऊ लाकडे पसरलेली होती. चाकू, सुरीची पाती, हातोडा पडलेले होते. सुतार मुलांच्या रांगारांगामधून चाबूक फटकारत फिरत होता. आवाज काढत होता. टंगळमंगळ करणाऱ्याच्या पाठीवर चाबकाचा आवाज उठे. तो बिचारा कळवळून ओरडे.

ठसे करण्याचा तो एक छोटा कारखाना होता. राजाला नवे नवे फतवे काढण्यासाठी सरपंचामार्फत हा सुतार ठसे पुरवत असे. फतव्यामधली अक्षरे पहायची आणि त्या अक्षरांच्या उलट ठसा करायचा. चियांग आणि चिंग हे उत्तम कारागीर होते. त्यांचे हात कामावर झपझप चालत. पण ते दोघेही अनाथ होते. म्हणून स्मशानभूमीच्या पलीकडे असणाऱ्या 'लिबाय सी' म्हणजे प्रार्थना देवालयात ते रहात. म्हणून त्यांच्याविषयी एक तऱ्हेचे भीतिदायक वातावरणही तयार झाले होते. त्यांच्याशी कुणीच फारसे बोलत नसे.

इतक्यात गावाचा सरपंच नवा हुकुमनामा घेऊन आला. या हुकुमनाम्याच्या राजाला प्रती काढून हव्या होत्या. त्यासाठी ठसे काढण्यासाठी तो सुताराकडे आला. समोरच त्याने चियांग-चिंग या जुळ्या मुलांना पाहिले. तो सुताराला म्हणाला,'अरे ही दोन मुले तर ठसा आणि ठशाचा छाप दिसावा तशी तंतोतंत दिसतायत!' सुताराने सरपंचाच्या कानात काही तरी सांगितले. मुले स्मशानात भुताखेतात राहतात, हे सांगून सुतार सरपंचाला घेऊन दूर आत निघून गेला.

संध्याकाळी कारखाना सुटल्यावर चियांग-चिंग निघाले. चालता चालता चियांगच्या पायाला दगडासारखे काही तरी लागले. ते त्याने ठोकरले. पाहतो तो काय? ते एक छोटे कासव होते. कासव उलटे पाठीवर पडले आणि चार पाय बाहेर काढून हलत राहिले. चियांगने एक दगड घेतला आणि कासवाला ठार केले. मग तो चिंगला म्हणाला,'आज आपण या कासवाची आमटी करू. मी याची पाठ स्वच्छ करून ठेवीन. माझ्याकडे आणखी एक पाठ आहे. या दोन पाठींची मी एक पेटी बनवणार आहे. मग त्या पेटीत आपण पैसे ठेवू.'

चियांग असे म्हणायला आणि दूरच्या देवालयातून घंटानाद व्हायला एकच गाठ पडली. चिंग ते पाहून म्हणाला,'दादा, हा शुभशकुन आहे. आपण पेटीमध्ये खूप खूप पैसे ठेवू. सुतारासारखे आपण पैसे जमवून एक कारखाना काढू.'

'मी तेच म्हणतोय!'चियांग म्हणाला. चियांगच्या डोळ्यापुढे सरपंचाने आणलेला फतवा, या फतव्यातली अनेक अक्षरे उभी होती. तो चिंगला म्हणाला,'ही एवढी अक्षरे कोरून त्यांचे ठसे तयार करायला एखादा नवा मार्ग काढायला हवा.'

'समज हे ठसे आपण लाखेचे बनवले तर?' चिंग म्हणाला. आणि त्याने आपल्या दादाकडे पाहिले.

'लाखेपेक्षा आपण ते चिनी मातीचे करू या,' चियांग म्हणाला...'लाखेचे ठसे टणक होणार नाहीत.'

... असे बोलत बोलत ते जात होते तोच नेहमीचे स्मशान आले. चिंगच्या सदऱ्यावर अक्षराचा ठसा उमटला होता, त्याची चियांगला आठवण आली आणि तो थडग्याजवळ थबकला. या थडग्यावर कोरलेले अक्षर चिंगच्या सदऱ्यावरच्या ठशासारखे दिसत होते. शिवाय या थडग्यांवरती नावे खरवडून काढलेली असत. पण हे थडगे एका श्रीमंत माणसाचे होते. संजगिऱ्याचा ठिसूळ दगड घेऊन त्या दगडातून अक्षरे कोरलेली होती. वर आलेल्या त्या अक्षरांवरचा रंग अजून वाळलाही नव्हता. चिंग या अक्षरांना टेकून बसला असावा. त्यामुळे तो डाग त्याच्या सदऱ्यावर उमटला होता.

किती तरी वेळ चियांग त्या अक्षरांचा विचार करीत होता. ठसे कोरायला सोपे गेले पाहिजे... विचार करता करता तो चिंगला म्हणाला,'अरे, आपण संजगिऱ्याचा दगड आणून त्याच्यावर अक्षरे कोरली तर? लाकडापेक्षा ते सोपे जाईल. वेळ कमी लागेल. शिवाय हा दगड टेकडीवरती सहज मिळू शकेल.'

चियांग आणि चिंग दोघे स्मशानभूमीवर उभे होते. जवळच एक पुरलेले प्रेत उकरलेले दिसत होते. चिंग घाबरत घाबरत त्याकडे पहात होता. चियांग त्याला म्हणाला,'घाबरू नको. अरे हे कोल्ह्याचे काम आहे.'

'मला तर भूतच वाटले,'चिंग म्हणाला,

त्यावर चियांग खदखदून हसला. मग चिंग आणि तो त्यांच्या धर्मशाळेत म्हणजे प्रार्थन मंदिरात गेले.

दुसऱ्या दिवसापासून चियांग आणि चिंग दोघेही मन लावून संजगिऱ्याच्या पांढऱ्या दगडावर अक्षरे कोरू लागले. दिवसा सुताराकडे काम करायचे आणि रात्री इथे येऊन संजगिऱ्याच्या दगडावर अक्षरे कोरत रहायचे. चियांग आणि चिंग दोघे मिळून काम करीत असत. दोघे जुळे होते दिसायला सारखे. मनानेही ते एकच आहेत असे वाटे. चिंग संजजिऱ्याचे दगड ठराविक चौकोनी आकाराचे घासून पुसून तयार करी. त्यावरचे अक्षर चियांग कोरत राही. एकाच मापाचे एकेक अक्षर करून अशी अक्षरे ते बनवून ठेवत. 'नूऊ'म्हणजे बायको, 'दा' म्हणजे मोठा, 'कू' म्हणजे रडणे. एकेक अक्षराचे दगडी खिळे तयार होत होते.

आता बरेच खिळे तयार झाल्यावर चियांग-चिंग एक दिवस सरपंचाकडे गेले. सरपंचाकडून त्यांनी एक फर्मान प्रती काढण्यासाठी आणले. जी अक्षरे त्यांच्याजवळ नव्हती ती त्यांनी तयार केली. मग या खिळ्यांना शाई लावून त्यांनी सरपंचाच्या फर्मानाच्या प्रती काढल्या. झटपट त्या सरपंचाला नेऊन दिल्या. आता त्यांना बरे पैसे मिळू लागले. सरपंचाकडून काम आणून ते झटपट वेळेवर पुरे करून देत होते. सुताराकडे कामाला जाणेही त्यांनी सोडून दिले. त्यांना बरे पैसे मिळत होते. कासवाच्या पेटीत दोघेही पैसे साठवत होते.

पण त्यांच्या या धंद्यामुळे सुतार संतापला. त्याला लाकडाचे खिळे कोरायला वेळ लागत होता. शिवाय प्रत्येक नव्या फर्मानासाठी तो नवे ठसे बनवत होता. चियांग-चिंग ही जोडी तेच तेच खिळे वापरत होती. त्यामुळे सुताराचा धंदा बसत चालला. सरपंचाचे काम होत होते. राजाला हव्या तेवढ्या सुंदर अक्षरातल्या प्रति

पुरवून तो राजाकडून पैसे मिळवत होता. पण सुतार रसातळाला जात होता.

एक दिवस संध्याकाळी त्याने चियांग-चिंग ही जुळी जोडी फोडण्याचा बेत केला. गावामधून सरपंचाकडून ते दोघे परत येत असताना त्यांच्या मागे तो लपत छपत स्मशानभूमीकडे गेला आणि झुडुपात लपून त्याने भला मोठा धोंडा त्यांच्या डोक्यावर फेकला. पण त्याचा नेम चुकला. गप्प मारत चालणारे चियांग-चिंग पुढे गेले आणि धोंडा प्रेते उकरणाऱ्या कोल्ह्याच्या अंगावर पडला. कोल्हा घाबरून बिचकून झुडपातून बाहेर पडला. त्याच्या तोंडात एक हाड होते. झुडपात लपलेला सुतार कोल्ह्याला पाहून भेदरून धावत सुटला. धावता धावता गावाच्या अलीकडे खाली पडला आणि रक्त ओकून भीतीने मरून गेला.

या पुढे राजाचे सर्व काम चियांग-चिंग या जोडीकडे येऊ लागले आणि ते दोघेही झटपट प्रतींवर प्रति काढून देऊ लागले. चिंगचे अक्षर एकदम सुरेख होते. चियांगचे कोरीव काम छान होते. राजाकडे चियांग-चिंगचे वजन वाढत होते. सरपंचाला या जुळ्या मुलांचा हेवा वाटू लागला. पण त्यांच्याशिवाय त्यांचे काम होत नव्हते. कसेही करून ही जोडी फोडायला हवी असे त्याला बऱ्याच वेळा वाटे. पण सुताराचे उदाहरण डोळ्यांसमोर होते. त्यामुळे त्याला या मुलांची भीतीही वाटे. राजाला मध्ये घालून ही जोडी फोडायची असे त्याने मनात ठरवले आणि तशा योजना तो आखू लागला.

दगडामधून ठसे कोरणाऱ्या या मुलांना भेटण्याची राजाने एकदा इच्छा व्यक्त केली. 'इतक्या सुंदर प्रति काढणारे हे आहेत तरी कोण? या माझ्या नागरिकांना मला भेटायचे आहे!'राजा सरपंचाला म्हणाला.

सरपंचाने ती संधी साधून राजाला सांगितले की आपणच समक्ष त्यांच्याकडे जाऊ या. अशासाठी की या दोन भावांपैकी एकजण भूत आहे. आणि दुसरा खरा माणूस आहे... मग सरपंचाने राजाला या मुलांमुळे सुतार कसा मेला ती हकीकत सांगितली. या जुळ्यांपैकी एकजण भूत आहे. त्यामुळे कोल्हे, तरस, ड्रॅगन आणि हैवान या मुलांना ठसे करायला मदत करतात. तेव्हा राजेसरकार समक्ष त्यांच्या घरी आले तर ही मुले काय करतात हेही सरकारस्वारीला पाहता येईल. शिवाय जो मुलगा भूत आहे त्याला आपण ठार मारू शकाल...' सरपंच म्हणाला.

'पण कुठला मुलगा भूत आहे हे कसे कळणार?' राजाने विचारले.

'सोपे आहे महाराज! भुताचे सगळेच उलटे असते. या मुलांपैकी एक जण डावरा आहे. तो तरी भूत असेल अथवा दुसरा भाऊ भूत असेल. तुम्ही त्या दोघांना लग्नासाठी विचारा. जो तयार होईल तो माणूस. जो होणार नाही ते भूत ठरेल. शिवाय आपल्याबरोबर तुम्ही राजज्योतिषी, रमल विद्या जाणणारा, मांत्रिक, भूतपिशाच्च जाणणारा यांना घ्या. काही सैनिक घ्या. शूर आणि सशस्त्र.'

'ठीक आहे. उद्या आम्ही येतोच!' राजा म्हणाला.

सरपंचाचा डाव असा होता की राजा एका मुलाला घेऊन जाईल. दुसऱ्याला भूत म्हणून ठार करून टाकील. जुळे भाऊ आहेत ते. त्यांना वेगळे केले की त्यांचे काम करणे बंद होईल. शिवाय ते दगडानी

अक्षरे, अक्षरांचे ठसे कसे तयार करतात हेही आपल्याला कळेल. एका दगडात दोन पक्षी मरतील. एकदा ठसे बनवण्याचे गुपित कळले की आपले काम झाले. मग आपण राजाची मर्जी सतत मिळवत राहू. खूप पैसा कमवू.

... राजा मांत्रिक, रमल विद्येचा पंडित, डोक्यावर शिरस्त्राण घातलेले सैनिक यांना घेऊन आला. बरोबर सरपंचही आला. राजा आला तेव्हा चियांग-चिंग एका अक्षराचा ठसा बनवत होते. संर्जगऱ्याचा दगड अणकुचीदार पात्याने चियांग कोरत होता आणि चिंगने आपल्या वळणदार अक्षरात फर्मान लिहून काढले होते. आता तो एकेक अक्षर उलटे लिहून काढत होता. या उलट्या अक्षरांचे ठसे बनवायचे... मग... दोघेही मन लावून काम करीत होते तोच त्यांना सरपंचाच्या हाका ऐकू आल्या... ते झोपडीबाहेर येणार तोच राजाच त्यांच्यासमोर आला. या जुळ्या मुलांचे 'पॅन कू' सारखे तजेलदार तेजस्वी रूप पाहून राजा इतका आनंदाने फुलून आला की ते दोघे वाकून त्याला नमस्कार करतायत तोच त्याने दोघांना आनंदाने जवळ ओढून घेतले आणि आपल्या बाहुपाशात घेता घेता झटका बसल्यासारखा एक हात त्याने एकदम मागे घेतला. या दोघांपैकी एकजण भूत आहे हे त्याला आठवले. मग मांत्रिक पुढे झाला. त्याने दोघांचे हात पाहिले. रमल विद्या जाणणारा दोघांकडे टवकारून पाहू लागला आणि शिरस्त्राण घातलेल्या सैनिकांनी आपापली शस्त्रे सावरली.

राजा दोघांकडे टकमक पहात होता. दोघेही तंतोतंत सारखे दिसत होते. फक्त चिंग डावरा होता. त्यामुळे तो उलटी चित्रे सफाईने काढतो असे राजाला वाटले. पण या दोघांपैकी भूत कोण? हे मात्र अजून कळत नव्हते.

अखेर राजालाही राहवले नाही. या दोघांपैकी भूत कोण आहे? आणि माणूस कोण आहे? हे जाणून घेण्यासाठी तो त्या दोघांना म्हणाला,'बाळांनो, मी तुमच्या गुणांवर, रूपावर फार खूष झालो आहे. पण तुमच्या दोघांपैकी एकालाच मी राजवाड्यात घेऊन जाईन आणि त्याला माझा जावई करीन. जो इथे राहील त्याला खूप पैसा देईन. तेव्हा बोला, तुमच्या दोघांपैकी माझ्या मुलीशी लग्न करायला कोण तयार आहे?'

'महाराज, तुम्ही या माझ्या डावऱ्या भावाला-चिंगला घेऊन जा.'चियांग म्हणाला.

'छे छे! तुम्ही माझ्या दादाला-चियांगला न्या. तो कसा राजबिंडा दिसतो. त्यालाच राजकन्या शोभून दिसेल.'

'मी नाही. मला नको ते वैभव. हा कलावंत आहे. हाच राजकन्येला शोभेल,' चियांग पुन्हा म्हणाला आणि झोपडीबाहेर पडला. पलीकडच्या बाजूला एक तरस की कोल्हा प्रेत उकरत होता. आपल्या भावाला राजा लग्नासाठी घेऊन जातोय तेव्हा अशुभ काही घडायला नको म्हणून त्याने तरस-कोल्हा ओरडण्यापूर्वीच त्याला हाकलण्याचे ठरवले आणि धोंडा हातात घेऊन चियांग धावला.

मांत्रिकाने ते पाहून राजाच्या कानात काही सांगितले,'महाराज, जो बाहेर गेला तो माणूस आहे. भूत हे तरस-कोल्हा-काळे मांजर यांच्या रूपाने वावरते. त्यावर हल्ला करणारा माणूसच असू शकतो. एका भूताला दुसऱ्या भुतावर हल्ला करता येत नाही...'

राजाच्या खुणेसरशी सर्वजण घोड्याकडे धावले. पटापट घोड्यावर बसले. एक सैनिक मागे राहिला. रिकाम्या घोड्यावर दूर गेलेल्या चियांगला मारून मुटकून बसवण्यात आले आणि त्यांचे घोडे राजवाड्याकडे पळत सुटले. चियांगला घोड्यावरून जाता जाता भडभडून येत होते. आपल्या जुळ्या भावाशिवाय आपण जगूच शकत नाही हे त्याला पटले. घोडेस्वार दूर राहिले आहेत हे पाहून त्याने अलगद नदीच्या पुलावरून पाण्यात झेप घेतली...

इकडे चियांगला घेऊन राजा गेला आणि चिंग एकदम खालीच बसला. त्याचे डोळे पाण्याने भरून आले. आता आपण एकटे कसे काय जगणार... डोक्यावर हात घेऊन तो रडत राहिला. मागे सरपंचाने संधी साधून उरलेल्या सैनिकाला खूण केली आणि चिंगच्या डोक्यात एक भला मोठा धोंडा घालून त्याचे प्रेत त्याने नदीत फेकून दिले... मग आनंदाने त्याने चियांग-चिंग करीत होते ते खिळे, संजगिऱ्याचे अर्धवट कोरलेले दगड, चिकण मातीचे ठसे उचलले आणि सरपंच घराकडे पळत सुटला... हसत, खिदळत सोन्याची खाण मिळाल्यासारखा...

... राजा राजवाड्यात शिरला. घोड्यावरून उतरला. मांत्रिक, सैनिकही उतरले आणि पाहतात तो काय एक घोडा रिकामाच धापा टाकीत उभा राहिला आहे. राजा भीतीने शहारला. पण लगेच त्याला आठवले,'अरे, हा रिकामा घोडा आहे. म्हणजे झोपडीत उरलेला मुलगा खरा आहे. आपण आणत होतो तो भूत होता... चला, झोपडीतल्या मुलाला घेऊन या...'

झपाझपा घोड्यावर बसून राजासकट सर्वजण भरधाव घोडा सोडत झोपडीकडे जाऊ लागले. पण मधेच नदीपाशी त्यांना गर्दी दिसली. पाहातात तो काय? लहान मुलांची दोन प्रेते तरंगत तरंगत तिथे आलेली! त्यातला एक चिंग होता आणि दुसरा राजा ज्याला जावई करणार होता तो चियांग. आणि छपाईचा ठसा आणि छाप यासारखी ती मुले उलट सुलट, तंतोतंत एकसारखी दिसत होती. नदीचा प्रवाह त्या दोघांना वाहून नेत होता आणि पुढे युगानुयुगे वाहून नेत राहणार होता-ठसा आणि छापाच्या रूपाने स्मृति जतन करीत!

❑

भूकंप निर्देशक

भूकंप निर्देशकाचा शोध चीनमध्ये प्रथम लागला असा ऐतिहासिक दाखला मिळत असला तरी भूकंप निर्देशक म्हणून चिनी लोकांनी जे यंत्र किंवा खेळणे बनवले होते ते मनाची पकड घेत नाही. इसवी सनाच्या आरंभी चँग हेंग याने (इ. स. १३२) हा भूकंप निर्देशक बनवला. एका तांब्याच्या भांड्यावर हेंग याने अष्टदिशा दाखवणारे आठ ड्रॅगन बसवले होते. या ड्रॅगन प्राण्यांच्या तोडात त्याने आठ चेंडू दोऱ्याने लोंबकळत ठेवले होते. चेंडू त्याने अशा तऱ्हेने बसवले होते की भूकंपाची थरथर झाली की एखादा चेंडू खाली पडे. या पडलेल्या चेंडूवरून भूकंपाची दिशा कळत असे.

भूकंप निर्देशनाच्या निर्मितीतून एक महत्त्वाची गोष्ट दिसून येते आणि ती म्हणजे भूकंपासारख्या नैसर्गिक प्रकोपाची चाहूल घेणे. ही चाहूल घेणे, कुठे-कुठल्या दिशेला भूकंप झाला असावा हे अजमावणे या गोष्टी त्या प्राचीन काळी फारच महत्त्वाच्या होत्या. कारण इसवी सनाच्या सुरुवातीला रस्ते आखीव-बांधीव नव्हते. दळण-वळणाची साधनेही नव्हती. भूकंप झालेल्या ठिकाणी कुमक-मदत पाठवायची म्हणजे प्रथम सांडणी स्वाराकडून वार्ता येणार. नंतर राजाकडून भूकंपग्रस्त प्रदेशाकडे अन्न-धान्य शुश्रूषा याची मदत जाणार...अशा या प्राचीन काळी 'भूकंप अमक्या दिशेला झाला'एव्हढे कळणेही पुष्कळ महत्त्वाचे ठरते.

नैसर्गिक आपत्तींविषयी अनुमान बांधण्याची या शोधात दिसणारी मानवी प्रवृत्ती ग्रीक कालखंडात किंवा भारतीय विज्ञान इतिहासात दिसून येत नाही. प्रसिद्ध ग्रीक शास्त्रज्ञ ॲरिस्टॉटल (इ.स. पूर्व तिसरे शतक) आपल्या 'मीटीऑरिकस' या ग्रंथात भूकंप-ज्वालामुखी यांच्या निर्मितीची चर्चा करतो. परंतु या भूकंपाचा 'कानोसा' घेण्याचा प्रयत्न ग्रीक पंडित करताना दिसत नाहीत. त्यामुळे चिनी लोकांचा हा शोध महत्त्वाचा वाटतो. उद्रेक-केंद्र (एपीसेंटर), कंप-काल (पीरीयड) आणि भूकंपाची तीव्रता या सर्व गोष्टी भूकंप मापकामार्फत (सेसीमोग्राफ) टिपल्या जातात. भूकंपांच्या प्रदेशांचे नकाशे काढले जातात आणि रीतसर सर्व नोंदणी तक्त्यांत केली जाते. भूकंपाची 'रिश्टर' तीव्रता प्रत्येकाला समजून येते...

डॉक्टर जेम्स हटन (१७२६-१७९७) यांच्यामुळे भूशास्त्र (जीऑलॉजी), भूस्तरशास्त्र (पॅलीऑटॉलॉजी) आणि भू-उद्रेक शास्त्र (सेसीमोलॉजी) वगैरे शास्त्रांचा आता फार झपाट्याने विकास होऊ लागला आहे. रशियन शास्त्रज्ञ तर या शास्त्रशाखेत बरेच पुढे गेले आहेत. तरीही अजून भूकंप केव्हा होणार? याचे भाकीत तसे अचूकपणे करता येत नाही. फक्त त्याची शक्यता सांगता येते. भूकंपाची पूर्वसूचना निश्चितपणे देता येत नाही. म्हणून त्याला रोखून धरण्याचा प्रयत्नही करता येत नाही-भूकंप रोखून धरणे आणि त्याचा आघात सर्वत्र समप्रमाणात पसरवून मंदतर करणे ही पुढच्या-म्हणजे एकविसाव्या शतकातली समस्या आहे. म्हणून जुन्या निर्देशकाकडे वळायचे.

❑

टिपली थरथर मी धरणीची

हो-आंग-हो नदीच्या एका फाट्यावर नौकेत राहणाऱ्या गरीब लोकांची ती एक वस्ती होती. मासे पकडायचे, ते गावात जाऊन विकायचे आणि संसार करायचे असे ते लोक होते. सर्वच जण लाकडी होड्यांमधल्या घरात रहात... आजही होड्यांची नदीवर गर्दी उसळली होती. एकाला एक लागून या होड्या पाण्यावर हलत-डुलत, झुलत झुलत होत्या... होड्यांवर दोरी बांधून त्यावर कपडे वाळत घातलेले दिसत होते. दुपारच्या स्वच्छ मोकळ्या प्रकाशात पाण्यात होडी आणि हे वाळत घातलेले रंगीबेरंगी किमोनो-फ्रॉक यांचे प्रतिबिंब खालीवर डुचमळत हलताना दिसत होते.

... छोटा हेंग एका होडीतून प्रतिबिंबांची मजा पहात होता. त्याचे मित्र एका होडीत 'विची' नावाच्या सोंगट्यांचा डाव खेळत होते. तो हा डाव खेळायला म्हणून आपल्या होडीतून या मित्राच्या होडीत आला आणि नेहमीसारखा पाण्यातली प्रतिबिंबे पहात राहिला.

छोटा हेंग लहान होता. अजून त्याला हेही कळत नव्हते की पाण्यात प्रतिबिंब का हलते? लाटा हलतात म्हणून प्रतिबिंब हलते असे म्हणावे तर लाटा का हलतात? हा प्रश्न पडत होता आणि लाटा या पाण्याखालच्या जमिनीची थरथर होते म्हणून हलतात असे म्हणावे तर जमीन का थरथरते? असे प्रश्न पडत होते. पण हे सर्व प्रश्न त्याला कुणालाच विचारता येत नव्हते. त्याच्या घरात प्रश्नांची उत्तरे द्यायला होते कोण? तो आणि त्याची म्हातारी आजी. आजीला विचारावे तर तिचे आपले एकच उत्तर ठरलेले असे... पॅन-कू पाणी हलवतो... पॅन कू जमीन हलवतो...पॅन-कू असे करतो, तसे करतो...

पाणी का हलते? जमीन का हलते? या प्रश्नांची उत्तरे कुणाला तरी विचारायची असे हेंगने ठरवले तोच त्याच्या कानावर आजीच्या हाका ऐकू आल्या 'हेंग, हेंग.'

तरातरा एका बोटीतून दुसऱ्या बोटीवर उड्या मारत हेंग आपल्या होडीत आला. म्हाताऱ्या आजीला अगदी चिकटून उभा राहिला. आजी त्याच्या केसातून ममतेने हात फिरवत दूर एकटक पहात होती...

...आणि दूर-नदीच्या पलीकडच्या टोकाला फिकट-निळसर डोंगरांच्या रांगांवरती काळे-कभिन्न ढग जमा होत होते... तो घाबरून गेला. आजी त्याला म्हणाली,'हेंग, तू आता जेवून घे पाहू. हे वादळ भरून येतेय. काय होणार आहे कुणास ठाऊक?' असे म्हणून म्हाताऱ्या आजीने होडीमधल्या बुद्धदेवाच्या चित्रापुढे उभे राहून प्रार्थना म्हटली...

...तोच तुफान सुटले. मुसळधार पाऊस पडू लागला. रों रों आवाज करीत वारा सुटला आणि पाच-दहा क्षणातच होड्यांमधले लोक झपाझपा उड्या टाकत काठावर जाऊ लागले. दोरखंडाने बांधलेल्या होड्या दावे तोडून जनावर सुटावे तशा सुटत होत्या आणि नदीवरच्या पाण्याच्या लाटांवर वारेमाप वहात जात होत्या... म्हाताऱ्या आजीने हेंगला पाठीशी घेतले आणि ती काठावरच्या गर्दीत येऊन उभी राहिली.

किनाऱ्यावर उभी राहून म्हातारी आजी नदीच्या पुराकडे पहात होती. तिचे डोळे भरून आले होते. तिची होडी दूर कुठे तरी वाहून गेली होती. ती आणि तिचा नातू हेंग आता बेघर झाले होते. किनाऱ्यावरच्या धर्मशाळेत इतर अनेक बेघर झालेल्या लोकांबरोबर राहताना तिच्या मनात विचार येत होता की या पोराच्या नशिबात आहे तरी काय? जन्मल्याबरोबर बाप आणि आई गेली. हेंग जन्मला त्याच वेळी एक फार मोठा धरणीकंप झाला आणि त्यात हेंगचे आई वडील सर्वजण मरून गेले. हेंग आणि म्हातारी आजी फक्त मागे उरले होते.

छोट्या हेंगला पूर; वादळ, तुफान, धरणीकंप या गोष्टी कळतच नव्हत्या. त्याचे वयच लहान होते. तो फक्त अंगठा तोंडात घालून-अजून त्याची अंगठ्याची सवय गेलीच नव्हती-आजीला म्हणत होता,'आजी, पॅन-कूची गोष्ट सांग ना!'

हेंगला पोटाशी घेऊन त्या धर्मशाळेत आजी गोष्ट सांगू लागली: हे बघ हेंग, पॅन-कू हा सर्वात प्रथम जन्मलेला देव. त्याने जग निर्माण केले. एकदा पॅन-कू ने स्वतःच स्वतःला ठार केले. मग त्याच्या रक्तापासून झाल्या नद्या, त्याच्या डोक्याच्या केसांपासून झाली झाडे, त्याच्या देहापासून झाली जमीन आणि घामापासून आला पाऊस. एका डोळ्याचा झाला सूर्य, दुसऱ्या डोळ्याचा झाला चंद्र. पॅन-कूच्या श्वासोच्छ्वासाचा झाला वारा आणि आवाजाचा झाला प्रचंड मोठा झंझावाती तुफान-फवारा...

पॅन-कू ची नेहमीची गोष्ट ऐकत ऐकत हेंग मोठा झाला. तो अत्यंत हुशार होता. परीक्षा पास होत होत तो आता राजदरबारी फार मोठा अमलदार झाला होता. त्याची आजी आता धनुष्यासारखी वाकली होती. तिला बोलता येत नव्हते. कानाने ऐकू येत नव्हते. हेंगने आणलेल्या महागड्या शिसवी शवपेटीत ती सदा सर्वदा पडून रहात असे.

कधी कधी हेंगला वाटे की काय हे या म्हाताऱ्या माणसांचे खूळ. आजी मात्र आपल्या हेंगने आपल्याला हवी होती तशी पेटी आणली म्हणून खूष होती. पूर्वी तिला ऐकू येत होते, बोलता येत होते तेव्हा ती हेंगला म्हणाली होती,'माझी एक इच्छा - शवपेटीची इच्छा तू पूर्ण केलीस. आता दुसरी इच्छा या शवपेटीचे झाकण मी मेले की तू लावावेस... धरणीकंप झाला तरी... '

तिचे ते उद्गार ऐकून हेंग थरथरला होता. धरणीकंप झाला तरी आपण झाकण लावायला हवेम्हणजे हिचा मृत्यु धरणीकंपाने होणार की काय? आणि तसा झाला तर आपल्याला कळणार कसे की धरणीकंप झाला? आपण तर राजाच्या दरबारी चाकर-नोकर. आपली आजी एका गावाला राहाणार. आपण राजाच्या हुकुमावरून दूर. कधी प्रचंड भिंतीचे कामकाज पाहण्यासाठी आपण हजारो 'ली' लांब जाणार तर कधी कालव्याचे कामकाज पहायला गेलेले असणार...

आजीची दुसरी इच्छा आपण पूर्ण करायला हवी. काय वाटेल ते झाले तरी धरणीकंप झाला तर आपण ताबडतोब आजीकडे हजर रहायला हवे...

आपल्याला केवळ आजीने मोठे केले. ती नसती तर आपण एवढे मोठे होऊ शकलो नसतो... आणि आजी जे म्हणते ते सतत होत असते. धरणीकंपाने तिचा मृत्यु होणार असे तिला वाटत आहे तर तसेच होईल.

...हेंग जागेवरून ताडकन् उठला. त्याने आजीच्या शवपेटीचे झाकण दोरखंडाने बांधून टाकले. मग एक निःश्वास टाकला आणि तो राजाच्या आज्ञेवरून प्रचंड भिंतीचे काम पहायला दूर दूर निघून गेला... आजीच्या सोबत तिची काळजी घ्यायला दोन सेवक ठेवून गेला. तो जिथे जिथे कामावर जाई तिथे तिथे त्याला आजीला घेऊन जाणे अशक्यच होते. प्रचंड भिंतीवरची नोकरी म्हणजे एक शिक्षाच होती. तार्तार लोक भिंत बांधणाऱ्या कामगारांवर हल्ले करीत... घनघोर लढाई होई... खायला कधी अन्न मिळत नसे... तर कधी जंगलात मुक्काम ठोकावा लागे...

... पण हेंग आपल्या राहुटीत एकटा असला की त्याला आजीची आठवण येई. आजी सांगत असे ती पॅन-कू ची गोष्ट त्याच्या डोळ्यासमोर येई.

त्याला आठवले, आजीची एक आवडती गोष्ट होती. त्या गोष्टीचा शब्द नि शब्द त्याला आता आठवला:' हेंग, आपले जग हे बलाढ्य आणि अगडबंब राक्षसांनी खांद्यावर उचलून धरले आहे. या राक्षसांची नावे न्सॉंग आणि न्हॉय अशी आहेत. त्यांच्या खांद्याला रग लागली की ते खांदे बदलतात... अशा वेळी जग हलते. आपण त्याला धरणीकंप म्हणतो...'

हेंग राहुटीत खडबडून जागा होऊन बसला. धरणीकंप राक्षसामुळे होवो न होवो, तो झाला तर आपल्याला कळणार कसे? आपले गाव हजारो ली-कोस लांब. आपल्या या गावी झाला धरणीकंप तर ठीक. पण आजी आहे तिथे झाला तर आपल्याला कळणारही नाही. मग आपण शव-पेटीचे झाकण लावायला जाणार कसे?

सहज त्याचे लक्ष समोरच्या लाकडी मेजाकडे गेले. या मेजावर त्याच्या हाताखालच्या माणसाने सात-आठ लाल रानफळे ठेवलेली होती. मेजाला त्याचा धक्का लागून दोन फळे खाली पडली होती. तो त्या फळाकडे पहातच राहिला. पाहता पाहता त्याच्या मनात आले. मेज थरथरले तर फळ खाली पडते. ज्या बाजूला धक्का मोठा तिथले फळ निश्चितपणे घरंगळते...

अपरात्री तो उठला. नंतर मनाशी नीट विचार करून आता त्याने एक खेळणे बनवले. आठ ड्रॅगन घेऊन त्यांच्या तोंडात त्याने आठ चेंडू लोंबकळत ठेवले. हे ड्रॅगन त्याने एका तांब्याच्या भांड्यावर बसवले. जमीन थरथरली की तांब्याचे भांडे थरथरेल अशी रचना करून तो झोपून गेला.

आपल्या ड्रॅगनच्या खेळण्याला अधिकाधिक सफाईदार करण्यातच हेंग आता रंगला होता. निरनिराळ्या सपाटीवर ठेवून तो चारी बाजूंनी एका वेळी एक असे धक्के देऊन आपले खेळणे कसे काय काम करते हे पहात होता.

दिवसभर भिंतीचे कामकाज पहायचे आणि दमून भागून रात्री राहुटीत आल्यावर आपल्या खेळण्याशी खेळत बसायचे. आठ दिशांना बसवलेले आठ ड्रॅगन आणि या ड्रॅगनच्या तोंडात ठेवलेले चेंडू यावरून कुठेही धरणीकंप झाला तरी आपल्याला कळू शकेल असे हेंगला आता वाटू लागले.

हेंग हा आता मोठा सरकारी अमलदार झाला होता. त्याच्या हाताखाली अनेक लोक होते. चपराशी होते, नोकर होते, सहाय्यक दुय्यम अधिकारी होते... या सर्व लोकांना हेंगचे खेळण्याबरोबर खेळणे वेडगळपणाचे वाटत असे. आपला साहेब कामात हुशार आहे पण पूर्ण वेडा आहे... खेळणे तो कधी मेजावर ठेवतो आणि मेजाच्या एका खुराला धक्का देतो. तर कधी ते खेळणे तो उंच टेकडीवर ठेवून खालून त्या खेळण्यावर छोटे छोटे दगड फेकतो... हाताखालच्या लोकांना हेंग पुरा खुळा वाटत होता.

पण हेंग खुळा, वेडपट नव्हता.

प्रत्येक वेळी हेंग ड्रॅगनच्या कुठल्या दिशेचा चेंडू खाली पडला आणि कुठल्या दिशेला आपण दगड फेकला हे पहात असे. धरणीकंप झालाच तर कुठल्या दिशेला झाला, आपल्या आजीच्या गावाला, बाळपणीच्या आपल्या घराच्या रोखाने झाला का? एवढेच हेंगच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

... आणि अचानक एक दिवस अपरात्री जमीन थरथरून हेंग जागा झाला. छोटासा भूकंपाचा धक्का बसला होता. हेंग ज्या गावी होता तिथे धरणीकंपाचा भूकंपाचा धक्का तसा सौम्यसा बसला होता. पण हेंगने आपल्या खेळण्याकडे पाहिले. आठ ड्रॅगनच्या त्या खेळण्यामधल्या एका ड्रॅगनच्या तोंडातला चेंडू खाली घरंगळून पडला होता. ज्या दिशेचा चेंडू गळला होता. त्याच दिशेला हेंगचे घर होते. हेंगची आजी त्याच दिशेला रहात होती. कदाचित आजीच्या गावाला धरणीकंपाचा धक्का फार मोठ्या प्रमाणात बसला असावा... कदाचित आजी या धरणीकंपात मरून गेली असावी...

हेंग ताडकन् उठला. आपल्या घोड्यावर स्वार झाला. बरोबर एक चाकर घेतला आणि मजल दरमजल करीत तो आपल्या गावाला निघाला.

त्याला जे वाटत होते तेच बरोबर होते.

...भयभीत होऊन माणसांचे जथेच्या जथेच्या त्यांना समोरून येताना दिसत होते. घाबरलेले लोक आपल्या बायका मुलांना घेऊन, हाती लागलेले सामान घेऊन दूर निघाले होते.

हेंग आणि हेंगचा नोकर घोड्यावरून जसजसे गावाजवळ येऊ लागले तस तसे त्यांना पार जमीनदोस्त झालेली घरे-दारे, उन्मळून पडलेली झाडे दिसू लागली. ढिगारे दिसू लागले. त्यात माणसे गाडली होती.

आजीचे काय झाले असेल? या कल्पनेने भेदरलेला हेंग आता आपल्या वाड्याजवळ आला होता. वाड्याचा दिंडी दरवाजा उन्मळून पडलेला होता. बागेत हेंगने लावलेली झाडे समूळ उपटली गेलेली होती. ढिगाऱ्याखाली हेंगच्या वाड्यातली डुकरे-कोंबड्या मरून गेलेल्या होत्या.

कसेबसे एकेक पाऊल पुढे टाकत हेंग आपल्या घरात शिरला. विटादगडांचे ढिगारे, लाकडाचे वासे, फळ्या दूर करीत त्याने घाबरत घाबरतच आजीच्या खोलीत नजर टाकली. आजी शवपेटीत पडून होती. शवपेटीचे दार मात्र अजूनही बांधून ठेवलेले असल्यामुळे पेटीवर ठेवलेले नव्हते. ज्या भिंतीला ते बांधले होते ती भिंत तिरकी झाली होती.

हेंग पुढे आला. आजीच्या श्वासोच्छ्‌श्वास अजून चालू होता. पण हेंगचा हात आजीच्या गालावरून फिरताक्षणीच तो श्वास थांबला.

तेव्हा मात्र हेंग मनात समजायचे ते समजला. त्याने हळूच दोरीने बांधलेले शवपेटीचे-कफन पेटीचे दार सोडवले आणि मरण पावलेल्या आपल्या आजीला पुन्हा एकदा पाहून घेऊन त्याने ते दार पेटीवर अलगद गच्च बसवून टाकले.

मग मात्र इतका वेळ तग धरून कशीबशी उभी राहिलेली आणि दाराला रोखून, तिरकी होऊनही थोपवून धरणारी ती भिंत ढासळून पडली.

ढासळणाऱ्या भिंतीच्या आवाजाने हेंग शुद्धीवर आला आणि त्याच्या मनात विचार आला. आपल्या ड्रॅगनच्या खेळण्याने जमिनीची थरथर अजमावून अचूक दिशा दाखवली. म्हणून आपण वेळेवर आजीजवळ आलो आणि तिची दुसरी इच्छा-शवपेटीवर झाकण घालायचे ही पुरी करू शकलो. पण भलत्याच दिशेला धरणीकंपासाठी आपण धावत सुटलो असतो तर?...

❑

कागदी चलन

दहा शतकांपूर्वी कागदी नोटांचा व्यवहारातील वापर चीनने सुरू केला. कागद आणि छपाई यंत्र या शोधांनंतर कागदी नोटांचा शोध लागला असला तरी त्यापूर्वीच चीनमध्ये रोख्यांच्या स्वरूपात नोटा अस्तित्वात आल्या होत्या. छपाई यंत्रामुळे नोटांची छपाई होऊ लागली असे म्हटले तरी नोटांच्या बटवड्यासाठी फार मोठी सरकारी यंत्रणा लागते. ती चीनमध्ये त्या काळापासूनच प्रस्थापित झाली होती. आज जगातल्या बँका हेच महत्त्वाचे बटवड्याचे काम करतात.

कागदी नोटांना-प्रामुख्याने चेकना लोक उडणारा पैसा फाई चाईन-हे नाव देतात. 'फाई चाईन' हे नाव येण्याचे कारण असे की, प्रवासी दूर दूर प्रवास करू लागला की पैसा त्याच्या पाठोपाठ त्या त्या गावी उडत जातो. प्रवासी मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचण्यापूर्वीच पैसा त्या जागी गेलेला असतो. या कागदी चलनामुळे नगद रक्कम घेऊन प्रवास करणे सर्वसामान्य माणसाला टाळता येऊ लागले. त्यामुळे पैशाची चोरी, दरोडे, लुटालूट या गोष्टी कमी प्रमाणात घडू लागल्या. हल्लेखोरांचा डाका पडलाच तर तो सरकारी तिजोरीवर पडत असे.

एक कल्पना करा की दिल्ली किंवा मद्रास येथे आपल्याला जायचे आहे. तिथे गेल्यावर तीन हजार रुपये आपल्याला लागणार आहेत. तर हे तीन हजार रूपये आपल्या गावच्या सरकारी तिजोरीत भरले की काम झाले. उडणारी ही एक हुंडी घेऊन इच्छित स्थळी जायचे आणि ती वटवायची... सोडवायची.

आज चेक, प्रवासी चेक्स, हुंडी, प्रॉमिसरी नोट्स या गोष्टी सर्रास झाल्या आहेत. त्यामुळे या आर्थिक व्यवहारातले कुतूहल नष्ट झाले आहे. तरी पण कुबलाखान (इ.स.१२१६) चीनवर राज्य करत होता तेव्हा किंवा आपल्याकडे श्रीज्ञानेश्वरमहाराज रेड्याच्या तोंडून वेद वदवून घेत होते तेव्हा, 'कागदी चलन' वापरून लोक व्यवहार करीत असत ही कल्पना अजबच वाटते. आज अजूनही आपण 'प्रवासी चेक्स' घेऊन जाण्यापेक्षा नगद पैसा खिशात ठेवून निघतो अणि त्यावर हात ठेवूनच प्रवास करतो. हुंडी वगैरे तर व्यापारी वर्गाने काढायची-सोडवायची असे आपण धरूनच चालतो.

जगातील 'बँक ऑफ स्वीडन' ही पहिली बँक १६५६ मध्ये सुरू झाली. त्यापूर्वीच तीन-चार शतके चिनी कागदी चलन अस्तित्वात आले होते. म्हणून हा 'शोध' महत्त्वाचा वाटतो.

❑

पंख पसरतो सरसर पैसा

गर्दीकडे बोट दाखवून छोट्या लिओचे वडील त्याला म्हणाले, 'लिओ, हा तांडा प्रवासाला जात आहे. आपल्या काशगर शहरातून निघून तो लॉपनूर सरोवराकाठच्या मोठ्या बुद्धदेवांच्या मंदिरात जाईल आणि तिथून तो पायकींग-पेकींग शहराकडे येईल. पेकींग राजधानीचे मोठे शहर आहे. त्या शहरात माझा एक मित्र राहतो. तो मोठा उमराव आहे. तो तुला शिक्षण देईल. तशी मी चिठ्ठी लिहून देतो...' असे म्हणून त्यांनी छोट्या लिओच्या खिशात एक चिठ्ठी कोंबली आणि जवळजवळ त्याला ढकलूनच ते मागे परतले.

... लिओ धावत सुटला. गर्दीत मिसळला, हे पाहून मात्र लिओच्या वडिलांनी डोळे पुसले. 'काय ही माझी स्थिती-' ते स्वतःशीच पुटपुटले. 'एक मुलगा. घरी रगड पैसाअडका. पण सावत्र आई-आपली नवी बायको या छोट्या हुशार मुलाला काही शिकू देत नाही. घरगड्याप्रमाणे त्याच्याकडून काम करून घेते आणि आपण हात चोळत बसतो. सदा आजारी असणारी आपली ही बायको म्हणजे एक दुष्ट बाई आहे...' असे म्हणून डोळे चोळत ते निघून गेले. गर्दीत लिओ हरवला किंवा पळून गेला असे ते आता आपल्या बायकोला सांगणार होते... लॉपनूरच्या बुद्धमंदिराकडे जाणारा समोरचा तांडा छोट्या लिओला घेऊन हलला, डोळ्यासमोरून दूर झाला तेव्हा मात्र लिओचे वडील घराकडे भराभर जाऊ लागले.

लॉपनूरच्या बुद्धमंदिराकडे जाणारा तांडा मजल दरमजल करू लागला. एका सायंकाळी तो तांडा उघड्या माळावर तंबू, राहुट्या ठोकून पडला होता तेव्हाची गोष्ट. एव्हाना छोटा लिओ त्या प्रवासी लोकांत चांगलाच मिसळून गेला होता. त्यामुळे म्हाताऱ्याकोताऱ्या प्रवासी लोकांत तो चांगलाच प्रसिद्ध झाला होता आणि तांड्यातील तरुण कार्यकर्त्यांचाही आवडता झाला होता. उंट-बैल यांना चारा-वैरण घाल, तंबूत चटया पसर, म्हाताऱ्यांना मदत कर... अशी कामे लिओ मोठ्या हौसेने करीत असे.

उघड्या माळावर भयाण वारा सुटला होता. वेळ रात्रीची, तेरावीचा चंद्र झाडामागून हळूहळू वर येत होता. लिओ ते चंद्रबिंब पाहण्यात गर्क झाला होता. सगळीकडे शांतता पसरलेली होती. झाडांची पाने सळसळत होती. उंट-बैल रेकत होते. काळोखात तंबूबाहेर लावलेल्या दिवट्या आणि पलिते वाऱ्यावर वाकडे-तिकडे होत होते. त्यांच्या सावल्या जमिनीवर वेड्यावाकड्या पसरत होत्या. लिओला अजिबात भीति वाटत नव्हती. सावत्र आईच्या घरी त्याला उगवणारे पौर्णिमेचे चंद्रबिंब सोडाच, मध्यान्हीचे सूर्यबिंबही पहायला वेळ मिळत नसे. म्हणून तो आज तन्मय होऊन ते पहात होता. तोच त्याचे लक्ष दूर गेले. दूरवर धुळीचे लोट उडत होते. बघता बघता या लोटातून घोडेस्वार धावत येताहेत असे दिसू लागले. डोळ्याची पापणी मिटते न मिटते तोच ते घोडेस्वार धाडधाड करत प्रवासी तांड्यापर्यंत आलेही. हातात भाले-तलवारी घेतलेले आणि डोक्यावर शिरस्त्राण घातलेले ते घोडेस्वार आडदांड, रानटी मंगोल होते. दरोडेखोर होते.

घोडेस्वार दरोडेखोर धडाधड राहुट्यांत घुसले. प्रत्येक प्रवाशाला भाले तलवार यांचा धाक

दाखवून आता ते लुटू लागले. तंबूमधल्या प्रवाशांना निर्दयपणे कापून काढून ते दंगा करीत होते. सोने-नाणे, जडजवाहिर, चांदीचे दागिने मिळेल ती चीजवस्तू ते चोर बळजबरी करून हिसकावून घेत होते. एक आडदांड माणूस लिओजवळ आला आणि 'तुझ्याजवळ काय आहे' असे विचारू लागला.

छोटा लिओ एकदम घाबरून गेला. त्याने भीतभीतच वडिलांनी पेकीगच्या उमरावाला दिलेली चिठ्ठी बाहेर काढली. दरोडेखोराने क्षणभर ती चिठ्ठी पाहिली आणि दूर फेकून तो दुसऱ्या माणसाच्या मागे धावला. कागदाच्या या चिटोऱ्यात दरोडेखोराला काय मिळणार? चिठ्ठीत काय लिहिले आहे हेही त्या दरोडेखोराला वाचता येत नव्हते.

किंकाळ्या फुटत होत्या. आरडाओरडा होत होता. राहुट्यांना आगी लागल्या होत्या. जिकडे तिकडे हाहाःकार माजला. उंट-बैल दावे-वेसण तोडून पळत सुटले. लॉपनूरला जाणारा तो तांडा कसाबसा बुद्ध देवाचे दर्शन घेऊन पेकींगला परत जाऊ लागला. जाता जाता पेकींग शहराचे अनेक बुरुज आणि भिंती ओलांडून राजासमोर येऊन उभा राहिला. दरोडेखोरांची माहिती त्यांनी राजाला सांगितली आणि राजानेही नेहमीप्रमाणे त्यांना आश्वासन दिले. मंगोल टोळीवाल्यांचा बंदोबस्त कसा करायचा हा राजापुढे प्रथमपासूनच प्रश्न उभा होता.

तांड्यातले लोक आपापल्या घरी परतले. छोटा लिओ वडिलांनी चिठ्ठी दिलेल्या उमरावाचा पत्ता विचारत विचारत जाऊ लागला. उमराव आपल्याला कामाला तरी ठेवेल की नाही? याचा विचार करीत असताना तो एका प्रचंड वाड्याजवळ आला. वाड्याबाहेरूनच उमरावाचे ऐश्वर्य त्याला दिसत होते. वाड्यातले घर फार आत होते. तेही प्रचंड मोठे दिसत होते. दिंडी दरवाजापासून बरेच अंतर चालून आल्यावर लिओला उमरावाचे दर्शन झाले. म्हातारपणाकडे झुकत चाललेला वडिलांचा मित्र उमराव एका वेताच्या खुर्चीवर बसलेला होता. त्याच्या शेजारी त्याची म्हातारी बायको काही तरी विणीत बसलेली होती.

एका कोपऱ्यात चोरट्यासारखा उभा राहून भेदरलेला लिओ इकडेतिकडे पाहू लागला. हिवाळा असल्यामुळे झाडांची पाने टपटप गळत होती. वाऱ्याच्या झुळकीने वाळलेली पाने सैरावैरा उडत होती. तेवढ्यात एक गडबड उडाली. चार-सहा माणसे 'गोऱ्हा, गोऱ्हा' असे ओरडत पाठीमागच्या बाजूने पुढे आली. ती माणसे नाचत बागडत होती. खुर्चीवर बसलेला उमराव उठून त्यांच्याकडे गेला आणि नाचू लागला. तोही 'गोऱ्हा, गोऱ्हा, गोऱ्हा' असे ओरडत नाचत होता. लिओ थिजल्यासारखा झाडाआडून लपून पहात होता. तोच उमरावाचे त्याच्याकडे लक्ष गेले. तो एकदम थांबला आणि म्हणाला, 'कोण रे तू? काय आहे काम तुझे?'

थरथर कापत लिओने खिशातून चिठ्ठी बाहेर काढली. उमरावाने ती चुरगळलेली चिठ्ठी नीट सरळ करून वाचली. 'माझा मुलगा लिओ मी तुझ्याकडे शिक्षणासाठी धाडत आहे. त्याच्या शिक्षणावर तू जो खर्च करशील तो मी दुसऱ्या रूपाने वेळीच फेडीन', अशा आशयाची ती चिठ्ठी होती. ती वाचल्यावर उमरावाने लिओला जवळ ओढून घेतले आणि त्याला घेऊनच तो विणकाम करणाऱ्या आपल्या बायकोकडे गेला. तो बायकोला म्हणाला, 'अग, हा शूचा मुलगा लिओ शू. आपल्याकडे रहायला आलाय. कन्फ्यूशियस देवाने

आपल्याला मुलगा दिला. आपल्या शेनला भाऊ मिळाला!'

उमरावाची बायको उठली. तिने लिओला जवळ ओढले. त्याचे पापे घेतले. केस कुरवाळले आणि ती म्हणाली, 'पोरा, फार नशिबवान आहेस रे तू. तू या वाड्यात पाऊल टाकलेस आणि आमच्या गायीला गोऱ्हा झाला. तुझा पायगुण छान आहे.'

खाली वाकून लिओने त्या बाईला नमस्कार केला. मग ती बाई-उमरावाची बायको जिन्याजवळ गेली आणि तिने ओरडून 'शेन, शेन, अग शेन !' अशा हाका मारल्या. त्याबरोबर एक तेरा-चवदा वर्षांची पांढरी फटक मुलगी पुढे आली. तिला पाहून बाई म्हणाल्या,'अग शेन, बुद्ध आणि कन्फ्युशियस देवांनी तुला भाऊ पाठवला आहे. जा त्याला एक खोली लावून दे. त्याचा अभ्यास तूच घ्यायचा बरं का!' मग उमरावाची बायको वळून लिओला म्हणाली,'लिओ, बाळा तुला काय आवडते रे? दुधी भोपळ्यात शिजवलेलं डुकराच पिलू आवडेल तुला?'

लिओ काय म्हणणार! सावत्र आई रात्री त्याच्यापुढे चार तुकडे टाकी. त्यात भोपळा कुठला आणि डुकराच्या मांसाचा तुकडा कुठला! पण आता लिओचे दिवस बदलले होते. त्याला शेनच्या हाताखाली शिक्षण मिळू लागले. तो शाळेत जाऊ लागला. मुलांच्यात खेळू रमू लागला. मुळात तो हुषार होता. झपाझपा तो पुस्तके वाचू लागला. चांगल्या सकस खाण्यापिण्याने उंच व भरदार होऊ लागला. 'पॅन कू' सारखा रूपवान दिसू लागला. दूध-फळे-मांस-मच्छी या सकस आहाराबरोबर नियमित खेळ-व्यायामाने त्याची प्रकृती सुधारत होती. पुराणातल्या 'सांग-त्सू' च्या गोष्टी तोंडपाठ झाल्या होत्या. 'पाकू' निबंध तो आता लिहायला लागला... पण कधी कधी त्याला स्वप्नात तो लॉपनूरच्या प्रवासाचा प्रसंग दिसे. त्या किंकाळ्या, रडारड, पळापळ... तो आपल्या खोलीत किंकाळत जागा होई... नंतर मात्र त्याला वडिलांनी दिलेल्या कागदाच्या कपट्याची आठवण होई. या चतकोर कपट्यामुळे दरोडेखोरांनी त्याच्या अंगाला हात लावला नव्हता हेही आठवे आणि चतकोर कागदावरच्या मजकुरात किती प्रचंड ताकद असते हे लक्षात येऊन त्याचे मन भरून येई.

... आता लिओ मोठा झाला होता. सरकारी परीक्षा पास होऊन तो सैन्यातला अधिकारी म्हणून जाणार होता. म्हणजे तसे त्याचे ध्येय होते. उमरावाची मुलगी. त्याची बहीण शेन त्याला अभ्यासात मदत करीत असे. तरतरीत नाकाचा आणि अत्यंत बुद्धिवान असा लिओ उद्या सेनापतीही होईल याविषयी उमरावाला शंका उरलेली नव्हती.

एक दिवस काशगरहून एक व्यापारी आला. त्याला उमरावाची मुलगी शेन सून म्हणून पसंत पडली. व्यापाऱ्याचा मुलगाही बरोबर होता. त्यालाही शेन बायको म्हणून पसंत पडली. प्रश्न फक्त इतकाच होता की व्यापाऱ्याला चांदीची १०,००० टेल नाणी हुंडा म्हणून हवी होती. एवढा हुंडा देणे उमरावाला परवडणारे नव्हते असे नव्हते. पण हा हुंडा, ही सर्व नाणी व्यापाऱ्याला त्याच्या गावी काशगरला मिळावीत अशी त्याची अट होती. पेकींगपासून काशगरला एवढी नाणी नेताना हल्ला झाला, दरोडेखोरांनी ऐवज पळवला तर...?

व्यापाऱ्याची अट ऐकून उमराव काळजीत पडला. पण लिओला ताडकन पूर्वीचा लॉपनूरचा प्रवासातला दरोडेखोरांचा प्रसंग आठवला. त्याने उमरावाच्या कानात काहीसे सांगितले. काशगर येथे राहणाऱ्या आपल्या वडिलांना चिठ्ठी लिहा अशी मसलत त्याने उमरावाला दिली. उमराव खूष झाला. नाही तरी त्यांनी लिओला पोटच्या पोराप्रमाणे वाढवले होते. लिओच्या वडिलांनी ते स्मरण ठेवून शेनच्या घरी दहा हजार चांदीची नाणी हुंडा देण्याचे मान्य केले. त्यांना तरी कोण होते दुसरे? प्रचंड व्यापार वाढलेला. सावत्र बायको लुळीपांगळी होऊन पडलेली. एकुलता एक मुलगा लिओ दत्तक म्हणून उमरावाकडे गेलेला...

शेनचे लग्न थाटात झाले. सर्व सरंजाम काशगरला पोहोचला त्यांच्या पावलापाठोपाठ हुंडा घेऊन लिओचे वडील आले. कागदाच्या एका चिठ्ठीवर केवढी मोठी उलाढाल पार पडली. आणि यापुढे उमराव लिओचे वडील एकमेकाला चिठ्ठ्या पाठवून प्रचंड व्यापारी उलाढाली करू लागले. रेशमाचे गठ्ठे पेकींगहून काशगरला येत. काशगरहून उंटांची कातडी, जेडचे खडे, चिनी मातीची भांडी जात. कारवा फक्त सामान घेऊन जाई. सोन्याचांदीची उलाढाल उमराव व लिओचे वडील आपापल्या ठिकाणी करीत. गावातल्या तिजोरीत पैशाचा भरणा चिठ्ठीनुरूप होत असे.

...लिओ मोठमोठी जबाबदारीची कामे घेऊन मोठा होत होता. राजाची त्याच्यावर मर्जी बसली होती. एक दिवस राजाने त्याला फार अवघड कामगिरीविषयी सल्ला विचारला. हूनान प्रांतातले टोळीवाले त्यावेळी फार माजले होते. त्यांच्या बंदोबस्त करायला जो सेनापती जात असे त्या सेनापतीच्या तिजोरीवरच हे टोळीवाले हल्ला करीत. तिजोरीतले सोने-नाणे चोरल्यामुळे सैन्याची उपासमार होई. टोळीवाल्यांना काही सैनिकच फितूर असल्याशिवाय हे होणार नाही हे लिओने ओळखले. त्याने राजाचे शिक्कामोर्तब असलेले कागदाचे कपटे चलन म्हणून रुजू केले. ज्या गावी सैन्याचा डेरा पडे त्या गावात शिक्कामोर्तब असलेले कपटे दिले की सरकारी तिजोरीतून गावातल्या व्यापाऱ्यांना धान्य, मांस, दारू पुरवण्याचा हुकूम होत असे. यामुळे सैन्याच्या तिजोरीत सोन्याचांदीचा ऐवज ठेवलाच जात नसे...

राजाचे शिक्कामोर्तब असलेले कागदाचे कपटे आता सर्रास वापरात येऊ लागले. पॅन-कूसारख्या तेजस्वी दिसणाऱ्या लिओवर राजा प्रसन्न झाला होता. पण इतर सरदार लिओच्या या कागदी कपट्यांच्या यशाने नाराज झाले होते. हे मोठे सरदारच भुरट्या टोळीवाल्यांना हाताशी धरून चोऱ्या करीत असत. हे सर्व सरदार चडफडू लागले. चोऱ्या, दरोडे यांचे प्रमाण कागदी कपट्यांमुळे कमी झाले होते. कागदाच्या कपट्यावर फक्त लिहिलेले असेः दहा टेल नाणी. तो कपटा सरकारी तिजोरीतून मिळालेला असे. त्यावर राजाचे शिक्कामोर्तब असल्यामुळे त्या कपट्याला तेवढीच किंमत दिली जात असे. लोक अशा कागदी नोटा घेऊन आता प्रवास करायला लागले होते. दुकानदार याच नोटा ठेवू लागले होते... मोठे सरदार जळफळत होते. जळफळाट वाढत होता.

एक दिवस मोठ्या सरदाराने राजाचे कान फुंकण्याचा प्रयत्न केला. त्याने राजाला सरकारी

तिजोरीत नेले. या तिजोरीत कागदाचे असंख्य कपटे ठेवलेले होते. तोंड वाकडेतिकडे करून तो सरदार राजाला हळूच म्हणाला, 'महाराज, हे कपटे काय दाखवतात? आपल्या राज्यातले सोने, चांदी संपून गेलेय. आता फक्त कागद उरलेत असेच ना!'

राजवाड्याच्या खांबाआड उभे राहून लिओ ऐकत होता. आपण कागदाचे चलन वापरात आणले त्या विषयी आरडाओरड चालली आहे हे त्याने ओळखले. तो एकदम पुढे आला आणि राजाला म्हणाला,'महाराज, थांबा! या कागदाच्या कपट्यांच्या अंगात फार प्रचंड ताकत आहे...' लिओने तिजोरीमधला एक कपटा काढला. त्यावर लिहिलेले होते. 'शंभर टेल नाणी.' तो कपटा त्याने राजाला दाखवला. सरदाराला दाखवला. सरदारामागोमाग आता त्याला साथ देणारे अनेक सरदार आले होते. त्यांना त्याने तो कपटा दाखवला. आपल्या हाताने त्या कपट्याचा चुरगळा केला आणि तो चेंडू लिओने दूर फेकला. 'पकडा हा चेंडू' लिओ सरदार लोकांना म्हणाला. 'ज्याला हा चेंडू मिळेल त्याला तो मागेल तितकी शंभर टेल नाणी देण्यात येतील...' असे म्हणून चेंडूजवळ जाऊन लिओने तो चेंडू आणखी दूर उडवला...उडून तो बागेत गेला...

... हिवाळ्यातल्या आवर्ती वाऱ्याचे थैमान चालू होते. वाळलेली पाने भोवऱ्यासारखी गरगरत जात होती. कपटा उडून राजवाड्यातल्या त्या बागेत पडला आणि तिथून उडत उडत लांबवर जाऊ लागला... चेंडू पकडायला सर्व सरदार धावू लागले. एका सरदाराला तो चेंडू मिळाला. त्याच्यावर इतर सरदार तुटून पडले. एकाच्या हातातून दुसरा सरदार चेंडू खेचून घेत होता... तिसरा त्याच्यावर तुटून पडत होता... चवथा...

एकामागून एक सर्वजण कागदाच्या कपट्यामागे लागले होते. लिओ महाराजांना घेऊन हसत हसत मागे मागे जात होता. आता तर सरदारांचे दोन गट पडून चेंडूसाठी ते झोंबाझोंबी करू लागले होते. या दोन गटांमध्ये मारामाऱ्या सुरू झाल्या... हिवाळ्यातल्या वाऱ्याबरोबर कपटा पळत होता. सरदारांचे गट त्याच्या मागून धावत पळत, वेड्यासारखे उड्या मारत, तलवारी उपसत जात होते...

आश्चर्याने ती गोष्ट पाहणाऱ्या राजाला लिओ म्हणाला,'महाराज, हा साधा कागदाचा कपटा आहे. याच्यापायी एवढ्या मारामाऱ्या होतात तर खरे सोने किती मोठ्या मारामाऱ्या घडवत असेल याची कल्पना करा. 'महाराज,' लिओ पुन्हा म्हणाला, 'सर्वसामान्य माणसाला भांडण-तंटा नको असतो. तंटा-लढाया हे बलाढ्य लोकच करत असतात. त्यांना स्वतःच्या फायद्यासाठी लढाया हव्या असतात.'

-राजा समजायचे ते समजला. शिक्षा देण्यासाठी त्या असंतुष्ट सरदारांना त्याने समोर आणण्याचा हुकूम दिला. पण ते सरदार आपापसातल्या मारामारीत जखमी झाले होते. झाली ती शिक्षा त्यांना पुरे होती असेच राजाला वाटले.

❑

रेशीम

रेशीम ही चीनने जगाला दिलेली फार मोठी देणगी आहे. रेशमाची मोहिनी फार मोठी होती. परंतु नंतर टेरीलीन-पॉलीस्टर-डेक्रॉन या कृत्रिम आणि रासायनिक धाग्यांनी रेशीम धाग्यांना मागे टाकले. आज जरी अशी स्थिती असली तरी इसवी सनाच्या पूर्वी रेशीम धाग्याने सर्वच जगाला वेड लावले होते. आपण भारतीयांनी तर रेशमाला 'चीनांशुक' हा संस्कृत शब्द योजून त्या शब्दातच त्याच्या निर्मितीच्या देशालाही गोवले होते. शिवाय रेशीम आपण सोवळे म्हणून वापरत आलो. 'सुती-रेशीम-ताग-लोकर-रासायनिक' या धागे निर्माण करणाऱ्या पंचकोनात रेशमाने फार मोठे स्थान व्यापले आहे.

रेशमाची निर्मिती हा एक निसर्गातला अजब चमत्कार आहे. एक कीडा मोहरीच्या आकाराची ४००-५०० अंडी घालतो. या अंड्यातून केसाच्या आकाराच्या अळ्या निघतात. तुती-मलबरीच्या पानांवर ते तुटून पडतात आणि नंतर कुंभकर्णी झोप घेण्यासाठी स्वतःभोवती एक धाग्याधाग्यांचा कोश तयार करतात. अळी झोपी जाण्यासाठी तोंडातून लाळेसारखा एक चिकट द्रव सोडते. या द्रवाचा हवेशी संपर्क आला की धागा तयार होतो व हा धागा स्वतःभोवती गुरफटला जावा म्हणून अळी स्वतःभोवती संथपणे गरगरत राहते. अळीचे फक्त डोके हलत रहाते. कोश पूर्ण झाला की ती झोपून जाते व शेवटी पतंग होऊन स्वतःच विणलेला कोश फाडून उडून जाते. चिनी लोकांनी हे हेरले आणि कष्टाळू वृत्तीने त्यांनी तुतीच्या झाडांची लागवड केली. इसवी सनपूर्वकालात एकटा चीन सर्व जगाला रेशीम पुरवत होता.

माणसाला जीवनात हरघडी ज्या गोष्टी लागतात त्यातील बऱ्याच गोष्टी चीन देशानेच प्रथम पुढे आणल्या आणि त्याही अतिपूर्व काळात आणल्या. रेशमाचा शोध हा राणी लीईत्झूचा म्हणून धरला जातो. पण ते कदाचित, चिनी लोक परंपरावादी आणि राजे लोकांना ईश्वरी अंश समजत असल्यामुळे असे मानले गेले असेल. खरेखोटे कुणास ठाऊक. रेशमाचा शोध चीनने लावला इतके मात्र सत्य आहे.

❑

अळी नेसली रेशीम साडी

हो-यांग-हो नदीचा प्रवाह संथपणे वाहत होता. आधीच या नदीचा रंग पिवळा दिसत असे. त्यात आता मध्यान्हीच्या सूर्यामुळे प्रवाह ठिकठिकाणी चकचकीत पिवळा दिसत होता. एका काठावर निळसर जांभळा ड्रॅगनसारखा पसरत जाणारा डोंगर आणि दुसऱ्या काठावर एक छोटेसे खेडेगाव, पानमळा, बागा असे ते सुन्दर दृश्य होते. पाण्यात पडलेली डोंगराची सावली, हिरव्या-पिवळया बांबूच्या रानाच्या सावल्या यामुळे प्रतिबिंबाची एक निराळीच शोभा त्या दृश्याला आलेली होती.

दुसऱ्या काठावर उभी राहून एक लहान मुलगी या डोंगराकडे पाहात होती. तिच्या हातात छोटीशी बाहुली होती. त्या मुलीप्रमाणे अनेक दुसरी मुलेही त्या काठावर जमा होऊन दूरवर काहीतरी पाहत होती. ही मुले कुणाची वाट पाहत होती? बाहुली हातात घेतलेली मुलगी तर खूपच लहान होती. शिवाय तिचे पायही वाकडेतिकडे आहेत असे दिसत होते. चीन देशात त्याकाळी छोट्या मुलींचे पाय घट्ट बांधून ठेवीत असत. पाय म्हणजे फक्त पावले. लहान पावले हे सौंदर्याचे लक्षण धरले जात असे. पण या बाहुली हातात घेतलेल्या मुलीचे तसे नव्हते. ती बिचारी आपल्या वेड्यावाकड्या पावलांनी झाडांच्या डहाळीचा कसाबसा आधार घेत काठावर उभे राहण्याचा प्रयत्न करीत होती. तिचा हा प्रयत्न अशासाठी होता की, आज तिची आवडती राणी लीईत्झू नदीमधून नौकेने जाणार होती. काठावर इतर मुलांची गर्दी झाली होती त्यालाही तेच कारण होते. देशाची राणी दर्शन देणार होती म्हणजे साक्षात देवतेचेच दर्शन होणार होते.

हळूहळू आजूबाजूची गर्दी वाढू लागली. पोराटोरांबरोबर आता म्हातारेकोतारे, तरणे-बापे, बाया-बायका सर्वच जण येऊन काठावर गर्दी करून उभे राहू लागले. जो तो त्या तळपत्या प्रकाशात नदीचा चकाकणारा प्रवाह पाहत होता. टारगट मुले नदीत दगड फेकत होती. एकदोन अति वात्रट मुले तर सूर्यबिंब जिथे तळपत होते त्या बिंबावर दगड फेकून अशा काही लाटा उठवत होती की काठावर बसलेल्यांचे डोळे दिपून जावेत. याही गर्दीत काही शेतकरी काठाच्या जवळपास हिंडत राहून बिळात लपलेले खेकडे हाती येतात का पाहात होते. त्यांचेही बरोबर होते. राणीचे दर्शन झाले की घरी जावेच लागणार होते, पोटात दोन घास घालायला हवेच होते. मुलांना जेवण द्यावेच लागणार होते. चार खेकडे आणि बांबूच्या कोवळया कोंबांची भाजी... असा मस्त बेत ठरला असावा.

प्रत्येक जण आपापल्या मनाप्रमाणे काही तरी करीत वेळ काढत होता. राणी अजून आलेली दिसत नव्हती. बाहुली हातात घेतलेली मुलगी एकदा नदीच्या प्रवाहाकडे तर एकदा हातातल्या बाहुलीकडे पाहात होती. इतक्यात त्या मुलीचे लक्ष जवळच्या झाडाकडे गेले. ते तुतीचे झाड होते. लाल रंगाच्या तुतींनी ते झाड संपूर्ण भरलेले होते. पण मुलीचे लक्ष तुतींकडे नव्हतेच. त्या झाडाच्या पानात कापसाच्या बोंडासारखे परंतु बोंडांहून थोडे लहान असे पिवळे पुंजके लागलेले दिसत होते. एक पुंजका त्या मुलीला काढून हवा होता. पण

तो काढून कोण देणार? जो तो 'राणी केव्हा येते?' यात गुंग झालेला... तोच काठाकाठाने गोंगाट ऐकू आला. चार-दोन मुले उभी राहिली. एकदोन पुढे सरकली. लंगडी मुलगीही थोडी फार पुढे गेली.

दूरवर बऱ्याच नौकांचा एक ताफा येताना दिसू लागला. प्रथम फक्त काळा, ढगाएवढा आकार दिसला. पाहता पाहता तो वाढत गेला आणि पाच दहा मिनिटांत या ढगाने रूपांतर काळ्या नौकांच्या ताफ्यात झाले. आता तर आवाजही ऐकू येऊ लागले. ढोल, नगारे, तुताऱ्या... अनेक नौका मोठ्या झपाट्याने समोर येऊ लागल्या. लंगडी मुलगी धडपडत आपली जागा धरून ठेवण्याची पराकाष्ठा करीत होती. पण बिचारी दोन्ही बाजूला जमणाऱ्या गर्दीने रेटली जात होती. तरीही तिने उभे राहण्याचा प्रयत्न मात्र सोडला नाही.

आता तिच्या समोरून एकेक नौका जाऊ लागली. पहिल्या होड्यांमध्ये मोठमोठे अधिकारी असावेत. वीस-तीस होड्या अशाच झपाझप पाणी कापत गेल्या. मग मात्र त्या मुलीची आवडती राणी आली. ती नौका फुलांनी सजवली होती. रंगीबेरंगी फुलांच्या माळा. ढोल-नगाऱ्यांचा गडगडाट... आणि सोन्याचा मुगुट घातलेली हात वर करणारी राणी. राणीच्या नौकेवर दोन मोठाले डोळे होते आणि राणीच्या पाठीमागची नौका म्हणजे एक भलामोठा ड्रॅगनच दिसत होता.

मुलीने राणीला अभिवादन करण्यासाठी हात वर केले तोच कुणाच्या तरी धक्क्याने ती धपकन तिच्या बाहुलीसकट खाली पाण्यात पडली.

काय झाले कुणाला कळलेच नाही. जो तो आपला राणीला पाहण्यात, राणीला नमस्कार करण्यात गुंग. पण राणीने मात्र मुलीला पाण्यात पडताना पाहिले. तिने खूण केली आणि एका सैनिकाने झपकन् पाण्यात उडी मारून मुलीला घेऊन तो राणीच्या नौकेकडे आला.

मोठ्या प्रेमाने राणीने त्या लहान मुलीला जवळ घेतले. एका फडक्याने तिचे अंग पुसले. केस पुसले. एका नोकराला सांगून तिच्यासाठी एक पिवळ्या रंगाचे कापड आणले. ते तिच्या अंगावर दुमडले. नौका वेगाने जात होती. त्यामुळे मुलीला थंड वारा लागत होता. आधीच ती मुलगी पाण्यात पडल्यामुळे पार घाबरली होती. त्यात पुन्हा एकदम राणीच्या जवळ तिला आता उभे रहावे लागले होते. त्यामुळे तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. ती जवळजवळ रडवेली झाली होती.

राणीचे लक्ष आता त्या मुलीच्या हातातल्या बाहुलीकडे गेले आणि राणी एकदम पाहात राहिली—या बाहुलीच्या अंगावर चमकदार आणि तलम असा दोरा गुंडाळलेला दिसत होता. बाहुली पाण्यात पडल्यामुळे तो दोरा आता अधिकच चमकू लागला होता. हा दोरा सुती, कापसाचा दिसत नव्हता. राणीने स्वतःच्या अंगावरचे कपडे पाहिले. या कापडाचा दोरा बाहुलीच्या दोऱ्याइतका चमकदार दिसत नव्हता. हा दोरा कुठला असावा? राणीला प्रश्न पडला. मुलगी भ्यायलेली होती. म्हणून राणीने तिला काही विचारले नाही. पण राणी त्या चमकदार आणि लुसलुशीत मऊ अशा दोऱ्याने अस्वस्थ झाली होती.

राजवाड्यात पोहोचल्यावर हळूहळू राणीने त्या मुलीला बोलके केले. मुलीला तिने त्या

धाग्याविषयी विचारले आणि मुलीने जे सांगितले ते ऐकून राणी आश्नर्यर्चाकत झाली. मुलगी सांगत होती की, बागेमधल्या तुतीच्या झाडावर काही पिवळे कोश असतात. या कोशांमधून जो धागा निघतो तोच हा बाहुलीच्या अंगावर गुंडाळलेला धागा आहे. मुलीने ही माहिती तिच्या काका-काकींना दिली होती, पण पाठीत फक्त धपाटा बसला होता. त्यामुळे मुलीने नंतर कुणालाच या धाग्यांविषयी काही सांगितले नव्हते.

राणीला आता मुलीविषयी फार आदर वाटू लागला. या मुलीमुळे एक नवा धागा आपल्या हाती आला आहे हे राणीला जाणवू लागले. आपल्या अंगावरची जाडीभरडी वस्त्रे टाकून त्या जागी केव्हा एकदा आपण या तलम धाग्यांची वस्त्रे घालतो असे तिला झाले होते. रोज सकाळी राणी त्या मुलीला घेऊन राजप्रासादातील बागेत जात असे. तिथे तुतीच्या झाडावरचे पिवळे कोश गोळा करून त्या दोघी आणीत. मग त्यांतून निघणारा धागा राणी नीट जपून एका फिरकीवर गुंडाळून ठेवत असे... आज ना उद्या या तलम धाग्यांची वस्त्रे ती घालणार होती. धाग्यांपासून वस्त्र विणायचे... वस्त्रांपासून पोषाख... राणी स्वप्न पाहात होती.

आता मुलीमुळे राणीला अनेक गोष्टी कळून आल्या होत्या. हा धागा म्हणजे एका अळीने तयार केलेला कोश आहे. ही अळी तुतीची पाने फस्त करते... मुलीची राणीबरोबर बागेत जाताना फार त्रेधा उडायची. ती बिचारी लंगडत लंगडत चालत असे म्हणून राणीने एका नोकराच्या खांद्यावर मुलीला बसवले पण तुतीच्या बागेत जाऊन झाडाझाडांवरचे पिवळे कोश पाहण्याचे काही सोडले नाही. नोकराच्या खांद्यावर बसून ती मुलगी राणीबरोबर जात होती. धाग्यांचे कोश पाहत होती. ज्या धाग्यांचा कोश नीट आहे, जो फाटून गेलेला नाही असे कोश ती गोळा करीत असे. खांद्यावरून तिला बरेच कोश दिसू लागले होते.

पण चांगले दिवस फार काळ राहत नाहीत असे म्हणतात ना, त्याप्रमाणे लंगड्या मुलीचे ते चांगले दिवस फार काळ तसे राहिले नाहीत. एक दिवस मुलीला खांद्यावर बसवून बागेतून चकरा मारतामारता तो नोकर पाय घसरून खाली पडला. मुलीला सुदैवाने फारसे लागले नव्हते. पण राणीने त्या नोकराला चाबकाने खूप बदडून काढले. त्या दिवसापासून तो नोकर मुलीचा द्वेष करू लागला.

लीईत्झूराणी फार महत्वाकांक्षी होती. ती नेहमी राज्याचे दौरे काढत असे. आपल्या प्रजाजनांची जातीने ती विचारपूस करीत असे. आता तर काय नव्या धाग्यांचा नवा तलम, चकचकीत पोषाख घालून थाटामाटात ती जात असे. बाहेर जाताना लंगड्या मुलीला ती नेहमी बरोबर नेत असे. एकदा अशीच ती दूरच्या प्रांताच्या दौऱ्यावर गेली होती. यावेळी लंगड्या मुलीला तिने आपल्याबरोबर नेले नव्हते. कारण तिला ताप आलेला होता. नोकर मुलीचा द्वेष करीत होताच. आता तर त्याला मुलीवर सूड उगवण्याची संधी मिळाली. कारण असे की राणीच्या एका सरदाराने याच वेळी राणीविरुद्ध बंड केले. त्याने राणीशी एकनिष्ठ असणाऱ्या सर्व सरदारांना गिरफदार केले. लंगड्या मुलीला ती राणीची आवडती होती म्हणून तुरुंगात डांबण्यात आले.

नोकराला आनंद झाला. खांद्यावरून सकाळ-संध्याकाळ नेण्या-आणण्याचा त्याला कंटाळा आलेला होताच. त्यात पुन्हा ठेच लागून तो पडला तेव्हा राणीने त्याला चाबकाने बडवून काढले होते. त्याला

त्याचा अपमान वाटत होता. तुरुंगात डांगलेल्या मुलीवर आता त्याने सूड घ्यायचे ठरवले. एक बळकट सुंभ घेऊन तो तुरुंगातील तिच्या खोलीत गेला आणि तिचा गळा दाबून त्याने तिला ठार मारले व तो लांबलचक दोर त्याने तिच्या मृत देहाभोवती गुंडाळून टाकला.

राणी आपल्या लव्याजम्याबरोबर दूरच्या प्रांताचा दौरा करीत होती. प्रजाजनांना भेटणे, त्यांची ख्याली-खुशाली पाहणे आणि त्याचबरोबर आजूबाजूच्या प्रांतात तुतीच्या झाडांची लागवड कशी करता येईल याचा अंदाज घेणे असा तिचा हेतू होता. लंगड्या मुलीने जो नवा धागा आता तिला दाखवून दिला होता तो धागा सर्व देशात पसरवावा असे तिचे स्वप्न होते. या स्वप्नात ती दंग असतानाच एक दिवस उंटावरून सांडणीस्वार आला आणि त्या स्वाराने सरदाराच्या बंडाची हकीकत तिला सांगितली.

ताबडतोब राणी परत निघाली. ती जसजशी राजधानीकडे येत चालली तसतशी निष्ठावंत प्रजा तिचा जयजयकार करीत तिला मिळत गेली. बंड करणाऱ्या सरदाराचा राणीने पराभव केला आणि वेळ न दवडता ती आपल्या प्रासादात शिरली. लंगडी मुलगी तुतीच्या बागेत गेली असेल असे समजून ती तडक बागेत गेली. पण...पण... तिथे मुलगी नव्हती. राणी मुलीचा तपास करू लागली. शेवटी तिला कळले की मुलीला सरदाराने तुरुंगात डांबले आहे. ती प्रधानजीला घेऊन तुरुंगाकडे गेली.

तुरुंगाच्या अनेक खोल्यांतून तपासणी करीतकरीत अखेर ती एका खोलीपाशी आली. त्या खोलीचे दार उघडून ती आत शिरली. पण मुलगी कुठेच दिसेना. एका कोपऱ्यामध्ये मात्र एक सुंभाच्या दोराची मोटकुळी ठेवलेली दिसत होती. हळूहळू पावले टाकत राणी आपल्या निष्ठावंत सहकाऱ्यांबरोबर त्या दोरखंडापाशी गेली. स्वतः खाली वाकून राणीने दोर उलगडला. बरेच वेटोळे सोडल्यावर अखेर त्यांना दिसले ते मुलीचे प्रेत. तिच्याभोवती दोर फक्त गुंडाळून ठेवला होता...कोशाच्या धाग्यासारखा.

राणीला फार वाईट वाटले. स्वतःचे दुःख विसरण्यासाठी ती धावत धावतच बागेत गेली आणि तुतीच्या झाडावर लटकत असणारे पिवळे कोश पाहात मुलीच्या आठवणी काढत बसून राहिली. त्या आठवणी काढत असतानाच तिला पडलेल्या एका कोड्याचा उलगडा तिचा तिलाच झाला. मुलीबरोबर ती कोश वेचत असायची त्यावेळी अनेक कोशांना भोके पडलेली तर काही कोश फाटून गेले आहेत असे तिला व मुलीला आढळून यायचे. त्यावेळी या फाटलेल्या कोशांचा त्यांना प्रश्न पडत असे. कारण कोश असा फाटलेला असला की धागा सलग निघत नसे. परंतु मुलीच्या मृत्यूने तो प्रश्न सोडवला होता. कोशामधली अळी मरून गेली तर...

दुसऱ्याच दिवशी राणीने सर्व कोश उकळत्या गरम पाण्यात टाकण्याची आज्ञा केली. आता त्या कोशातून निघणारा धागा लांबलचक निघू लागला. कोश फाटून जाण्यापूर्वीच ते गोळा करण्यात येऊ लागले. आणि या धाग्यांचे तलम, मऊ-मुलायम असे वस्त्र विणण्यात येऊ लागले. श्रीमंतापासून गरिबापर्यंत सर्वांनाच आता तलम रेशमी कपडे वापरता येऊ लागले.

❑

होकायंत्र

आशिया मायनरमधल्या मॅग्नेशिया नावाच्या प्रांतात एक तांबड्या-मातट रंगाचा दगड मिळाला होता. त्या दगडामध्ये लोखंडाच्या कणांना आकर्षून घेण्याचा गुण आढळून आलेला होता. दगडाच्या या गुणाला 'मॅग्नेटाईट' हे नाव त्या प्रांतावरूनच पडले. आणि ते दगड मॅग्नेटाईट नावाने प्रसिद्ध झाले. मॅग्नेटाईटचे दगड दक्षिणोत्तर राहतात हा शोध इ.स. १०-१२व्या शतकात केव्हातरी लागला.

एका चिनी दंतकथेवरून त्या लोकांना दक्षिणोत्तर राहणाऱ्या होकायंत्राची माहिती असावी असे दिसून येते.

दिशा दाखवणाऱ्या यंत्राच्या शोधात मानव फार पूर्वीपासून होता. समुद्रप्रवास करताना रात्री आकाशातील ताऱ्यांवरून-ध्रुव ताऱ्यावरून-मार्ग मिळत असे. पाऊस तसेच मध्यान्हीला नेमकी दिशा सापडणे मुष्कील होई. त्यामुळे होकायंत्राचा शोध मानवाला अंधारात वाट दाखवणाऱ्या दिव्यासारखा झाला.

चुंबक किंवा होकायंत्र म्हणजे आयर्न ऑक्साईड असते हे शास्त्रज्ञांनी नंतर निश्चित केले. कुलॉब, फॅरडे, गॉस, गिलबर्ट, मॅक्सवेल वगैरे शास्त्रज्ञांनी फार मोठे संशोधन करून या चुंबकत्व शास्त्राला आकार प्राप्त करून दिला आहे. फार पूर्वी चुंबकत्वाबद्दल इतक्या भोळ्या आणि भाबड्या समजुती समाजात पसरलेल्या होत्या की चुंबकाला स्पर्श करणाऱ्याच्या वाट्याला केवळ दुःख आणि निराशा येते असे लोकांना वाटे. या पार्श्वभूमीवर चुंबकगुणांचा उपयोग मार्ग काढण्यासाठी वापरणाऱ्या चिनी लोकांचे मात्र कौतुक वाटू लागते.

बऱ्याच वेळा दंतकथेच्या मुळाशी एखादे शास्त्रीय सत्य दडलेले आढळते. त्यामुळे चिनी दंतकथा बऱ्याच प्रमाणात खरी असावी असे वाटू लागते, ती लोहचुंबकाच्या दक्षिणोत्तर राहण्याच्या दिशा गुणधर्माचा उपयोग केला गेला म्हणून. आपण भारतीय लोक हे दक्षिण दिशा यमाची, दक्षिणोत्तर झोपू नये, दक्षिणायनात मृत्यू येऊ नये असे म्हणतात. या अशा विचारांतूनच शास्त्रीय सत्याला चालना मिळत असते.

❑

दिशा दाखवी यंत्र झपाझप

चुईक... चुक, चुईक ... चुक असा आवाज करीत एक पोपटवाला त्या आडवाटेने जात होता. त्याच्या खांद्यावर बांबूने बनवलेली एक कावड होती. पोपटाचे तीन-तीन पिंजरे या बांबूवर दोरीने बांधलेले दिसत होते. पोपटाचे पिंजरे लाकडाचेच म्हणजे बांबूच्या चिपाट्यांचे केलेले होते. पोपटवाला बिचारा गरीब, म्हातारा दिसत होता. त्याच्या अंगावर धड नीटसे कपडे नव्हते. पायात पायतणे होती, ती जाड कापडांचीच असावी. कसे तरी करून तो त्या रस्त्याचा चढ चढत होता...चुईक ...चुक, चुईक ...चुक...आवाज करीत...

थोडा रस्त्याचा चढ कापून झाल्यावर त्याने कावड खाली ठेवली आणि खाली नजर टाकली. तेव्हा त्याच्यानजरेस आले की तो बराच चढ चढून वर आला आहे. खालच्या बाजूला शेतांचे त्रिकोणी-चौकोनी हिरवट-पिवळे खोबऱ्यांच्या वड्यांसारखे आकार दिसत होते. एकदोन गर्द हिरवी झाडे... पुढे नदीचे कोयत्याच्या आकाराचे वळण, या वळणापाशी बांबूचे एक गर्द हिरवे बेट आणि पाठीमागे उंचच उंच अवाढव्य फिकट जांभळा डोंगर...

आपण आलो तरी कुठे आहो? इथे लोकवस्ती आहे का? आपले पोपट इथे विकले जातील का? पोपटवाला विचार करीत थोडा वेळ तिथे थांबला. तोच कानाच्या तिरक्या दिशेला पक्ष्यांचा एक थवा पंख हलवत, गिरक्या घेत उडतोय असे त्याला पुसट दिसले. त्या चित्राने त्याचा सगळा दम निघून गेला आणि थोडे अजून वर तर जाऊन पाहू या, असा विचार करून तो कावड उचलून निघाला. कावड उचलताना पोपटांनी पंखांची फडफड केली. त्याला मजा वाटली. पण नंतर मात्र चुईक ...चुक, चुईक...चुक या कावडीच्या आवाजाचाच त्याला कंटाळा आला.

पिवळ्या मुरमाचा तो मोकळा रस्ता सरळ डोंगराकडे गेलेला होता. त्या वाटेवर त्याच्याशिवाय कोणी मनुष्य दिसत नव्हता नि प्राणीही नव्हते. इथे कुणी राहातच नसावे असा विचार आता त्याच्या मनात आला. पण समोर काळ्या दगडांची एक खाण दिसायला लागली हाती. अजून बरीच दूर होती ती. पण आता परत गावात जायचे त्यापेक्षा जाऊ या वर, घेतले कुणी पोपट तर ठीक. या विचाराने तो थकलेल्या देहाला पावलांनी रेटत राहिला.

तेवढ्यात त्याला एका कडेला दगडांच्या राशीजवळ एक छोटा मुलगा उभा असलेला दिसला. कावड खाली ठेवून पोपटवाला एका झाडाजवळ उभा राहून कुतूहलाने त्या मुलाचा खेळ पाहू लागला. मुलगा १०/१२ वर्षांचा असेल नसेल पण बराच तरतरीत आणि हसरा दिसत होता. झाडाच्या खाली आलेल्या दोर फांद्यांमध्ये त्याने एक बांबू बांधलेला होता आणि या बांबूवर चार पाच दोर आणि या दोरांना टांगलेले लांबोळके, अणकुचीदार दगड दिसत होते. मुलगा दगडांना हात लावून हलकेच फिरवत होता. प्रत्येक दगडाचा ओळंबा दोरीमुळे गरगर फिरत फिरत स्थिर होत पुन्हा उलट्या बाजूने फिरत फिरत पुन्हा उलटसुलट... थांबत होता.

'श्या!'पोपटवाला स्वतःशीच म्हणाला, 'वेळ दवडायचा खेळ आहे झाले!'पुढले शब्द मात्र तो थोडा मोठ्याने म्हणाला.

त्याचे ते थोडे अस्पष्ट, थोडे स्पष्ट शब्द ऐकून तो छोटा मुलगा मोठ्या आवाजाने त्या पोपटवाल्याला म्हणाला, 'अहो राव, हा काही खेळ नाही चाललेला. मी दोरीने टांगलेले दगड पहा कसे वेगळे आहेत. प्रत्येक दगड गरगरताना थांबला की कसा एकाच दिशेला उभा राहतोय ते पहा.'

मुलाने पाच ओळंब्यांपैकी थांबलेले तीन ओळंबे बोट पुढे करून पोपटवाल्याला दाखवले. या तीन ओळंब्यांना बांधलेले दगड एकाच सरळ रेषेत उभे होते. पोपटवाल्याच्या हे लक्षात येतेय तोच दुसरे दोन ओळंबेही गरगरण्याचे थांबले आणि त्यांना बांधलेले चपटे चिंचोळे लांबट दगड पहिल्या तीन दगडांच्या रेषेतच उभे राहिले.

'थोडे जवळ जवळ घे ते ओळंबे!' पोपटवाला त्या मुलाला म्हणाला.

मुलगा पोपटवाल्याने सांगितले' तसे करणार तेवढ्यात रस्त्यावर गाढवांचा तांडा उभा राहिलेला त्यांना दिसला. गाढवावर बसणारा एक राकट-दणकट तार्तार, क्रूर माणूस रागारागाने खाली उतरला. त्याच्या हातात एक वेताची छडी होती. त्या माणसाला पाहूनच छोटा मुलगा रडत रडत पळत सुटला आणि तो क्रूर, तार्तार माणूस त्याच्यामागे छडी उगारून धावत गेला.

पोपटवाल्याने बराच वेळ मुलगा परत येतो का याची वाट पाहिली. पण तो काही आला नाही. तेव्हा त्याच्या मनात एक विचार आला. तो झटदिशी त्या ओळंब्याकडे गेला. झपाझपा त्याने ते ओळंबे काढले आणि आपली कावड घेऊन तो लगबग आल्या वाटेने चालू लागला. त्याच्या पाठीमागे गाढवांचा तांडा येत होता. छोटा मुलगा मोठमोठ्याने ओरडत होता-'अरे, माझे दगड दे, दगड दे'. पण पोपटवाला मात्र तो आवाज ऐकून चोरासारखा लगबग चुईक चुक, चुईक चुक करीत जात राहिला.

संध्याकाळ होत होती. डोंगरावर तांबूस लाली पसरली होती आणि त्या लालीचे प्रतिबिंब नदीच्या पाण्यात पडले होते. संध्याकाळचा गार वारा सुटला होता आणि पोपटवाला झपाझपा रस्ता कापत होता. शेवटी तो एका दुसऱ्या रस्त्याला लागला. काळोखात गडप झाला. एका आडोशाला त्याने कावड खाली ठेवली. पोपटांना फळे दिली, पाणी दिले आणि शांतपणे शिदोरी उघडून तो खाऊ लागला. नंतर एका दगडाची उशी करून तो झोपायची तयारी करू लागला. पोपटावर कोणी झडप मारू नये म्हणून त्याने एक कापड पिंजऱ्यावर टाकले. मग मात्र त्याने शांतपणे ताणून दिली.

सकाळी पोपटवाला लवकर उठला. रात्री त्याला एक कल्पना सुचली होती. छोट्या मुलाचे जे दगड त्याने पळवले होते ते मोठे विलक्षण होते. एकाच रेषेत ते उभे राहात. बुद्धदेव ज्या देशातून आले होते त्या दिशेकडे तोंड करून ते दगड उभे राहात. समजा हे दगड आपण पोपटांच्या पिंजऱ्यात झोपाळी म्हणून बसवले तर पोपट झोके घेतील आणि झोपाळ्यावरून उडी मारून ते पिंजऱ्याच्या काड्यांवरती राहिले की दगड

एका जागी स्तब्ध उभे राहतील. यापुढे आपण पोपटांचा फक्त खेळ करून दाखवायचा. पोपट विकण्यापेक्षा असा खेळ करून आपण खूप पैसे कमवू शकू.

या विचारासरशी तो कामाला लागला. प्रत्येक पिंजऱ्यात त्याने एकएक दगड बांधला. लांबोळका-चपटा दगड दोरीमुळे स्वतःभोवती फिरू लागला तोच त्या दगडावर पोपटाने उडी मारली. दगड तिरका झाला आणि फिरू लागला. त्यामुळे पोपटाला पिंजऱ्याच्या काड्यांवरती परत उडी मारण्याची लहर आली. दगड सरळ झाला आणि हळूहळू स्वतःभोवती उलट दिशेने एक-दोन चकरा मारून स्तब्ध उभा राहिला. इतर पिंजऱ्यातही असेच घडत गेले. पिंजऱ्यातले दगड सुलट गिरक्या मारत होते. एकाच जागी स्थिरावत उभे राहत होते. जेव्हा ते स्थिर उभे राहत तेव्हा ते एकाच दिशेत दक्षिण-उत्तर दिशेत उभे राहत. सर्वच्या सर्व सहा पिंजऱ्यातले दगड एका रेषेत उभे राहण्याचा योग फार क्वचितच येई. पण तीनचार तरी अधूनमधून एकाच दक्षिण-उत्तर दिशेत उभे आहेत असे मात्र दिसे.

पिंजऱ्यात झोपाळे बसवणे संपल्यावर पोपटवाल्याने कावड खांद्यावर टाकली आणि चुईक चुक, चुईक चुक करीत गावाचा रस्ता धरला. बरेच अंतर चालून झाल्यावर त्याचे त्याला कळले की आपण एका मोठ्या शहराच्या रस्त्याला लागलो आहोत. समोर एक बुद्ध मंदिर-पॅगोडा-उभे होते. कावड खाली ठेवून त्याने मोठ्या भक्तिभावाने त्या मंदिराला नमस्कार केला. बुद्धदेव ज्या दिशेला जन्मले ती दिशा-दक्षिण दिशा- त्याच्या पिंजऱ्यातल्या दगडांमुळे कळत होती. पॅगोडाच्या आसपास अनेक लोकांची गर्दी जमलेली दिसत होती-म्हातारे-कोतारे, छोटे, लहान-मोठे, बाया-बायका...

खाली ठेवलेले पोपट पाहून चार मुले अवतीभवती जमली. मग चारांची आठ झाली. आठांची अठरा...अशी गर्दी जमू लागली. डोळे बंद करून आणि भक्तिभावाने हात उंचावून पोपटवाला म्हणाला,'ऐका हो ऐका. भगवान बुद्धदेवांचा जन्म कुठल्या दिशेला झाला? ते पोपटांना विचारा!'

लोक पाहत होते. पोपट उड्या मारत होते. झोपाळ्याच्या दगडावर बसत होते. दगड झोके घेत होते. गरगर फिरत होते आणि थांबून स्थिर राहत होते... दगड ज्या दिशेला उभे राहत होते त्याच दिशेला पॅगोडाचे तोंड उभे होते त्यामुळे बघणारे आश्चर्यचकित होत होते. त्यांना पोपटाचे पिंजरे जादूचे वाटू लागले. पोपटांनी कितीही झोके दिले तरी दगड स्थिर उभे राहताना ते दक्षिण-उत्तर दिशेला, त्या दिशेच्या सरळ रेषेत उभे राहत ही मोठी मजेशीर गोष्ट होती.

आता पोपटवाला ठिकठिकाणी खेळ करू लागला. एका गावाहून दुसऱ्या गावाला जाऊन तो खेळ करीत होता. बघणारे लोक पैसे देत होते. पोपटवाला श्रीमंत बनत होता. केवळ सहा दगडांवर आपण गडगंज पैसा कमावू हे त्याचे त्यालाही खरे वाटत नव्हते. मधूनच त्याला त्या छोट्या मुलाची नि त्याचे दगड पळवल्याची आठवण होई. थोडे वाईटही वाटे, पण क्षणभरच. नंतर त्याचे लक्ष अधिकाधिक पैसे गोळा करण्याकडे लागे.

एकदा एका मोठया शहरात तो पोपटाचा खेळ करीत होता. बुद्धदेव ज्या देशातून आले त्या देशाची दिशा दगड दाखवत होते. लोक पैसे देत होते. पोपटवाला खेळ संपल्यावर पैशाचे बोचके बांधू लागला. त्याच्या रेशमी रुमालात पैसे मावत नव्हते. तेवढ्यात त्याचे लक्ष एका झाडाजवळ उभा असलेल्या माणसाकडे गेले. हा माणूस सरदार घराण्यातील दिसत होता. त्याच्या अंगावर भरजरी कपडे होते. कंमरेला तलवार होती. जवळच त्याची दोन मदारींच्या उंटांची गाडी उभी होती. पोपटवाल्याचे लक्ष या माणसाकडे गेले. तोच त्याने हात करून त्याला जवळ बोलावले. एकदम घाबरून जाऊन पोपटवाला बोचके घेऊन त्याच्याकडे गेला.

सरदार गालातल्या गालात हसला. आपल्या लांबच लांब मिशांवरून त्याने हात फिरवला आणि हातानेच पिंजरे देण्याची आज्ञा केली. पोपटवाला गयावया करू लागला. 'हे माझे पोट आहे' असे सांगू लागला. 'असे नका करू' विनवू लागला. त्यामुळे संतापून जाऊन सरदाराने त्वेषाने तलवार म्यानातून बाहेर काढली आणि पोपटवाल्याच्या बोचक्यात खुपसली. खळकन बोचक्यातून नाणी जमिनीवर पडली. सरदाराच्या लोकांनी झपाझपा पोपटवाल्याचे पिंजरे गोळा केले आणि उंटांच्या गाडीत नेऊन ठेवले. मग पोपटवाल्याचे दंड पकडून त्यांनी त्याला फरफटत ओढत गाडीकडे नेले आणि सरदारासह गाडी चालू झाली.

उंटाची गाडी आता राजवाड्याच्या रस्त्याला लागली. पोपटवाला अजून गयावया करीत होता. सरदार हसत होता. चौकांमागून चौक ओलांडत, कमानीच्या दरवाजातून जाताना वेग मंद करीत गाडी राजाच्या भल्या मोठ्या प्रासादाजवळ येऊन उभी राहिली. सरदार खाली उतरला. त्याच्या सैनिकांनी पोपटवाल्याला खाली खेचले. पोपटांचे सहा पिंजरे अलगद बाहेर काढले. सरदाराने पोपटवाल्याला पकडून आणले त्याला एक कारण होते. गेले कैक दिवस तो सरदार एका प्रश्नाने त्रस्त झाला होता. पश्चिमेकडून काही अरब व्यापारी राजाकडे आले होते. त्यांचा लमाणांचा तांडा चीनला पोचला आणि या तांड्याचा मुख्य नायक मरण पावला. या नायकाचा मुलगा लहान होता. तोही त्याच्या बापाबरोबर आला होता. पण आता स्वतःच्या देशाचा मार्ग कसा शोधायचा हा त्याला प्रश्न पडला होता. अचानक अपघात होऊन बाप मरून गेला. त्यामुळे अचूक मार्ग सांगणारा त्यांच्या तांड्यात कोणी उरलेला नव्हता. केवढी मोठी रेशमाची खरेदी त्यांनी केली होती नि मार्ग चुकून भलतीकडेच ते लोक गेले तर! चीनच्या राजाला त्या मुलाने हा प्रश्न टाकला. राजाने आपल्या अनेक प्रधानांना, सरदारांना हा प्रश्न टाकला. पैकी या सरदाराने पोपटवाल्याला पाहिले आणि पोपटाचे पिंजरे, त्या पिंजऱ्यातले ते ठराविक दिशेला उभे राहणारे दगड पाहून त्याला एक कल्पना सुचली-'दगड दक्षिण-उत्तर दिशा दाखवतात, तेव्हा पूर्व-पश्चिम दिशा कळायला कठीण नाही.' सूर्य मावळताना उंटाचा काफिला बाहेर काढायचा. या काफिल्याच्या पुढे पोपटवाल्याला उभा करायचा. सहा पिंजरे एका जागी ठेवून पोपटवाल्याने दिशा निश्चित करायची. अशा तऱ्हेने पाहुणे व्यापारी अचूक त्यांच्या देशाला पोहोचतील. आपल्याला इनाम मिळेल राजाकडून. दहा-बारा गावांची जहागिरी मिळेल. वाटेत प्रवासी पाहुणे वाट चुकले तर पाहुणे लोक आणि पोपटवाला मरून जाईल. आपले इनाम तर जाणार नाही.

सरदाराने खदाखदा हसत राजाला ही गोष्ट सांगितली. त्याने पिंजऱ्याची दारे उघडून पोपटांना आकाशात सोडले. रिकामा पिंजरा पोपटवाल्याला देऊन लमाणांच्य तांड्याला वाट दाखवण्यास सांगितले. मग राजाकडे त्याने पाहिले.

राजाने मान हलवली. एक हात वर केला. त्याबरोबर शंभर उंटांच्या पाठीवर व्यापाऱ्यांनी खरेदी केलेली रेशमाची खरेदी बांधण्यात येऊ लागली. बघता बघता उंट तयार झाले. व्यापाऱ्याचा मुलगा आणि त्याच्याबरोबर आलेले व्यापारी उंटाच्या गाडीत बसले. सूर्य मावळता मावळता तो लांबच लांब तांडा राजधानीतून बाहेर पडला आणि मावळतीच्या रोखाने धूळ उडवत जाऊ लागला. हळूहळू निमुळता होत होत तो उंटांचा अवाढव्य लांबच लांब काफिला काळ्या ठिपक्याएवढा दिसत काळोखात काळा होऊन गेला. बिचारा पोपटवाला पिंजरा घेऊन तांड्यापुढे गेला.

गालातल्या गालात हसणाऱ्या सरदाराला राजाने हात करून जवळ बोलावले व तो म्हणाला,'पोपटाचे हे पाच पिंजरे घेऊन जा. आपल्या सर्व राज्यात शोधाशोध कर आणि हे भगवान बुद्धदेवाच्या देशाची दिशा दाखवणारे दगड कोणी शोधून काढले त्या माणसाला माझ्याकडे, घेऊन ये. माझी खात्री आहे केवळ बडबडीची घोकंपट्टी करणाऱ्या पोपटांना सांभाळणारा माणूस असे विलक्षण दगड शोधू शकणार नाही. या दगडांचा शोधक कुणी निराळाच माणूस आहे... त्याचा शोध लावलास तरच तुला तुझे इनाम मिळेल. शोध लागला नाही तर तुलाही त्या पोपटवाल्याच्या पाठोपाठ जावे लागेल!'

❑

कागद

आपण भूर्जपत्रांवर आणि मिसर देश 'पापायरस' म्हणजे झाडांच्याच सालींवरती लिहीत होता तेव्हा चीनमध्ये कागद बनवला गेला. कागदाचा शोध हा 'शोध' म्हणून मनात ठसत नाही याचे कारण तो आपल्या नित्याच्या परिचयाचा झाला आहे. शिवाय शोध म्हणजे काही तरी भव्य-दिव्य अशी आपण कल्पना करून घेतलेली असते.

कागद हा एक सेंद्रीय तंतू (ऑरगॅनिक फायबर) आहे. गवत, चिंध्या वगैरे कुजवले की लगदा-सेल्यूलोज तयार होतो. हा लगदा पूर्ण सपाट, पातळ आणि गुळगुळीत करुन कागद तयार केला जातो. तो चिवट व्हावा म्हणून कांजी किंवा गोंद त्यात टाकला जातो. हाती तयार केलेल्या कागदावर पाण्याचा ठसा (वॉटर मार्क) येतो. या कागदाचे स्वरूप थोडेसे खडबडीतच असते.

आज कागद हाती (हॅण्ड मेड) तयार करण्याचे दिवस संपले आहेत. मोठ्या मोठ्या गिरण्यांमधून आज कागद तयार केला जातो. लगदा पिसण्यासाठी मोठे मोठे ड्रम आणि मिक्सर वापरले जातात. चिंध्या कुजवण्यासाठी बॉयलरची वाफ, एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे कागद वळवून नेण्यासाठी ड्रायर्स भट्ट्या, बेल्ट कन्व्हेअर, चेन ड्रायव्हर्स अशी अनेक अद्ययावत सामग्री वापरली जाते. तयार होणारा कागद घासून पुसून गुळगुळीत केला जातो आणि सोडा, ॲसिड वगैरे रसायनांच्या मदतीने तो पांढरा शुभ्र होईल याची दक्षता घेतली जाते. कागदाचे आजचे विश्व केवढे मोठे बनले आहे. या विश्वात कांद्याच्या सालीसारखा पापुद्र्याहून पातळ 'ओनियन' कागद आहे. जाडा भरडा पॅकिंगचा 'पुठ्ठा' आहे. साय-मलईसारखा स्पर्श देणारा 'आर्ट पेपर' आहे. शाई निमूटपणे टिपणारा 'टीपकागद' आहे. प्रत काढणारा 'कार्बन' कागद आहे. नकाशे काढता येणारा 'ट्रेसिंग' पेपर आहे. फुले बनविता येणारा 'क्रेप' पेपर आहे. गॅलव्हनाईझ्ड पत्र्यांसारखा नागमोडी पाठ असणारा औषधांच्या खोक्याचा कागद आहे. भुसभुशीत 'टिश्यू' पेपर आहे, स्टॅंप-नोटांचा चिवट कागद आहे...कागदाचे विश्व फार मोठे आहे आणि या कागदावर जे लिखाण लिहिले जाते ते विश्व तर या कागदाच्या जातीप्रतीच्या विश्वाहून कमालीचे मोठे आहे. रोज रोज ते वाढत आहे. हे म्हणजे विश्वामध्ये अणू परमाणू असावेत आणि अणू परमाणू फोडल्यावर आत सूक्ष्म कणांचे विश्व असावे तसे काहीसे आहे... म्हणूनच या कागदाच्या शोधाबद्दल अफाट आश्चर्य वाटू लागते.

❑

'मी केले साक्षर जगाला'

तो मिठागराचा प्रदेश होता. जिकडे पहावे तिकडे मिठागरांचे चौरस तुकडे दिसत होते. खाडीचे पाणी या चौकोनी तुकड्यात शिरलेले होते. सूर्याच्या चकचकीत किरणांमुळे एकाद् दुसऱ्या चौकोनात ते चमचम चमकताना दिसे. पलीकडच्या काठावर पांढऱ्या तंबूसारखे मिठाचे ढीग केलेले होते आणि ते पोत्यामधून वाहून नेण्यासाठी खेचरे आणि गाढवे रांगेने उभी दिसत होती.

आकाश पतंगांनी भरलेले होते. सुती कापडाचे आणि रेशमाचे ते पतंग होते. निरनिराळ्या रंगांचे, वेगळ्या वेगळ्या आकाराचे. पतंगांकडे पहात अनेक छोटी मोठी मुले हातात काठ्या घेऊन हिंडत फिरत होती. ओरडत होती. हातवारे करीत होती.

पण एक मुलगा मात्र एका झाडाजवळ उभा राहून रडत होता. मधूनच डोळे पुसत तो आकाशात उडणाऱ्या एखाद्या रंगीत पतंगाकडे पहात राही. पुन्हा रडायला लागे... पुन्हा दुसऱ्याच कुठल्या तरी उंच बदवलेल्या कळ्याकडे पाही... असे तो पहात असतानाच संध्याकाळ झाली. तेव्हा मात्र तो मुलगा निघाला. झपाझपा घराकडे जाऊ लागला. घरी उशीर झाला तर त्याला आजोबा-आजी रागवणार. शेतामधून आलेले वडील छडीने मारणार आणि इतर मोठी भावंडे टपल्या देणार. या विचाराने तो घरी जायला निघाला. मिठागरांच्या काठाकाठाने बांधावरून... एक वाफा ओलांडून दुसऱ्यावर उडी मारत... तोच त्याचे लक्ष एका बांधाकडे गेले. कडेवरचे, बांध टिकवण्यासाठी ठेवलेले गवत पाण्यात बुडालेले होते. हे कुजलेले गवत तो पहात असताना त्याला तिथे दुधाच्या खरपुडीसारखे पांढरे पापुद्रे दिसले. हे पांढरे टरफल कसे तयार झाले?

हे मिठाचे तर नसतील? तो मनाशीच म्हणाला. 'मीठ आहे का' हे पाहण्यासाठी तो खाली वाकला आणि टुणकन् उडाला. बांधावरच्या एका वाळक्या गवताच्या काडीने त्याला टोचले आणि त्यामुळे बिचकून तो एकदम उडाला. म्हणजे पाय घसरून खाली पाण्यात पडला. हातातला पांढरा पापुद्रा देखील त्याच्याबरोबर खाली पाण्यात पडला.

पण आश्चर्य असे की पाण्यात तो पापुद्रा विरघळण्याऐवजी तरंगू लागला. मीठ असते तर ते नक्कीच विरघळले असते. मुलाने बांधाच्या काठाकाठावर सर्वत्र पाहिले. तिथे गवत कुजले होते तिथे तो फेसासारखा पांढरा पापुद्रा दिसत होता. तेवढ्यात एक रेशमाचा पतंग धपकन त्याच्यासमोर कोसळला. तो पतंग ज्याचा होता त्याला तो देऊन मुलगा घरी धावत सुटला. आपल्याला वडिलांनी 'पतंग देणार नाही' असे सांगितले. पण त्यासाठी दुसऱ्याचा पतंग आपण चोरायचा, बळजबरीने पळवायचा हे काही त्याला पटत नव्हते. या विचारातच तो घरात शिरला... आणि गुपचूप काही तरी करू लागला.

त्याचे वडील अजून आलेले नव्हते. डुगडुगत्या मानेचे आजोबा अजून परसदारच्या बागेत काम

करीत होते. आजी काही तरी शिवत होती. आई स्वयंपाक करीत होती. जो तो कामात गढलेला होता. बहीण फुलांचा हार गुंफत होती. भाऊ काहीतरी ठाक ठूक करीत होता. तो मात्र काहीच करीत नव्हता.

तो काहीच करीत नव्हता असे मात्र नाही. त्याच्या डोक्यात विचारांचे वादळ चालले होते. शेताच्या मिठागराच्या बांधावर त्याने जे पांढरे पापुद्रे पाहिले होते, त्याबद्दल तो विचार करीत होता. समजा आपण कचरा असा कुजवला तर तो पांढरा फेसाळ पदार्थ जमा होईल? हे मोठ्या प्रमाणात केले तर?

'... हो!' तो स्वतःशीच म्हणाला आणि त्याची आई आश्चर्याने त्यांच्याकडे पाहू लागली. कारण त्याच्यासमोर त्यावेळी जेवणाचे ताट होते. हातात बांबूच्या चिपाट्या होत्या... पण असा प्रसंग त्याच्या आईला नवा नव्हता. तिचा हा मुलगा चुआंग थोडा विचित्रच होता. इतर नऊ भावंडे कशी कामसू होती. पण हा सर्वात छोटा, लाडाने थोडा वेडा झालेला... तो मुळी कुठे लक्षच देत नसे. मोठी भावंडे त्यांच्या वाड्यात येणाऱ्या कोंबड्या, बदके, डुकरे पकडून ठेवत आणि रात्र झाली की आईकडे शिजवण्यासाठी आणून देत,शेजारीपाजारी ओरडू लागले की जणू काही घडलेच नाही असा चेहरा करून ते बसत. अशा वेळी चुआंगला वाटे की खरे काय ते सांगून टाकावे. खरे बोलावे असे कन्फ्यूशियस गुरुदेवांनी सांगितले असले तरी इथे ते कुणीच अमलात आणत नव्हते, या माणसांना पांढऱ्या पापुद्र्याचे काय सांगणार?

कुजवलेल्या पदार्थातून पांढरा हलकाफुलका गर बाहेर येतो आणि हा गर धाग्याधाग्यासारखा तंतूमय असतो या गोष्टीचा पडताळा चुआंगला पुढे आला. त्याने पाण्याच्या एका मोठ्या चौरसात एक लाकडाची चौकट बसवली. या चौकटीवर एक चटई टाकली. तिच्यावर कुजवून बारीक भुगा केलेला लगदा टाकला आणि पाणी काढून टाकण्यासाठी सपाट लादी उभी केली. ती धप्पकन लोळागोळा होऊन खाली पडली. त्याच्या एका भावाने या लगद्याला भाताची कांजी लाव म्हणून त्याला सांगितले. लगद्यावर कांजी लावली तसा तो थर चुआंगला दोरीला टांगून वाळवताही आला... असा एक थर तयार झाला. दुसरा झाला. तिसरा झाला... परसदारी बांबूच्या झुम्मड झुडुपात चुआंग आपले लगद्यांचे थर वाळवत ठेवत होता. आपण ही जी 'वस्तू' बनवतोय ती काय आहे? हेच त्याला कळत नव्हते. पण या वस्तूचा उपयोग पतंगासाठी करता येईल हे मात्र त्याला पटत होते. घरच्या गरीबीमुळे आपले वडील आपल्याला पतंग आणून देत नाहीत. ठीक आहे. आता तरी आपल्याला पतंग करता येईल.

चुआंगचे पतंगाचे कापड करण्याचे हे प्रयोग म्हणजे त्याच्या आई-वडिलांना एक डोकेदुखीच झाली होती. दिवस रात्र, जेवणखाण सर्व काही विसरून चुआंग त्याच्या पतंगाच्या कापडापाठीमागेच धावत असे. कधी वाड्यातल्या खड्ड्यात पाणी भरून त्यात गवत कुजवत ठेव तर कधी ओला कचरा कुटून कुटून लगदा कर. त्यावर कांजी लावून त्याचे थर चटईवर पसर; तर कधी ते वाळत घालण्यासाठी बांबूच्या दोन खोडांना दोर बांधत रहा... असे त्याचे कार्यक्रम चालत.

पतंगाचे कापड बनवण्याच्या या प्रयोगाने चुआंगचे वडील एक दिवस फारच संतापले. त्यांना

सकाळी उठल्यावर त्यांची ढेकळे फोडायची काठी मिळेना. काठी घेतल्याशिवाय शेतावर जाता येत नव्हते, कारण भाजी लावण्यासाठी नवे वाफे तयार करायचे होते. ते तावातावाने परसदारी गेले. तिथे पाहतात तो त्यांची काठी दोरी लावण्यासाठी वापरली होती. तीन-चार दोऱ्यांवर पतंगाने कापड वाळत टाकलेले होते. रागारागाने ते एक-दोन दोऱ्या तोडून टाकणार तोच त्यांचे लक्ष समोरच्या रस्त्याकडे गेले.

समोरच्या रस्त्यावर उभा राहून पतंगाच्या टांगलेल्या कापडी तुकड्यांकडे एक बौद्ध भिक्षू कुतूहलपूर्वक पहात होता. टांगलेले कापडी तुकडे त्याला आश्चर्यचकित करीत होते. डोक्याचा तुळतुळीत नकोट, अंगावर रेशमी पिवळी वस्त्रे, अंगकांती पिवळी धमक तेजस्वी असा तो भिक्षू होता. त्याचा चेहराच त्याने फार मोठा प्रवास केलेला असावा याची साक्ष देत होता. बुद्ध देवाची उपासना करणारा तो भिक्षू हळूहळू पावले टाकीत परसदारी आला. टांगलेल्या पत्र्यांकडे पहात पहात...

... तो आत यायला आणि एक डुकराचे पिल्लू केकाटत भिक्षूदेवांच्या पायामधून जायला एकच गाठ पडली. भिक्षू पहात राहिले. हा एक शुभ शकून होता. ते चुआंगला वडिलांना म्हणाले,'हे काय आहे? झाडाची साल आहे की एखाद्या प्राण्याचे कातडे?'

'थांबा! चुआंगला बोलावतो. त्यालाच माहीत आहे हे काय आहे ते. तोच हा पसारा करून ठेवतो.'

चुआंगच्या प्रयोगाने इतर कुणी खूष झाले नव्हते. पण बौद्ध भिक्षू मात्र फार आनंदित झाले. त्यांनी जवळ जाऊन ते दोरीवर वाळत घातलेले कापड पाहिले. या कापडावर जातक कथा, पाली कानन मंत्र वगैरे लिहिता येतील. असा विचार त्यांच्या मनात आला. या मुलाला आपण मठात घेऊन गेलो तर आपण त्याच्याकडून अशा प्रकारचे कापड तयार करून घेऊ. हे कापड आपण राजदरबारी पाठवू आणि राजदरबारी कन्फ्यूशिअसची वचने, जातककथा वगैरे यावर लिहिता येतील. राजा आपल्या मठाला मोठी देणगी देईल...

भिक्षू डोळ्यांपुढे एक स्वप्न रंगवत असतानाच चुआंग समोर आला. चुआंगच्या वडिलांची गरीबी लक्षात घेऊन भिक्षूंनी चुआंगला आश्रमात नेण्याची कल्पना मांडली. चुआंगच्या वडिलांना काय, तेच हवे होते. नऊ मुले, म्हातारे आई-वडील आणि इतर चुलत कुटुंब परिवार या सर्वांचे पोट शेतीवर भरत नव्हते. त्यांना अर्धपोटी राहून कसे तरी दिवस रेटावे लागत होते. त्यांनी आनंदाने संमती दिली. चुआंग मठात राहून बुद्ध भिक्षू होईल, ज्ञान संपादन करेल अशी त्यांची कल्पना. भिक्षू चुआंगला का घेऊन जात आहेत हे त्यांना बिचाऱ्यांना कळणार कसे?

त्याच संध्याकाळी चुआंग बुद्ध भिक्षूबरोबर निघाला. पतंगाने कापड तयार करण्याचा आपला बेत त्याने चालता चालता भिक्षू महंतांना सांगितला. पण ते काही एक न बोलता झपाझपा चालत होते... 'ना गी गेन मो' असे फक्त तोडाने म्हणत राहिले. आता संध्याकाळ व्हायला आली होती. रक्तासारखे लाल लाल सूर्यबिंब हळूहळू डोंगराकडे सरकत होते. सभोवती झाडांच्या सावल्या लांबच लांब पडायला लागल्या होत्या.

गाव मागे पडून अरण्य लागायला सुरुवात झाली होती. या भिक्षूंचा मठ आहे तरी कुठे? घाबरगुंडी उडून चुआंगच्या पोटात आता भीतीचा गोळा उठत होता. या गर्द रानामधून एकादे भूत बाहेर आले तर...

भूताचे नाव मनात येताच चुआंगला एक झाडावर लटकलेल्या बांडगुळाचा डोळा चमचम करतोय असे वाटू लागले. त्यावेळी त्याला त्याच्या आजीची आठवण झाली. डुगडुगत्या मानेची त्याची आजी त्याला रात्री,'ड्रॅगन आणि देवपदाला पोहोचलेले पाच राजे' यांची गोष्ट सांगायची... भिक्षू एका झाडाखाली थांबले. चुआंगला पाठीवरून प्रेमाने हात फिरवत त्यांनी त्याला घरून बांधून आणलेली शिदोरी खाण्यास सांगितले... पण त्या गर्द काळोखात चुआंगला काही सुचतच नव्हते... समोरच्या झाडाखाली पाचोळ्याचा हिस्फिस् आवाज झाला, झाडावरच्या पक्ष्यांनी कीर्र SS चीत्कार केला, पंखांची फडफड केली आणि चुआंगची झोप पार उडून गेली. त्याच्या मनात आले यापेक्षा आपले घर काय वाईट होते? आई-आजोबा थयथयाट करून भले रागे भरत. पण ते पतंगाचे कापड तयार करणे खरोखर बरे होते. या हलक्या कापडाचा पतंग हवेत कसा उंचच उंच जाईल. ढगांच्याही पार पलीकडे, आकाशात जिथे पाच राजे आणि ड्रॅगन राहतात तिथे.

दुसऱ्या दिवशी मठात पोहोचल्यावर मात्र चुआंग खूष झाला. डोंगरावरचा तो मठ काय सुंदर होता. डोंगरातच अनेक छोट्या छोट्या खोल्या खोदलेल्या होत्या. सर्वजण आपापल्या खोलीत बसून प्रार्थना करीत. बुद्धदेवाच्या पुतळ्याकडे ध्यान लावून बसत... खोल्या काळोखाने भरलेल्या आणि कुबट वास येणाऱ्या होत्या. पण पाणी मात्र थंडगार होते. हवा छान होती. आणि मुख्य म्हणजे चुआंगला भिक्षूदेवांनी पतंगाचा कपडा तयार करण्याचे काम दिले होते.

जे पाहिजे ते चुआंगला मिळत होते. पाण्याचा हौद होता. पाला-पाचोळा कुजवण्यासाठी छोटा खड्डा खणलेला होता. कुजलेले गवत ठेचून ठेचून भुगा करण्यासाठी इतर माणसे मदतीला होती. चटई, लाकडाची चौकट, भाताची कांजी... त्याला हवा असणारा सर्व सरंजाम होता. पण तयार केलेले कापड या नव्या वस्तूला कागद असे नाव दिले तर? — मठाधिपती भिक्षू कुठे पाठवतात ते त्याला कळत नव्हते. त्याचे काम दोरांवर लगद्याचे सपाट कापड वाळत घालणे इतकेच होते. आणि त्याला तर या कापडाचे पतंग तयार करून उंच उंच आकाशात उडवायचे होते.

छोटा चुआंग आताशा फार कंटाळला होता. पतंगाचे कापड त्याला आता नीट व्यवस्थित जमायला लागले होते. हे कापड दिवसेंदिवस पातळ, कमीतकमी जाडीचे असेही त्याला जमू लागले होते. पण... पण... त्याला उत्साह वाटत नव्हता. पतंग तयार करता येत नाही आणि काम रोज करावे लागतेय यात काय मजा आहे? एक दिवस हळूच तो मठामधून सगळ्यांना डोळा चुकवून निसटला आणि पायी चालत चालत, मजल दरमजल करीत, सतरा वेळा वाट विचारत विचारत आपला मिठागरच्या गावात एकदाचा येऊन पोहोचला. त्याच्या येण्यामुळे सर्वच जण आनंदी झाले. वडिलांनासुद्धा खूप आनंद झाला. कारण यापुढे छोटा चुआंग शेतामध्ये काम करणार होता आणि फावल्या वेळी पतंगाचे कापडही करणार होता.

छोट्या चुआंगच्या निघून जाण्यामुळे बुद्ध भिक्षू फार अस्वस्थ झाले होते. प्रयत्न करूनही इतर भिक्षूंना पतंगाचे कापड बनवणे जमत नव्हते. कधी दोरीवर वाळत घातलेले कापड मधेच टरकून फाटून जाई. कधी त्यावरचे खडबडीत तंतू बाहेर येत. इतर भिक्षुंनाही चुआंगने पतंगाचे कापड कसे करायचे ते थोडे शिकवले होते, पण त्यांना त्यात रस वाटत नव्हता. कामात गोडी वाटली नाही तर ते काम चांगले कसे होणार? शिवाय पतंगाचे कापड बनवणे ही मोठी किचकट गोष्ट होती.

अखेर मठामधून हवे असलेले कापड येण्याचे बंद झाल्यामुळे राजाने काही लोक मठाधिपतीकडे पाठवले. या लोकांनी त्या बुद्ध भिक्षूकडून चुआंगबद्दलची माहिती गोळा केली. ती सर्व हकीकत त्यांनी राजाला सांगितली. छोट्या चुआंगच्या तपासासाठी राजा स्वतः आपल्या लवाजम्यानिशी उंटाच्या रथात बसून आला. आपल्याबरोबर त्याने चुआंगच्या गौरवासाठी चुआंगने बनवलेल्या पतंगाच्या कापडावर शिफारसपत्र तयार करून आणले होते. त्या पत्रावर राजाने स्वतःचे बोट शाईत बुडवून चुआंगचे नाव लिहिले. मग चुआंगच्या हातात ते देत राजाने त्याची पाठ थोपटली. तसेच चुआंगच्या वडिलांना खूप पैसा दिला. चुआंगची मुक्त कंठाने स्तुती केली.

त्यांचा निरोप घेत राजाने हसत हसत चुआंगला विचारले, 'या गौरव आणि स्तुतिपत्रकाचे तू काय करणार?'

चुआंग हसला. खाली घसरणारी तुमान वर खेचून त्याने खोलीत जाऊन एक दोरा आणला. पतंगाची कणी बांधली आणि त्या गौरव पत्रकाचा पतंग तो उंच उंच उडवू लागला. बघता बघता त्या मिठागराच्या खाऱ्या हवेवर तो पतंग वर वर उंच गेला. ढगाहूनही उंच उंच हलत डुलत तो जाणार...

पत्रकावर काय लिहिले आहे हे शेतात काम करणाऱ्या चुआंगला वाचता येत नव्हते. कळतही नव्हते. पण राजाभोवती जमलेले, राजाबरोबर आलेले असंख्य लोक माना उंचावून स्पष्टपणे ती अक्षरे वाचू लागले...'अक्षरे काढता येतील अशी ही वस्तू ज्याने तयार केली त्याचा जयजयकार असो!'

❑

कुंचला

कुंचल्याचा उपयोग प्रामुख्याने चित्रे काढण्यासाठी होतो. या कुंचल्याशी चिनी लोकांचा जेवढा संबंध येतो तेवढा आज जगातील इतर कुठल्याही मानव प्राण्याचा येत नाही. चिनी लोक अक्षरे काढण्यासाठीही कुंचला वापरतात. चिनी लिपी ही चित्रलिपी (इडिओग्राफ) असल्यामुळे वळणदार, जाडसर, निमुळती अक्षरे काढायला कुंचला हा फार उपयोगी येतो. बोरू, टाक-फाउंटन पेन आणि कालपरवा निघलेले बॉलपेन वापरून सर्व जग अक्षरे काढते. परंतु चिनी लोक मात्र त्यांच्या पुरातन चित्रलिपीला आणि कुंचल्याला अजून चिकटून आहेत. याचे कारण त्यांच्या रक्तातला चित्रकाराचा स्वभाव हे असावे. प्रत्येक दोन चिनी माणसातला एक चित्रकार असतो...

जगप्रसिद्ध झालेले मोठमोठे चित्रकार पाहिले तर कुंचल्याविषयी आपल्याला आश्चर्यच वाटू लागते. १४-१६ व्या शतकातील रंगसम्राट-लिओनार्दो-दा-व्हिंसी, मायकेल अॅन्जेलो, राफेल, १७-२० व्या शतकातील रुबेन, रेंब्रान्ट, व्हॅनगॉग, सीझनी, कालपरवापर्यंत चित्रे काढणारा आणि विसाव्या शतकातील कलेला नवे वळण देणारा - त्रिमिती चित्रकलेची शैली निर्माण करणारा पॅबलो पिकासो, आपल्याकडले राजा रविवर्म्यापासून अमृता शेरगीलपर्यंतचे महान चित्रकार... हे सर्व आपणास पहावयास मिळाले ते या कुंचल्यामुळेच. चित्रकलेचे विश्‍व कमालीचे मोठे आहे. केसांच्या या सुईएवढ्या अग्रावर उभी राहणारी चित्रांची दुनिया अलिबाबाच्या गुहेमधील हिरे माणकांची साक्ष देण्याएवढी मोठी, अजब आणि डोळे दिपवणारी आहे.

चिनी चित्रशैलीचे वैशिष्ट्य म्हणजे निव्वळ एखाद्या दृश्याचे चित्र न काढता त्या प्रसंगाचा मूड आणि त्या पाठीमागची भावना टिपण्याचा प्रयत्न त्यात असतो. चिनी चित्रकारांनी चित्रकलेचे विश्‍व फार समृद्ध केले आहे. बाराव्या शतकातील हूईत्सुंग राजा हा तर फुलांची चित्रे काढण्यासाठी फार प्रसिद्ध होता. सुमारे ५००० चित्रे असलेली आर्ट गॅलरी त्याने बांधली होती. आठव्या शतकातील 'वू तावो त्से' या चित्रकाराविषयी अशी दंतकथा आढळते की त्याने कागदावर मासा काढला. कागद वाऱ्याने उडून जाऊन नदीत पडला. तेव्हा मासा पाण्यात जाऊन मिसळला... या दंतकथेतील कल्पनेचा भाग सोडून दिला तरी चित्रकला व कुंचला या दोन गोष्टींचा आणि चिनी लोकांचा संबंध किती जवळचा असतो हे सहजच लक्षात येते.

❑

केस फुलवती चित्रकलेला

बारा-तेरा वर्षांना मिंग समोरचे ते दृश्य पाहण्यात गढून गेला होता. मोकळा वेळ मिळाला की काळ्या कुत्र्याला घेऊन घरामागच्या रानात धाव घ्यायची हा मिंगचा कार्यक्रम झालेला होता. रानात जायचे, फुलपाखरांमागे धावायचे, त्यांचे रंग पहायचे, पक्ष्यांच्या आवाजांची नक्कल करायची... हिरवळीवर लोळायचे हेच त्याचे खेळ असत. बरोबर मित्र अगर कुणीही नसले तरी ठीक. फारसे त्याचे अडत नसे. काळ्या कुत्रा मात्र हवा. कारण तो मिंग बरोबर पळापळी करीत असे. शिवाय त्याला भुताचा सुगावा लवकर लागतो असे आजीच म्हणत असे. म्हणून त्याची संगत तो सोडत नसे.

मिंग समोर पहात होता ते एक सुंदर दृश्य होते. एका तळ्याच्या काठावर तो उभा होता. त्याच्यासमोर काळ्या दगडांच्या एकावर एक पायऱ्यांसारख्या चढत गेलेल्या राशी होत्या. या राशीवरून खळखळाट करीत एक झरा उड्या माराव्यात तसा उतरत सुळकन् पाण्यात पडत होता. ज्या दगडांवरून पाणी उतरत होते ते दगड शेवाळी-हिरव्या रंगाचे झालेले होते. त्यांच्या फटीतून अधून मधून एकदोन गवताचे तुरे बाहेर डोके काढत होते. एका गवताच्या पात्यावरचा गोंडा इतका गोंडेदार, छान दिसत होता की मिंगला वाटले, या गोंड्याला हात लावावा... पण त्या दगडांपर्यंत जाण्याचा मार्ग थोडा कठीण होता. दलदलीचा होता. शिवाय हात लागला तर तो गोंडा टिकला नसता अशी भीती होती.

झऱ्याचे पाणी सतत आवाज करीत तळ्यात पडत होते. तुषार उडत होते. वरून येणाऱ्या सूर्यकिरणांमुळे तिथे छानसे इंद्रधनुष्य दिसत होते. वारा आला. दगडांच्या पलीकडे असणाऱ्या झाडाची पाने हलली की खाली पडलेले रंगाचे तुषार दिसेनासे होत. मधूनच तो गोंडेदार तुरा त्या धनुष्याच्या रंगांत वळलेला दिसे... मधूनच मागे येई... परत पुन्हा रंगांच्यामध्ये तोंड खुपसे... पाठीमागे सरके...

'व्वा!' मिंग एकदम म्हणाला. मिंगच्या त्या आवाजाने काळ्या कुत्र्यानेही शेपटी हलवली. जणु काय त्यालाही त्या दृश्याने आनंद झाला.

काळ्या कुत्र्याच्या पाठीवर धपाटा मारत मिंग त्याला म्हणाला,'अरे काळ्या, मी व्वा अशासाठी म्हणालो की हा गोंडा मला हवा आहे. पण आणायचा कसा?'

काळ्या काय उत्तर देणार? तो फक्त मिंगच्या पायांना चाटत राहिला. तेवढ्यात समोर एकदम गडबड झाली. दगडांच्या फटीतून एक पक्षी फडफड करीत बाहेर पडला, तळ्यात त्याने सूर मारला आणि भूर्रकन झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. घाईगर्दीने फडफडाट करीत उडताना त्या पक्ष्याने तो गोंडेदार तुरा तोडून टाकला होता आणि तो तळ्याच्या पाण्यात पडला.

मिंग पहातच राहिला. पण तेवढ्यात काळ्या कुत्र्याने धप्पकन पाण्यात उडी मारली. झपाझपा पोहत तो गोंड्याजवळ गेला आणि पाहता पाहता त्याने तो गोंडा तोंडात पकडून काठावर आणला. 'शाब्बास!'

काळयाच्या पाठीवर प्रेमाचा धपाटा मारीत मिंग म्हणाला. मग मात्र ओला गोंडा हातात घेऊन तो निघाला.

घरी जाता जाता मिंग गोंड्याचा विचार करीत होता. त्याच्या मनात विचार उठत होते. गोंडेदार तुरा पाहून आज त्याच्या विचारांना एक नवा रस्ता सापडला होता. गेले कित्येक दिवस तो एक नव्या तऱ्हेची लेखणी बनवण्याचा प्रयत्न करीत होता. खरे म्हणजे त्याला अशी एक वस्तू बनवायची होती की त्या वस्तूने त्याला सुरेख चित्रे काढता येतील. तो चित्रे काढत राहायचा. ते बांबूचे दांडे, चिपाट्या त्याला आज आठवल्या. चिपाट्या तोंडात घालून, दातांनी चावून बोथट करायच्या. मग अशा चिपाट्यांनी चित्रे काढायची. अक्षरे काढण्यासाठी तर

हाताची बोटे शाईत बुडवायची... काठीला कापडाची चिंधी बांधायची.

आता यापुढे मिंग एक नवा कुंचला तयार करणार होता. गोंडा जसा दिसत होता तसा तो आता एक नवा गोंडा तयार करणार होता आणि या गोंड्याने चित्रे काढणार होता...

मनात काही तरी ठरवत ठरवतच त्याने घरात उडी घेतली. त्याची सर्व भावंडे काही तरी कामे करीत होती. रिकामे असे कोणी बसलेले नव्हते. म्हातारे आजोबा थरथरत्या हातांनी चटया विणीत होते. त्यांच्या फाटक्या अंगरख्याला आजी रफु करीत होती. आई स्वयंपाक करीत, मोठा भाऊ काही तरी ठाकठोक करीत तर बहीण बांबूचे कोवळे कोंब भाजीसाठी सोलत, निवडत बसलेली होती. तो हळूच इतर भावंडांजवळ जाऊन बसला. मिंगच्या पाठोपाठ काळया कुत्रा तिथे येऊन उभा राहिला. शेपटी हलवत राहिला.

मिंग खाली बसला आणि त्याच्या लक्षात आले की, येता येता आपण कुंचला करण्यासाठी बकरीचे केस उपटून आणणार होतो. ते आपण विसरून गेलो. इकडे तिकडे पाहताना त्याला काळया कुत्र्याची शेपटी दिसली. त्याने हात लांबवून हळूच दोन केस ओढले. काळयाला कळलेच नाही काय झालेय. तेव्हा मिंगने आणखी दोन ओढले... आणखी दोन... आणखी... काळया गप्पच होता.

मग मिंगला वाईट वाटले. त्याने काळयाला प्रेमाने जवळ घेतले. पण हातात आलेले सर्व केस चिमटीत दाबून धरून घेतले... मग मात्र मिंग उठला. त्याने ते केस नीट घट्टपणे एका काठीवर दोरीने बांधले. मग तो कुंचला त्याने शाईत बुडवला व कागदावर एक झाड काढले... काय सुंदर झाड दिसत होते ते. मिंग त्या झाडाकडे टक लावून पहातच राहिला.

मिंगला तसे पाहताना पाहून आई हसू लागली. ती त्याला म्हणाली, 'अरे मिंग, तू काय हा मोठा शोध लावलायस. माझी ती केरसुणी पहा... तशीच ही छोटी केरसुणी. नाव काढायचे असेल, राजदरबारी जायचे असेल तर त्या शेजारच्या टुंगसारखा पंखा बनव गवताचा...'

टुंगचे नाव काढल्यावर मिंगला वाईट वाटले. आपण जे काय करतो त्याचे कुणालाच कौतुक वाटत नाही. थोडा रागावूनच तो झोपला. पण सकाळी जागा झाला तेव्हा आश्चर्यचकितच झाला. त्याच्या बिछान्याजवळ आईने एक कागद ठेवला होता लिहून-'आमच्या मिंगने केलेली ही नवी वस्तू अक्षरे काढण्यासाठी

वापरता येईल आणि या वस्तूने काढलेली अक्षरे फार सुरेख दिसतील.'

मिंगचे आता समाधान झाले. आपण केलेल्या वस्तूवर आई खूष झाली होती. काठीवर चिंधी बांधून चित्रे काढण्यापेक्षा आपण बनवलेल्या केसांच्या कुंचल्याने चित्रे छान काढता येतात हे आता सर्वांना कळायला लागले होते. तो हसत हसत उठला आणि परसदारी बाहेर गेला. म्हातारी आजी कोंबड्यांच्या खुराड्याजवळ काहीतरी खुडबूड करीत होती. तिचे लक्ष नव्हते. तेवढ्यात वईच्या बांबूवरून उडी घेऊन तो बाहेर पडलाही...

सकाळचे कोवळे ऊन सर्वत्र पसरले होते. पावसाची सर नुकतीच कोसळून गेली होती. क्लक् क्लक् क्लक् क्लक् करीत शेजारची बदके हिंडू फिरू लागली. त्यांच्या पाठोपाठ पिलांचा गोतावळा घेऊन कोंबड्या बाहेर पडल्या. एक माजलेला कोंबडा वईच्या खांबावरती चढून पंख फडफडवत 'आपण या ठिकाणचे राजे आहो' असे सांगू लागला. मिंगला हे पाहून मजा वाटली. पण त्याने लक्ष समोरच्या हिरव्या-निळ्या डोंगराकडे गेले. केवढा जवळ आलेला दिसत होता तो. सरळ धूम धावत सुटावे त्याच्याकडे असे त्याच्या मनात आले आणि त्याने काळ्या कुत्र्याला यू S यू S यू केले. तो आला आणि वईच्या लागडी बेचांगळी वाटेतून अंग वेडेवाकडे करीत बाहेर पडला...

मग दोघेही जाऊ लागले. चार पावलांवर एक तांबड्या फुलांनी बहरलेले झाड होते. काय छान दिसत होते ते झाड. पायाखाली कोमेजून पडलेल्या पाकळ्यांचा सडा पडलेला होता. एकदा खाली, एकदा वर असा मिंग पाहातोय तोच त्याने चिक चिक क्लिक क्लिक असा आवाज ऐकला. आवाजाच्या रोखाने तो वर पाहतो तो काय, एका फांदीवर उभी होती खारकुंडी. पाठीमागे लफ्फेदार शेपटीचा गोंडा पाहून मिंग फारच खूष झाला. त्याच्या मनात आले, असे केस आपल्याला कुंचला बनवायला मिळाले तर... खारीला मारण्यासाठी जमिनीवरचा दगड उचलायला मिंग खाली वाकला. तेवढ्यात काळ्या थोडा बसक्या आवाजात गुरगुरला. मग मात्र मिंग शरमला. दगडाने आपण खारीला ठार मारणार होतो. पण या काळ्याने आपल्याला सावध केले. खारीला ठार मारून आपल्याला काय मिळाले असते? उगाच हातून पाप झाले असते. त्याला म्हाताऱ्या आजोबांचे एक वाक्य आठवले-'जो एक पाप करतो तो हजार पापे करायला मागे पुढे पहात नाही...'

समोरची खार हातात कशी येईल आणि तिची गोंडेदार शेपटी आपण कधी मिळवू या विचारात मिंग गढलेला असताना खार झाडावरून खाली आली. आता ती खोडावर अगदी खाली चिक चिक क्लक् क्लक् करीत उभी होती. मिंग हळूच झाडामागून पुढे झाला. हात पुढे करून त्याने तिची शेपटी पकडली... खार झरकन भेदरून वर गेली आणि मिंग शेपटी हातात येऊन खाली पडला.

हातातली शेपटी घट्ट पकडून ठेवत मिंग उभा राहिला. त्याने कपडे झटकले. जे पाहिजे ते तर मिळाले... मिंग काळ्याकडे पहात म्हणतोय तोच पाठीमागे म्हातारी आजी येऊन उभी राहिली. केराचे टोपले तिच्या हातात होते. मिंग खाली कसा पडला हे तिने पाहिले असावे. ती मिंगला म्हणाली,'ना शी शेन मो? काय

आहे?

मिंगला सगळेच सांगावे लागले. खारीने गोंडेदार शेपूट दाखवावे लागले. पण ते ऐकून आजीने आंबट चेहरा केला. 'खार पकडली असतीस तर छानपैकी कालवण नसते का झाले? खा आता नेहमीचे बांबूचे कोंब!' ती मिंगला म्हणाली आणि रागारागाने चालू लागली.

आजी रागवून गेली खरी पण त्या दिवसापासून मिंग रोज नवे नवे कुंचले बनवू लागला. खारीच्या केसांचा त्याने बनवलेला कुंचला एकदम चांगला झाला. तो तर त्याने वडील वापरू लागले. मग प्रत्येक भावंडाला मिंगने एकेक कुंचला बनवून दिला. घोड्याचे, उंटाचे, डुकराचे, खारीचे... निरनिराळ्या प्राण्यांचे केस जमवून मिंग आता निरनिराळ्या आकाराचे कुंचले बनवू लागला. लोक त्याला 'कुंचलेवाला मिंग' असे म्हणू लागले. त्याची कीर्ती त्याच्या गावापलीकडे गेली. चित्रे काढायला, अक्षरे रेखाटायला लोक त्याचे कुंचले वापरू लागले. त्याच्या घरचे सर्वच जण त्याला कुंचले बनवण्यास मदत करू लागले. आता मिंगला चांगले पैसे मिळू लागले.

... अचानक एक दिवस एक नवी घटना घडली. राजदरबारी वजन असलेला एक सरदार आपल्या उंटाच्या गाडीतून मिंगच्या घरी आला. पिवळ्या रेशमी कपड्यात असलेला तो सरदार फार श्रीमंत दिसत होता. त्याच्या अंगावर अनेक सोन्या-मोत्यांचे अलंकार होते. लांब कल्लेदार मिशा... या सरदाराची मुलगी चित्रे काढण्यासाठी फार हपापलेली होती. पण चांगल्या कुंचला न मिळाल्याने तिची चित्रे वाईट दिसत. म्हणूनच मिंगचा कुंचल्याविषयीचा लौकिक ऐकून तो मिंगच्या दारी आला होता. त्याची एक अट होती. मिंगसारख्या गरीब माणसाला तो स्वतःची मुलगी द्यायला तयार होता. पण मिंगने असा कुंचला तयार करायला हवा की ज्या कुंचल्यामुळे सरदाराच्या मुलीला अप्रतिम चित्र काढता येईल.

मिंग विचारात पडला.

हे कसे शक्य आहे? अंगात कला नसेल तर सर्वांत चांगल्यातला चांगला कुंचला काय करू शकणार? पण अंगात थोडी फार कला असेल तर मात्र चांगला कुंचला चित्राला चांगले वळण निश्चित लावू शकेल. तरी पण मिंगने त्या सरदाराला आपण शंभर उत्तम कुंचले घेऊन येऊ असे सांगितले.

शंभर कुंचले घेऊन जाण्याचा दिवस उजाडला. खारीच्या केसांचे, उंटाच्या केसांचे, डुकराच्या केसांचे, फार काय अस्वलाच्या केसांचेही मिंगने कुंचले बनवले. एक कुंचला समजा निरुपयोगी ठरला तर दुसऱ्याने चित्र काढावे. दुसरा नको वाटला तर तिसऱ्याने. तिसरा...

... एका मोठ्या खोलीमध्ये सरदाराची मुलगी बसलेली होती. तिच्य पुढे कागदाचा मोठा फलक होता आणि समोर नारळाच्या वाळलेल्या वाटीत अनेक रंग होते. मिंगकडे न पाहता तिने शंभर कुंचले घेतले. कपाळावर आठ्या आणून जाड्या केसांचा कुंचला तिने खिडकीमधून फेकून दिला. मग दुसरा हातात घेतला. माना वेड्यावाकड्या करून तो फेकून दिला. तिसरा रंगात बुडवला आणि कागदावर एक डाग पडला म्हणून

तो टाकून दिला... असे करीत तिने पटापट अनेक कुंचले फेकून दिले. कागद डागाडागांनी असा गलिच्छ दिसायला लागला की जणू काही त्या कागदावर भुतांची सेना नाच करतेय असेच कुणालाही वाटावे.

मिंगला आपल्या मनातल्या विचारांचे हसू आले. काळ्या कुत्रा तर त्या कागदाकडे पाहून भोः भोः भोः करायला लागला... सरदार रागारागाने त्या काळ्या कुत्र्याकडे पाहू लागला. त्याचे डोळे काळ्याला खाऊ की गिळू करीत होते. कदाचित सरदार आपल्या काळ्याला पकडून त्याचे मांस शिजवायला देईल अशी मिंगला भीति वाटू लागली... तो हळूच बाहेर पडला. काळ्याला त्याने खूण केली...

मिंग खाली आला आणि खिन्नपणाने रस्त्याला लागला. वाड्याच्या पाठीमागच्या बाजूला तो वळला. सरदाराची मुलगी ज्या खोलीत खिडकीतून कुंचले फेकत होती त्या खिडकीखाली तो आला. तिथे एक, एक हात तुटलेला मुलगा खिडकीतून फेकलेले कुंचले उचलून ठेवीत होता. मिंगने त्याला विचारल,'हे कुंचले तू का गोळा करतो आहेस?'

'माझ्या बहिणीला हवेत ते. ती चित्रे काढते. पहायची आहेत तुम्हांला तिची चित्रे? चला माझ्याबरोबर.'

तो मुलगा, मिंग आणि काळ्या कुत्रा आता एका बांबूच्या झोपडीपाशी आले. आत त्या मुलाची बहीण कागदावर चित्रे काढत होती. मिंगच मनात ठसलेले ते झऱ्याचे चित्र त्या मुलीने काढलेले होते. काळ्या दगडांच्या एकावर एक पायऱ्यांसारख्या चढत गेलेल्या राशी आणि या राशीवरून खळखळाट करीत खाली येणारी शुभ्र, दुधाळ, फसफसती झऱ्याची जलधारा...

तिने काढलेले ते चित्र पाहून मिंगने तात्काळ ठरवले की या मुलीशी आपण लग्न करायचे आणि केवळ तिच्यासाठी जन्मभर नवे नवे, चांगल्यातले चांगले कुंचले तयार करीत रहायचे...

मिंगच्या मनातला विचार काळ्या कुत्र्याला पटलेला असावा. कारण तोही शेपटी हलवत त्या चित्राकडे, चित्रे काढणाऱ्या त्या गरीब बिचाऱ्या मुलीकडे सारखा पहात होता.

❑

चिनी माती

चिनी मातीची भांडी चीन देशात तांगशाहीत (तांग डायनेस्टी) म्हणजे इ. स. ६१८-९०७ या सुमाराला होऊ लागली. युरोपमध्ये १७०९ च्या सुमाराला जॉन ब्यूटगरने चिनी मातीची भांडी बनवायला सुरुवात केली. म्हणजे सुमारे १००० वर्षे केवळ चीनच जगाला चिनी मातीची भांडी पुरवत होता. आता मात्र या मातीच्या तंत्रातून सेरॅमिक्स, रिफ्रॅक्टरी मटेरीयल्स वगैरे शाखा सुरू झाल्या आहेत आणि इतर देशही या मातीची भांडी बनवू लागले आहेत.

चीनमध्ये केओलीग नावाच्या पर्वतावर जी पांढरी चिकण माती मिळते त्या मातीला 'केओलीग' म्हणजे चिनी माती असे म्हणतात. या मातीत फेलस्पार, ग्रानाईट दगडाची पूड मिसळून ती वस्त्रगाळ केली जाते. नंतर ती पाण्यात मळून तयार केलेल्या गिलाव्यापासून कुंभाराच्या चाकासारख्या यंत्रावर अनेक आकारांच्या वस्तू बनवतात. अशा वस्तू भट्टीमध्ये १००० से. तपमानात भाजून काढतात. भाजलेली ही भांडी कडक परंतु सच्छिद्र बनतात. नंतर या भांड्यांवर सुंदर नक्षी-चित्रे वगैरे काढतात. त्यासाठी निरनिराळ्या रंगांचा वापर करतात. रंग लावलेला किंवा वर्खाची रेघ मारलेली भांडी काचेने लुकण-लेप-लावल्यावर पुन्हा भट्टीतून भाजून काढतात. त्यामुळे ती कडक होतात. त्यांना चकाकी येते.

चिनी मातीच्या वस्तूंचा वापर स्वयंपाकघरात फार होतो. एक चमचा-सुरी सोडली तर युरोपमध्येही जेवणाच्या टेबलावरील सर्व वस्तू चिनी मातीच्या असतात. स्वच्छपणा, आकर्षकता यामुळे किटली, कपबश्यांपासून तो थाळ्या-वाडग्यापर्यंत याच मातीच्या वस्तू आजकाल दिसून येतात.

घरगुती उपयोगापेक्षाही चिनी मातीचा उपयोग औद्योगिक विश्वात फार मोठ्या प्रमाणात होतो. अतिदाबाची वीज कारखान्यात किंवा घरात आणली जाते ती चिनी मातीचे मंदवाहक (इन्स्युलेटर) वापरल्यामुळेच होय. अणुभट्टीत ऊर्जा निर्माण करताना किंवा लोहभट्टी बांधताना ज्या विटा वापरल्या जातात त्या विटा याच मातीपासून विशेष तंत्र वापरून बनवतात. रासायनिक कारखान्याच्या पाईपांना या मातीचे पोटीस (लाइनिंग) लावून तीव्र (कॉन्सेन्ट्रेटेड) रसायनाचे वहन केले जाते.

चिनी मातीचा उपयोग उत्खननशास्त्रात फार होतो. अवशेषांवरून जुन्या संस्कृतीचा मागोवा घेणे चिनी मातीमुळे सुलभ होते.

❑

माती करते मात मनावर

समोर गोबीचे प्रचंड वाळवंट पसरले होते. जिकडे पहावे तिकडे वाळू. वाळूच्या छोट्या छोट्या टेकड्या. निवडुंगासारखी खुरटी झुडपे आणि या झुडपांना ओरबाडून काढणारे भुरकट मळकट रंगाचे उंट. मधूनच वाळूचा एखादा फवारा उडे. एखादा रानपक्षी कर्कश आवाज काढत उडत जाई. सूर्य ढगांतून बाहेर पडलेला दिसे किंवा ढगात तरी लपून राही... गरम गरम वाऱ्याचे झोत वाहात रहात...

सूर्य ढगांतून बाहेर पडला की एक मुलगा टाळ्या पिटू लागे. सूर्य ढगात गेला की तो छोटा बसक्या नाकाचा मुलगा म्हणे, 'सूर्यदेव मडकी-गाडगी भाजतो आहे.'

आपल्याच नादात सूर्यदेवाचा खेळ पाहणाऱ्या त्या मुलाचे नाव होते टुंग. त्याचे वडील कुंभार होते. वाळवंटाच्या काठावर असलेल्या एका लहान खेडेगावात ते रहात असत. मडकी-गाडगी बनवायची, ती शेजारपाजारच्या खेडेगावात विकायची आणि आपले कुटुंब जगवायचे असा त्यांचा व्यवसाय होता. त्यांना पाच मुले होती. टुंग हा सर्वांत लहान मुलगा. वाळवंटाच्या सरहद्दीवरील गाव त्यांनी निवडले होते त्याला कारण होते. वाळवंटामुळे येथील जागांचे दर स्वस्त होते. विहीर खोदून मिळाली होती. उष्ण हवामानामुळे मडकी-गाडगी वाळायला फार वेळ लागत नसे. त्यामुळे टुंगचे वडील या जागेला चिकटून राहिले होते. ते, टुंगची आई, टुंगची आजी-आजोबा सर्वच जण सुखासमाधानाने रहात होते.

मुले माती आणून देत. विहिरीवरच्या रहाट-गाडग्यावर उभे राहून पाणी काढीत. बांबूच्या पन्हेळीमधून ते पाणी मातीच्या ढिगाऱ्यात सोडत. आई माती कालवत राही. आजी घरातल्या स्वयंपाकाचे पहात राही. डुगडुगत्या मानेचे आजोबा मडकी भाजण्याचे काम पहात असत. टुंगचे बाबा एका मोठ्या चाकावर मातीच्या गिलाव्याचे मडके तयार करीत. एक झाले की दुसरे, दुसरे झाले की तिसरे...

त्यांच्या झोपडीच्या मागे फुटक्या-तुटक्या मडक्यांचा खच पडलेला होता. काही तुकडे चंद्रकोरीच्या आकाराचे, तर काही दुधी भोपळ्यासारखे. काही पूर्ण फुटलेले, तर काही डांगरभोपळ्या सारखे अर्धे फुटलेले, काही काळसर, काही काळसर-जांभळे. या फुटलेल्या तुकड्यातुकड्यांतून हिंडत राहणे टुंगला आवडत असे. काठीने फुटलेल्या मडक्याला ढोसकायचे आणि हसायचे. कंटाळा आला की घराच्या कुंपणाजवळ जाऊन सूर्यदेव काय करतोय हे पहात रहायचे. आजोबांनी स्वतः तयार करून दिलेल्या जाड कापडाच्या सपाता पायात असत. डोक्यावर आजोबांनी तयार करून दिलेली टोपी असे.

एक दिवस टुंगने या मडक्यांच्या राशीत एक मजेशीर गोष्ट पाहिली. एका अर्धवट फुटलेल्या मडक्यात त्याला चार मांजरीची पिल्ले दिसली. तीन पांढरी स्वच्छ आणि एक कुळकुळीत काळे. त्या पिल्लांची आई म्यॉव म्यॉव करीत तिथे आली. तेव्हा टुंग खाली बसून पिल्लांची गंमत पहात होता. ती पिल्ले फार सुरेख दिसत होती. मऊ लुसलुशीत, स्वच्छ. आपली मडकी या पिल्लासारखी सुरेख स्वच्छ आणि आटोपशीर झाली

तर... टुंगच्या मनात विचार आला. टुंगचे वडील जी मडकी बनवीत ती काळी होती.

विचार आल्याबरोबर तो धावत पळत आपल्या सर्वांत मोठ्या भावाला, दादाला सांगायला गेला. काळया मातीऐवजी पांढरी स्वच्छ माती वापरली तर मडकी-गाडगी मांजरच्या पिलासारखी स्वच्छ आणि सुरेख होतील, असे तो त्याला म्हणाला.

त्याचे चारी भाऊ रहाट-गाडगे फिरवता फिरवता हसू लागले. मग त्याचा दादा म्हणाला, 'अरे टुंग, पांढऱ्या मातीचा पर्वत आहे फार दूर. त्याचे नाव आहे केओलींग पर्वत. त्यावर जायचे म्हणजे सोपे काम नाही. तू आपला तुझी चड्डी सावरून सूर्यदेव मडकी भाजतोय ते पहायला जा पाहू.'

टुंग खजील झाला. पण आता पांढऱ्या मातीच्या पर्वताचे नाव कळले होते. टुंग आता आजोबांकडे गेला. ते मडकी भाजायची भट्टी तयार करीत होते. 'पांढऱ्या मातीच्या पर्वतावर आपण केव्हा जायचे?' त्याने आजोबांना विचारले. तरातरा काम सोडून आजोबा आजीकडे आले आणि तिला म्हणाले, 'अग हे बघ, हा टुंग म्हणतोय हे घर सोडून नवे घर बांधायचे. काही तरी खूळ याच्या डोक्यात शिरलेय. ताय पर्वतावरचा दगड याच्या गळयात बांधायला हवा. त्याशिवाय याची बाधा जाणार नाही... ताय पर्वतावरचा दगड पवित्र असतो...'

आजोबांचे ते शब्द ऐकून भाजी चिरता चिरता आजी एकदम थांबली, झटकन् उठून तिने टुंगला जवळ घेतले आणि ,'टायेन, टायेन'-('हे आकाशा, आकाशा') असे म्हटले. आकाशाला तिने नमस्कार केला आणि म्हटले,'देवा, माझ्या टुंगला पाच ड्रॅगनची शक्ती दे,' असे म्हणून तिने टुंगला पोटाशी ओढून धरले.

टुंगच्या डोक्यातला पांढरा पर्वत अजून काही जात नव्हता. पिल्ले मोठी होत होती. काळे पिल्लूसुद्धा आता सुंदर दिसू लागले होते. पण पांढरी पिल्ले फारच सुंदर दिसत होती. आणि पिल्लाकडे पाहता पाहता टुंगला मडकी-गाडगी अशी सुंदर, मऊ, नाजूक तयार व्हायला हवीत असे वाटत होते. गाव बदलून पांढऱ्या मातीच्या पर्वतावर जाण्याच्या टुंगच्या शब्दाने आजी मनातून फार घाबरी झाली होती. हा विचार अशुभ होता. देव लहानांच्या तोंडून पुढच्या गोष्टी सुचवतो असे तिला वाटत असल्यामुळे टुंगला पोटाशी ओढून ती प्रार्थना करीत राही. टुंगला पांढऱ्या पर्वतावर जाण्याची कल्पना पांढऱ्या मांजरामुळे-त्या पिल्लामुळे आली, म्हणून तिने ती पिल्ले एकदा विकावयास पाठवणाऱ्या मडक्यांच्या ढिगाऱ्यात घालून पाठवून दिली. काळे पिल्लू मात्र घरी ठेवले. टुंगला खेळायला.

पिल्ले गेली म्हणून टुंग फार दुःखी झाला. पण त्याच्या डोक्यातून तो पांढरा पर्वत काही जाईना. मडकी-गाडगी या पांढऱ्या पिल्लांसारखी दिसायला हवीत असे तो आता सतत बोलू लागला. तसा तोही मोठा झाला होता. काळे पिल्लूच मुळी मोठ्या वांग्यासारखे दिसायला लागले होते. ते खेळता खेळता टुंगला हुलकावणी देई आणि काळया मडक्यांमध्ये लपून राही. त्यामुळे टुंगला मडकी-गाडगी पांढरी पांढरी शुभ्र असावीत असे फार फार वाटत राही. तो भयंकर अस्वस्थ होई. पण तो आता मोठा झाला होता. म्हणून त्याला

काळ्या मातीत काम करावेच लागे. लाल मडकी बनवायला लाल माती आणणार कुठून? पिवळी चिकण माती आणावी तर ती फक्त नदीकाठावर मिळत असे आणि टुंग म्हणतो ती पांढरी माती आणावी तर केओलीग पर्वतावर जायला हवे. त्यामुळे टुंगचे वडील रेताड काळ्या मातीतच काम करीत रहात. त्यातच समाधान मानीत.

एक दिवस एक विचित्र गोष्ट घडली. टुंगची आजी स्वयंपाक करीत होती. तिने जेवण तयार केले, चहा उकळवला आणि टुंगला हाक मारली. टुंग आला की त्याच्या पाठोपाठ इतर जण जेवायला येणार हे ठरलेले असे. नेहमीप्रमाणे टुंग उड्या मारत आला आणि त्याने आजीला चार टोळ आणून दिले. ते टोळ पाहून आजीला आनंद झाला. बोटभर लांबीचे आणि लाकडाच्या रंगाचे ते टोळ तिने भरकन एका गाडग्यात ठेवले. त्यात मीठ घातले. रात्री कालवण करण्याचा बेत केला. तेवढ्यात टुंगचे इतर भाऊ जेवायला आले. प्रत्येकाच्या हाताता तीन तीन, चार चार टोळ होते. टुंगचे वडील आणि आजोबा आले तेही चार पाच टोळ घेऊन आले आणि आई आली तिच्या हातात तर नऊ टोळ होते... टोळांची जुडीच तिने बांधून आणली. एकेकाला एक!

... ते पाहून आजी घाबरून गेली. तिने आजोबांच्या कानात काही तरी सांगितले. तरतरा ते अंगणातल्या कुंपणाजवळ गेले. त्यांच्या पाठोपाठ वडील गेले. आई गेली. मोठे भाऊ जाऊन उभे राहिले. जो तो डोळ्यांवर हात ठेवून दूर दूर वाळवंटाच्या दिशेने पहात होता. एकमेकाला काही तरी सांगत होता. टुंगला कळेना हे असे काय आहे. हे सर्व काय पाहतायत. आजी, आई कावरीबावरी का झालेय ? तोही समोर पाहू लागला... समोर गोबीचे प्रचंड वाळवंट पसरले होते. जिकडे पहावे तिकडे वाळू! वर आकाशात सूर्य दिसत नव्हता. सगळीकडे मलूल सूर्यप्रकाश पसरलेला होता आणि दूरवरून एक प्रचंड काळा पर्वतप्राय ढग हलके हलके सरकत सरकत, तरंगत तरंगत त्यांच्या घराच्या दिशेने येत होता... आजी आणि आजोबा त्या ढगाकडे पाहात आकाशाची प्रार्थना करीत होते... त्यांचे थरथरणारे हात अधिकच थरथरत होते... आवाज अस्पष्ट उमटत होते आणि आई तर कशीबशी एका खांबाला टेकून उभी राहिली होती... वडील प्रार्थना म्हणत होते, 'हे दिशांच्या देवा, आकाश, पाणी आणि झाडाच्या देवा, या टोळधाडीपासून आमचे रक्षण कर. हे पर्जन्यदेवा, तुझ्या अंगात शंभर ड्रॅगनची शक्ती येवो.'

सकाळी सकाळी टुंगला काय झाले ते कळले. एक मोठी टोळधाड त्यांच्या गावावर आली होती. जिकडे तिकडे टोळ दिसू लागले. झाडाझाडांवर, शेतावर, वईच्या बांधावर, मोटेवर, खोडांवर, पानापानांवर, भाजीपाल्यांवर टोळच टोळ! ते टोळ झाडाची पाने कुरतडत होते. पाने जाळीदार होत होती. फांद्यांचे दांडोरे दिसायला लागले. मळे ओस पडले. विहिरीच्या पाण्यातही माशांसारखे टोळ दिसायला लागले. मडक्यात, गाडग्यात पहावे तिथे टोळ. एखाद्या खांबावर हात ठेवावा तर बोटांनी टोळ चिरडला जाई. पाय टाकावा तर टोळ फरफटला जाई. कपड्यात टोळ, घरातल्या कोनाड्यात टोळ, गादीवर टोळ... काळी मनीमांजर प्रथम प्रथम टोळ पकडत होती, पण पुढे तीही म्यॉव म्यॉव असा आवाज काढून इथून तिथे, तिथून

इथे हिंडत राहिली...

गाव सोडून गावकरी निघून जाऊ लागले. सर्वच गाव खाली झाला. उंटांच्या गाड्यांवर गाड्या भरून जात होत्या. जो तो गाव सोडत होता. टुंगच्या वडिलांनीही गाडी भरली आणि ते निघाले. टुंगने काळी मांजर बखोटीला मारली आणि तोही निघाला... इतर जण फार फार दुःखी झालेले होते. कुणीच कुणाशी बोलत नव्हते... बिचारा टुंग आपण केओलींग पर्वतावर जातोय का? हे त्याला कुणीच सांगत नव्हते. जो तो रडत होता.

... आता टुंग खरोखरच त्याच्या मनातल्या केओलींग पर्वतावर आला होता. तो बराच मोठा झाला होता. या मोठ्या प्रवासात त्याचे आजोबा, आई-वडील आणि सर्व भाऊ उपासमारीने मरण पावले होते. ज्याने त्याने आपला वाटा छोट्या टुंगला दिला. म्हातारी आजी तर हवेवर जगत होती म्हणून ती वाचली. टुंग, म्हातारी आजी आणि काळे मांजर तेवढे या जगात राहिले.

एका नदीच्या काठावर टुंगने झोपडे बांधले. समोर केओलींग पर्वत पसरलेला. पांढऱ्या मातीचे ढिगारे. टुंगने आपल्या वडिलांसारखेच कुंभारकाम करायला सुरूवात केली. टुंगचे वडील काळी मडकी-गाडगी करीत. वाळवंटाच्या काळ्या रेतीमुळे ती अधिकच काळी होत. कडक उन्हाळ्यामुळे मडकी झपाझप वाळत. पण आता या पर्वत पायथ्याशी फार पाऊस पडे. त्यामुळे मडकी वाळायला दमट हवेमुळे वेळ लागे. टुंगला आता त्याच्या वडिलांची आठवण येऊ लागली. त्यांचे कामाचे कसब आपल्या हाती यावे म्हणून तो प्रार्थना करू लागला.

पण टुंग काही लेचापेचा मुलगा नव्हता. कष्टाळूपणाने तो दिवसभर काम करी. पांढरी मडकी बनवी. या मडक्यांवर चित्रे काढी. मडकी काळ्या मडक्यांहून सुंदर आणि टणक दिसत. पण टुंगचे समाधान होत नव्हते. पांढरी मडकी अधिक सुरेख कशी होतील, भट्टी धगधगीत कशी ठेवता येईल यावर तो रात्री विचार करीत राही. खरे म्हणजे तो दिवसभर काम करून फार थकलेला असे. म्हातारी आजी आता पूर्ण थकली होती. ती कंमरेत वाकली होती. डोळ्यांनी तिला दिसत नसे. कानांनी ऐकू येत नसे. टुंग स्वतः जेवण करीत असे. मोठ्या चाकावर मडकी-भांडी करीत असे आणि ही पांढरी भांडी अधिक गुळगुळीत कशी होतील याचाही विचार करीत असे.

एकदा टुंग काम करीत असताना त्याच्या घरात एक तार्तार मुलगी शिरली. ती धापा टाकत होती. घाबरीघुबरी झाली होती. काम करता करता टुंग उठला. त्याला ही मुलगी एकदम आवडली. 'मी तुझे जेवण करीन. तुला मदत करीन,' असे ती म्हणाली तेव्हा तर त्याला ती एकदम पसंत पडली. त्याने तिला ओढतच आत नेले... म्हाताऱ्या आजीला एक सवय होती. ती तिच्यासाठी आणून ठेवलेल्या शवपेटीत बसून रहात असे. टुंगने ही आपल्या आजीची सवय त्या तार्तार मुलीला समजावून दिली. ती मुलगी सुद्धा टुंग, त्याची आजी आणि काळी मांजर यात रमून गेली.

तार्तार मुलीने टुंगला मडकी-गाडगी चकचकीत कशी करायची हे शिकविले. ती मुलगी क्रूर

टोळीवाल्या तार्तार लोकांपैकी होती. तिने रंगीत दगडांवर चकाकी कशी आणतात हे पाहिले होते. जे तिने तिथे टोळीत पाहिले ते तिने आता भांड्यावरती चकाकी आणण्यासाठी अवलंबले. एकदा काळी मनी एका भांड्याला अंग घासत होती. टुंग आणि ती मुलगी हे पहात होते. काळी मांजरी जसजशी पांढऱ्या मडक्यावर अंग घासत होती तसतसे मडक्याचा घासलेला भाग, त्या भागावर मुलीने चितारलेली नक्षी लख्ख, चकचकीत आणि एकदम उठून दिसेल अशी होत होती. ते पाहून टुंगने उडीच मारली. आता टुंगच्या लक्षात आले. मडकी भाजून झाली की काचेचे आवरण देण्यापूर्वी एकदा ती मडकी घासून पुसून काढायची. चांगली गुळगुळीत बनवायची. मग त्यावर चित्रे रेखाटायची. आणि पुन्हा काचेचे आवरण झाले की पुन्हा घासून पुसून काढायची. काय सुंदर चकचकीत, लखलखीत एकेक भांडे दिसत होते आता.

शेजारी-पाजारी टुंगची भांडी पहायला येत. तेव्हा टुंग काम थांबवत असे न जाणो हे आपले काम पाहतील आणि आपल्या प्रमाणे मडकी-गाडगी बनवायला लागतील. लोक भांड्यांचे सौंदर्य पहात रहात. पांढऱ्या भांड्यांना अंग घासणारी काळी मांजर पहात. एकेके भांडे असे सुंदर दिसे. टुंग किती तरी वेगवेगळी भांडी बनवत होता. खुजा, गडवा, थाळी, माठ, सुरई, हंडा, परात, ताट, बघोणे, किटली, रांजण, बशी एकेक भांडे बावनकशी...

टुंग श्रीमंत होत होता. त्याला पुष्कळ पैसा मिळू लागला. एकदा एका टोळीने त्याच्या घरावर धाड घातली. टोळीचा नायक त्याच्या साथीदारासह टुंगच्या खोलीत शिरला. त्याच्या साथीदाराजवळ मोठमोठ्या लाठ्या-काठ्या होत्या. कुऱ्हाडी होत्या. टुंग आणि ती तार्तार मुलगी घाबरून एका कोपऱ्यात उभी राहिली. टोळीचा नायक टुंगची चकचकीत पांढरी भांडी पहात होता. समोर असलेला एक गडवा त्याने काठीने उचलला आणि दूर भिरकावून दिला. गडवा गवतावर धप्पकन पडला. एका साथीदाराने तो गडवा परत आणून दिला. त्याचा एक कपचा निघाला नव्हता की त्याला एक तडा गेला नव्हता. त्याच्यावरचे गुलाबाचे चित्र तसेच सुंदर दिसत होते. नायकाने रागारागाने तो गडवा हंड्यावर हंडे ठेवलेल्या एका उभ्या माळेवर फेकला. हंड्याची माळ खाली पडली. पण एकही हंडा फुटला नाही. टोळीचा नायक साथीदाराकडे पाहू लागला. तेही कावरेबावरे झाले. ती संधी साधून आणि चोर आता घाबरले आहेत हे पाहून तार्तार मुलीने काळीला हातात घेतले आणि हळूच आजी ज्या शवपेटीत बसली होती त्या पेटीत सोडले. काळी मनी आजीच्या अंगाशी अंग घासू लागली आणि आजीसुद्धा नेहमीप्रमाणे तिचे अंग लाडाने कुरवाळू लागली...

ते विचित्र दृश्य पाहून सर्वच जण घाबरले. मातीचे भांडे फेकले तरी फुटत नाही, पडले तरी तडकत नाही. म्हाताऱ्या आजीचा पुतळा हलतो काय आणि चेटकिणीकडे असणारी काळी मांजर त्या चेटकिणीला चिकटते काय, त्या सर्वांना ती एक भुताटकीच वाटली. जो तो आता पळत सुटला. एकमेकाच्या पायात पाय अडकून धप्पकन खाली पडत आणि पडल्यावर कसेबसे उठून 'भूत भूत' करीत ते सर्व धावत सुटले...

टुंग आणि ती तार्तार मुलगी एकमेकांचा हात हातात घेऊन हसत होते. समोरच्या बशीला अंग घासता घासता काळी मनीसुद्धा दचकून त्यांच्याकडे पाहू लागली. पण टुंग आणि ती मुलगी हसण्याचे थांबवत नव्हती. मग मात्र मनीने रागारागाने बशीवर रंगवलेल्या काळ्या उंदराला तोंड लावले. खरा उंदीर समजून ती त्या उंदराच्या चित्राला पंजा मारू लागली.

आता तर टुंग आणि तार्तार मुलगी पोट धरून धरून हसू लागले. ते हसू त्यांना आवरता येत नव्हते.

❑

फटाके

फटाक्यांची दारू हा चीनने लावलेला शोध होय. इ. स. च्या १२/१३ व्या शतकात चीनने फटाके बनवले. या फटाक्यांतून पुढे अग्निबाणही तयार करण्यात आले. परंतु या दोन्हींचा उपयोग त्या काळी चीनने भुतेखेते पळवण्यासाठी किंवा एक गंमत म्हणूनच केला. क्वचित कधी शत्रूला घाबरवून टाकण्यासाठी त्याचा उपयोग झाला असेलही. परंतु त्यातून शस्त्रास्त्रांची निर्मिती त्या काळी तरी चीनने केली नाही. चिनी लोक आपल्यासारखेच देवभोळे आणि अंधश्रद्धाळू आहेत हे त्याचे कारण असावे.

फटाक्यांच्या दारूत प्रामुख्याने कोळशाची भुकटी, गंधक आणि सोरा नावाचा क्षार टाकला जातो. फटाक्यात हे मिश्रण फार ठासून बसवतात. सोरा तापला की त्यातून मुबलक प्रमाणात प्राणवायू (ऑक्सिजन) अतिवेगाने बाहेर पडतो. गंधक आणि कोळसा यांना पेट घेण्यासाठी प्राणवायू फार लागतो, तो असा मिळतो आणि ठासून भरलेल्या मिश्रणाचा भडका स्फोट घडवतो. स्फोटाबरोबर प्रकाशाचा लोळही दिसावा म्हणून या दारूत इतर अनेक द्रव्ये घालतात. चकचकीत प्रकाशासाठी मॅग्नेशियम धातू घालतात, तर ठिणग्यांची फुले बाहेर यावीत म्हणून बिडाचा-लोखंडाचा कीस टाकतात. दारूकामाला शोभा यावी म्हणून रंगासाठी अनेक धातूंचा उपयोग केला जातो उदा. तांब्यापासून हिरवा, निळा, कॅल्शियमपासून गुलाबी, बेरियमपासून हिरवा गडद...

काल-परवार्पंत चीन देशच फटाके बनवत होता. आता इतर देशांनीही या कलेत प्रगती केली आहे. आपणसुद्धा फटाके निर्मितीत स्वयंपूर्ण झालो आहोत.

या साध्या, क्षुल्लक शोधामधून विज्ञानाच्या दोन शाखा मात्र फार फोफावल्या आहेत. त्यापैकी एक शाखा ही स्फोटकांची एक्सप्लोझीव्हस्‌ची व दुसरी रॉकेट विज्ञानाची. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ नोबेल याने पहिली शाखा समृद्ध केली. डायनामाईट, गेलीगनाईट वगैरे स्फोटके त्याने तयार केली. या स्फोटकांमुळे बोगदे, विहिरी खोदणे, खाणी खणणे जसे शक्य झाले तसे युद्धासाठी अनेक संहारक स्फोटकेही तयार झाली. अग्निबाणशास्त्रामुळे मानवाला चंद्रावर जाता आले. अवकाश पाहता आले. परंतु आज या दोन शाखांच्या एकत्रीकरणातून इंटरकॉन्टीनेटल बॅलिस्टिक मिसाईल (आय्. सी. बी. एम्.) सारखी संहारक अस्त्रे बनवली जात आहेत. एका खंडातून ती सोडून क्षणार्धात दुसऱ्या खंडावरचा शत्रूदेश निपटून काढण्याचे मनसुबे रचले जात आहेत. ❑

फटाके ! फटाके !!

चीनमधल्या अवाढव्य आणि भयानक समजल्या जाणाऱ्या यांगत्सी नदीची ती एक उपनदी होती. उपनदी असली तरी तिचे पात्र कमालीचे मोठे होते. त्यामुळे ती नदी म्हणजे एक सरोवर आहे असे वाटे. दोन्ही काठांवर छोटी छोटी गावे आणि मधल्या प्रवाहावर असंख्य होड्या. पाहणाऱ्याला फक्त होड्या आणि होड्याच दिसत. ह्या होड्यांमध्ये काही लोक घरे करून राहत होते. त्यांची मुले होड्यांवर खेळत. बापे लोक एका होडीतून दुसरीकडे जाण्यासाठी दुसऱ्या होडीवर पाय देत. पाय आवळून बांधलेल्या तरुण मुली सहसा ये-जा करीत नसत. त्या होडीवरच्या घरातच रहात. असे होडीवरच त्यांचे जीवन जात असे. एरव्ही काळपट-तपकिरी होड्या नदीच्या पाण्यावर खालीवर हलत डुलत रहात. त्यांची पाण्यात पडलेली शेवाळी प्रतिबिंबे पाण्यात थरकापत-फुटत-डुचमळत-लांबट लांबट होत रहात... सूर्य उगवून मावळून जाई. चंद्र वर येऊन पलीकडे निघून जाई... असे हे नेहमीच होत राही. रोज रोज होत राही.

तेच तेच नेहमीचे जीवन चालत असले तरी छोट्या सुंगला या जीवनाचा कंटाळा येत नसे. कारण बहुतेक वेळा तो एकटाच होडीच्या टोकाशी, सुकाणूजवळ किंवा एखाद्या दोराला धरून हलणाऱ्या डुचमळणाऱ्या प्रतिबिंबाची मजा पहात राही. तो घुम्या स्वभावाचा म्हणजे अबोल होता. खरे म्हणजे तो कवीवृत्तीचा होता. आज तर त्याचे लक्ष आकाशाकडे लागले होते. आकाश पतंगांनी भरलेले होते. निरनिराळ्या रंगांचे, आकारांचे अनेक पतंग खालीवर झोके घेत उडत होते. काही वाऱ्याच्या गार झोतासरशी घरंगळत होते. पुन्हा सरसरून उडत होते. प्रत्येक होडीवर पोराटोरांची गर्दी पतंगांची गंमत पहात होती. प्रत्येकजण पतंग उडवत होता. आकाशातले ते रंगीत पतंग इतके सुंदर दिसत होते की त्यांच्यामुळे या पतंगांच्या पाठीमागचे संध्याकाळचे ढगाळ आकाशसुद्धा कसेसेच दिसत होते. रंगीबेरंगी, किंचित करड्या, गुलाबी-किरमिजी-शेंदरी नि जांभळट रंगाचे ढग आता सूर्य मावळल्याबरोबर एकदम भेसूर दिसायला लागले-थडग्यासारखे !

... सुंग त्या भेसूर दृश्याने कावराबावरा झाला. पलीकडच्या होडीतले एक रांगणारे छोटे मूल रांगता रांगता कडेवर आले आणि झोकांडी जाऊन पाण्यात पडले. त्याच्या पाठीशी डबडे बांधलेले होते. त्यामुळे नाकातोंडात पाणी जाऊन ते मूल घाबरले खरे; पण लगेच पाण्यात हात आपटत खेळायला लागले. समोरून येणाऱ्या एका इसमाने त्या मुलाला उडी मारून बाहेर काढले. सुंग डोळे ताणून हे सर्व पहात होता. तोच त्याची बहीण बाहेर आली आणि म्हणाली,'सुंग, अरे असा आकाशाकडे काय पहात राहिला आहेस? दिव्याला नमस्कार करायला ये. आज दिव्याचा सण आहे. पण तू तर कवी. अचाट कल्पना लढवणारा. पतंग उडवणार नाहीस, मासे मारणार नाहीस, काम-धंदा-अभ्यास तेही तुला नको. नुसते ढग पहायचेत. फुले पहायचीत. फटाके तरी फोड!'

फटाक्यांचे नाव ऐकल्यावर एखाद्या लहान मुलाने उडी मारली असती. पण सुंगला ते फटाकेही नकोसे वाटत. काय त्यांचे ते भयानक आवाज. ठा धडाड धृ SS म फडाड् फट् SS छया! प्रत्येक सणाला फटाके फोडले जात. सुंग कानावर हात ठेवून फटाके वाजवणाऱ्या मुलांकडे पहात राही. कोणी ही नसती पीडा शोधून काढली हे त्याला कळले नव्हते. हल्लीहल्लीच त्यांचा शोध कुणीतरी लावला असे त्याला कुणी तरी म्हणाले होते.

'हा काय शोध आहे?' सुंग स्वतःशीच म्हणाला.' या फटाक्याच्या दारूपासून एखादे झाड तयार करता यायला हवे...' तो काही तरी आठवू लागला... मागे एकदा तो त्याच्या काकांबरोबर 'पो यांग' सरोवरात सफरीला गेला होता. त्याचा काका लोहारकाम करीत असे. त्या काकाचे घर होते एका खेडेगावात. सुंग त्याच्याकडे जायला आणि त्या काकाला मोठे काम मिळायला एक गाठ पडली. म्हणून काकाने सुंगला प्रवासात बरोबर घेतले. 'पो यांग' सरोवराच्या काठावर सुंगने पिवळ्या फुलांनी बहरलेली अनेक झाडे पाहिली. काय अप्रतिम ती झाडे दिसत होती. हिरव्या पानांच्या गर्द रंगांत नक्षत्रांचा सडा पडलेला! तिथल्या तिथे सुंगने कवितेची एक ओळ रचली-'झाड बहरले नक्षत्रांनी!' पण सुंगची पहिली ओळ तयार होते न होते तोच काही लाकूडतोडे कुऱ्हाडी, फरश्या घेऊन तेथे आले आणि त्या झाडांना तोडू-पाडू लागले. काकानेही त्या क्रूर पहाडी लोकांना पाहून सुंगला पळवतच बाहेर काढले. फार क्रूर लोक होते ते

सुंग मनातल्या मनात आपले फटाक्याचे स्वप्न रंगवतोय तोच त्याचे वडील एका खांद्यावर भले मोठे मासे पकडायचे जाळे घेऊन आले. त्यांच्या पाठोपाठ सुंगचे सात भाऊही आले. ते सर्व जण वडिलांना मासे पकडायला मदत करीत असत. आपल्या होडीत पाय टाकताच वडिलांनी जाळ्यात ठेवलेली एक टोपली उलटी केली. या टोपलीत कालवे होती, मासे होते, झिंगे होते आणि एक कासवही होते. कासव पाहताच सुंगची बहीण टाळ्या पिटायला लागली. आज दिव्याचा सण होता म्हणून जेवणाचा बेतही आता नामी होणार होता. कासवाचे कालवण...सुंगच्या इतर भावंडांच्या तोंडांना पाणी सुटले.

अजूनही सुंग आपल्याच विचारात गर्क होता. तो कविवृत्तीचा असला तरी नेहमी स्वप्नातच रंगून जाणारा नव्हता. फटाक्यांची दारू कशी बनवतात? हे त्याने आता ओळखले होते. कोळसा, गंधक आणि सोरा नावाच्या धातूपासून ही दारू तयार करतात आणि ठासून भरतात एवढे ज्ञान त्याला झाले होते. सोऱ्याचे दगड कुठे मिळतात? गंधकाची माती कुठे सापडते? वगैरे प्रश्न त्याने सोडवून ठेवले होते. या मिश्रणावर त्याने अनेक प्रयोगही केले होते. याच मिश्रणाच्या दारूतून आज ना उद्या आपण 'पो यांग' सरोवराच्या अप्रतिम झाडांसारखे झाड तयार करू असे त्याला वाटत होते. पण झाडाची पिवळी फुले कशी आणायची? फटाका वाजताना आवाज होतो आणि पिवळा जाळ बाहेर येतो. पण पिवळी फुले बाहेर आणणे तसे कठीणच होते. फटाक्याची दारू एकत्र करून ती भुकटी तो पेटवत राही. त्यात रंगीत फुले टाकी. रंगीबेरंगी दगडांची भुकटी टाकी. पण जाळ तो जाळच राही.

एकदा सुंगच्या काकाने त्याला पालापाचोळा जाळताना पाहिले. आणि सुंगचे ते उद्योग पाहून तो तडक त्याला घेऊन त्याच्या गावी गेला. चार दिवस रहायला म्हणून त्याने नेले, सुंगवर त्याचा जीव होता. सुंग घरी येऊन गेला की त्याच्या धंद्याला फार मोठी किंमत येत असे असे आपले त्याला वाटे. सुंग काकाकडे आला आणि काकाला शंभर तलवारींना धार लावून देण्याचे काम मिळाले. हे राजाचे काम होते. राजाच्या एका सरदाराने ते सुंगच्या काकाला दिले होते. काका त्याच्या छोट्या भट्टीवर तलवारींना पाणी देऊ लागला, धार लावू लागला.

... चमकून सुंग पाहू लागला. भट्टीच्या जाळामधून इवल्या इवल्या ठिणग्या काजव्यांसारख्या उडत होत्या. त्याने काकाला विचारले,'काका, हे काजवं कसे बाहेर येतात?'

काकाने कोपऱ्यात गोळा केलेला, तलवारींना धार लावताना जमवलेला बिडाचा-लोखंडाचा कीस मुठीत घेतला आणि भक्कन जाळात उडवला. त्याबरोबर भट्टीतून काजवे बाहेर उडाले. सुंगला आता कमालीचा आनंद झाला. आपल्या मनातले झाड आता फटाक्यांच्या दारूतून आकार घेऊ लागेल असे त्याला वाटू लागले. काकाकडून निघताना पडशीभर लोखंडाचा कीस घेऊनच तो निघाला आणि ती जड थैली एकदा पाठीवर उचलत तर एकदा या खांद्यावर-त्या खांद्यावर करीत तो होडीवर आला.

... होडीच्या घरात तो आला आणि त्याला जाणवले की होडीच्या शहरावरचे सर्वच लोक कावरेबावरे झालेले आहेत. भयभीत झाले आहेत. काही म्हातारे शेजारच्या किनाऱ्यावरच्या गावावरून लिंबू ओवाळून टाकतायत. काही तरुण काठ्या, दगड गोळा करतायत. तर काही होडीवाले होड्यांचे नांगर वर उचलून आणि बांधलेल्या दोऱ्या सोडून आपापल्या नावा दूर प्रवाहाच्या मध्यावर नेऊन ठेवतायत. नदीच्या मध्यावर प्रवाहाला फार जोर होता, म्हणून होडीवाल्यांची निराशा होत होती. किनाऱ्यावरच्या गावातून आता होडीवाल्यांकडे दगड येऊ लागले... होडीवाल्यांच्या घरांवर, होडीवरच्या माणसांवर दगडफेक होत होती. जो तो डोक्यावर हात ठेवून समोर पहात होता. किनाऱ्यावरच्या गावाचे आणि होडीवाल्यांचे भांडण नेहमीच होत असे. भांडण झाले की होडीवाल्यांना मार सहन करावा लागे. कारण किनाऱ्यापासून त्यांना फार दूर पळता येत नसे आणि दगडफेक करायला त्यांना दगड मिळत नसत. त्यांच्या हाताला लागत फक्त मासे. ते काय फेकायचे गावकऱ्यांवर? आणि फेकले तर ते त्यांना खायला होणार! शत्रूच्या तोंडात साखर काय घालायची!

'ए सुंग, तू काही तरी तोड काढ या गावकऱ्यांची खाशी फजिती होईल अशी'-कुणी तरी शेजारचा होडीवाला सुंगला म्हणाला. या होडीवाल्याला एक माहीत होते की तोड काढेल तर ती सुंगच काढेल. तोच एकटा काय तो प्राचीन काळचा युद्धशास्त्रनिपुण 'सुनत्सु' होऊ शकेल.

... तेवढ्यात सुंगच्या डोक्यात एक अचाट कल्पना फटाक्यासारखीच सरसरत पेटून आली. तो उठला. त्याने एका बांबूचे बासरीएवढे तुकडे केले. हे छोटे छोटे दंडुके त्याने एका टोकाला बंद करून टाकले. मग या बांबूमध्ये फटाके टाकले. ते पेटवायला एकेक भोक पाडले आणि मोकळ्या टोकाकडून छोट्या दगडावर

कपडा-कागद गुंडाळलेले बोळे अलगद बसवले. रात्री काळोख झाल्यावर भोकातून आग लावून त्याने फटाके पेटवले. पेटलेल्या फटाक्यांच्या स्फोटाने कापड-कागदाने गोळे टुणकन उडून पलीकडच्या गावावर जाऊन अचानक कोसळू लागले. नदीवरच्या भणभणा वाहणाऱ्या वाऱ्याने ते बोळे अक्राळ विक्राळ पेटत पेटत जाऊ लागले...

... झोपी गेलेल्या बिचाऱ्या गावकऱ्यांना कळेना, ही काय दैवी आपत्ती आली! बोळे घरांवर पडले. घरे पेटली. बोळे गवताच्या गंजीवर पडले. गवताने पेट घेतला. दावण्या तोडून गुरेढोरे पळत सुटली. बोळे साठवलेल्या कणग्यांवर, धान्यांच्या कोठारांवर पडले. सगळीकडे आग लागली. पोरे-बायका, म्हातारे-कोतारे पळत सुटले. घरे-झोपड्या-कोबड्यांची खुराडी, जनावरांचे गोठे ...एकामागून एक जळत राहिले.

होडीवाल्यांचा जय झाला होता. जो तो सुंगचे कौतुक करीत होता. पण सुंग उदास झाला होता. 'हे आपण काय भलतेच केले' असे त्याच्या मनाला खात राहिले. त्या उदास वृत्तीतून तो फटाक्याच्या दारूचे झाड करण्यामागे फार झपाट्याने लागला. कोळशाची पूड, गंधक, सोरा आणि बिडाचा कीस एकत्र ठासून छोटी छोटी झाडे त्याने गुपचुप फुलवूनही पाहिली... दुपारी घरात फक्त बहीण असताना... या वर्षी फटाक्यांच्या स्पर्धेत भाग घेऊन राजाकडून शाबासकी मिळवायची असा निश्चयही त्याने केला.

राजधानीमध्ये फटाक्यांची स्पर्धा होत असे. ठिकठिकाणाहून लोक आपापले नवे नवे फटाके घेऊन येत. राजापुढे ते वाजवून दाखवत. जे फटाके राजाला आवडत त्यांना राजा द्रव्य देई. त्यांचा मानसन्मान करी. फटाक्यांचा व्यापार वाढावा आणि राज्यातील भुतेखेते दूर पळून जावीत असा राजाचा या स्पर्धेमागचा हेतू होता. यावर्षी तर फटाक्यांची स्पर्धा फार मोठ्या प्रमाणात होणार होती. याचे कारण असे की तरुण राजकन्या धावता धावता पाय घसरून पडली होती. या अपघातामुळे तिची दृष्टी कमी झाली होती. बरेच वैद्य झाले. तिबेटातले मोठमोठे लामा झाले. मंगोलियामधल्या क्रूर तार्तार वैद्यांची राक्षसी औषधे झाली. वाळवंटातल्या बेढब उंटांची लाळ, जंगलातल्या झाडाची राळ, माकडाचे रक्त, हिंदुस्थानातील पवित्र नदीचे पाणीही झाले. एका हिंदुस्थानी साधूने राजाला सांगितले की या मुलीच्या डोळ्यात दृष्टी येईल; पण त्यासाठी तिने स्वतः दैदिप्यमान असे तेज पाहिले पाहिजे. कारण आज तिची दृष्टी एकदम मंद झालेली आहे ती पूर्ण मालवून गेलेली नाही. एकाच वेळी प्रकाशाचे वलय आणि आवाजाचा प्रलय व्हायला हवा... असे म्हणून त्या साधूने राजकन्येला 'हरि ओम! बुद्धम् सरणं गच्छामि' मंत्र सांगून आशीर्वाद दिला होता...

राजाला आत या वेळच्या स्पर्धेची उत्कंठा लागून राहिली. प्रकाशाचा दैदिप्यमान लोळ आणि आवाजाची डरकाळी कुठल्या फटाक्यातून बाहेर येते आणि आपल्या मुलीला दृष्टी देते हे तो पाहणार होता.

राजप्रासादात उडवण्यासाठी सुंगने तीन मोठाले खुजे-मातीचे छोटे रांजण तयार केले. या रांजणात कोळशाची भुकटी, गंधक, सोरा, बिडाचा कीस, इतर अनेक धातूंचे कुटून तयार केलेले मिश्रण सुंगने ठासून भरले. एक रांजण उडला नाही तर फजिती होऊ नये म्हणून त्याने दोन जास्त रांजण तयार ठेवले. या

रांजणांवर कागद लावला आणि तो बहिणीबरोबर राजप्रासादाकडे जाऊ लागला.

सुंग वडिलांच्या पाया पडला. त्यांनी त्याला जवळ घेतले आणि ते म्हणाले, 'पोरा, मी मासे मारणारा कोळी आहे. पण तू कल्पक, बुद्धिमान आहेस. मी तुला काय आशीर्वाद देणार? माझ्या जाळ्यात मासे सापडतात. पण तू एवढा मोठा हो की या जाळ्यामध्ये सूर्याला पकडून ठेव...' ते थरथरत्या हाताने त्याला थोपटत म्हणाले.

... राजप्रासादाकडे अनेक लोक रंगीबेरंगी कपडे करून आणि हातात फटाक्यांची पुडकी घेऊन जात होते. छोटे फटाके, मोठे फटाके, ठुसके फटाके, फुसके फटाके, ठणठणीत कानठळ्या देणारे फटाके, डोळे दिपवणारे फटाके, दोनदा वाजणारे फटाके, कोलांट्या उड्या टाकणारे फटाके, जवळ वाजणारे फटाके... फटाक्यांचे हजारो प्रकार तयार करून लोक राजधानीकडे जात होते. ज्याचा फटाका राजकन्येची दृष्टी परत आणील त्याला राजकन्या मिळणार होती.

फटाक्यांची स्पर्धा उघड्या अंगणात राजप्रासादातील एका बगीच्यामधे ठेवली होती. एका कोपऱ्यात राजा, राजकन्या आणि प्रधान बसले होते. राजकुमारीची नखे भली लांबलचक होती. राजकन्येने फार सुंदर फुले माळली होती. ती फार सुरेख दिसत होती पण बिचारी आंधळी होती.

एका चबुतऱ्यावर प्रत्येक जण फटाका ठेवून त्या फटाक्याचे वर्णन राजाला ऐकवून मग फोडत होता. प्रत्येक जण अगदी नम्रपणे वाकून राजाला वंदन करून हे सारे करीत होता. आवाज निघत होते. ठो, फो, फू स फटाड् फट्... एक दोघा इसमांनी फटाक्यांची माळ तयार केली आणि वाजवली. तमाम लोक कानावर हात ठेवत होते, टाळ्या पिटत होते, आनंदाने नाचत होते, ओरडत होते...

तेवढ्यात सुंगची पाळी आली. सुंग आणि त्याची बहीण तीन रांजण घेऊन पुढे गेले. चबुतऱ्यावर त्यांनी त्या तीन वस्तू ठेवल्या. सुंगने राजाला, प्रधानाला वंदन केले. मग तो आपल्या खणखणीत आवाजात म्हणाला, 'लोकहो,'पो यांग' या रम्य सरोवराच्या काठावर पहिला देव 'पॅन कू' याने पिवळ्या फुलांची झाडे निर्माण केली. या झाडांवरती आकाशातील नक्षत्रे येऊन राहतात. पण आपल्यापैकी काही चांडाळ लाकूडतोडे या झाडांना कापून काढतात. त्यांची लाकडे घरासाठी वापरतात. या चांडाळ लाकूडतोड्यांना माझे आवाहन आहे की आपल्या कुऱ्हाडी घेऊन त्यांनी माझी पिवळी झाडे तोडावी...' असे म्हणून पुन्हा एकदा सर्वांना वंदन करून त्याने पेटलेला पलिता हलकेच एका रांजणावर ठेवला.

... भो करून आवाज झाला. हा आवाज धबधब्यासारखा प्रचंड मोठा होत गेला. एखादा ज्वालामुखी सरसरून पेटावा आणि प्रचंड ज्वाला ओकत झोत बाहेर टाकत धुमसत बाहेर यावा तसा सर्वांना भास झाला. बघता बघता एक मोठ्या पिवळ्या पिवळ्या फुलांचे झाड उभे राहिले आणि वाढतच गेले. या झाडामधून रंगीबेरंगी ठिणग्या बाहेर पडत होत्या. एका पाठोपाठ दुसरेही झाड उभे राहिले, तिसरे पेटले...

चपापल्यासारखे सर्व लोक ते दारूचे काम पहात होते. राजकन्या तर अतिशय आनंदून त्या

झाडांजवळ जाऊ लागली. आणि हर्षातिशयाने तिने आपले दोन्ही हात पसरले. राजा आणि प्रधान तिला खेचण्यासाठी तिच्या मागे धावणार तोच त्यांना त्या झाडाच्या झगझगीत शुभ्र प्रकाशात एक दृश्य दिसले. राजकन्येचे दोन्ही हात सुंगने पकडले होते व तिला फार जवळ जाऊ न देण्याची तो धडपड करीत होता.

राजकन्या एकदा त्या तीन झाडांकडे आणि एकदा त्या झाडांना जन्म देणाऱ्या सुंगकडे पहात होती. तिला आता दिसू लागले होते. सुंग अधिक सुंदर, तेजःपुंज आहे की त्याची झाडे हेच तिला कळेनासे झाले.

❑

फुलराणी प्रकाशन

आणि

मृणमयी ऋग्वेदी प्रकाशनाची

विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त पुस्तके

१. पसायदान

२. प्रयोग करू, विज्ञान शिकू
(भरपूर आकृत्यांसह)

३. हास्ययोग
(ताणतणाव विरहित आनंदी जीवनासाठी
सर्व वयोगटांकरिता एक वेगळा विषय)

४. चला आकाश पाहूया
(आकाश विषयक सर्व विज्ञान, रेखाटनांसहित)

५. कागदी पट्ट्यांचे शिल्प
(हस्त व्यवसाय आणि चित्रकलेसाठी महत्त्वाचे)

६. ग्रीक शास्त्रज्ञांचे शोध आणि त्यांच्या जन्मकथा

७. चीनमध्ये प्राचीन काळी लागलेले महत्त्वपूर्ण शोध व जन्मकथा

८. १ली ते ४थी साठी वक्तृत्व व निबंधलेखन

९. सुभाषितांवरून निबंध

१०. सुविचारांवरून निबंध

११. म्हणींवरून निबंध

१२. निबंधासाठी व वक्तृत्व स्पर्धांसाठी –
'महत्त्वाची पुस्तके आणि त्यांचा नेमका वापर'

१३. शरीरस्वास्थ्यासाठी उपयुक्त – रसाहार

१४. कविता – अलीकडे, पलीकडे
निवडक कवितांचा रसास्वाद